~~२९८आ~~

आ/९९

Submitted to the
Deccan Vernacular
translation Society
Poona. for
favour of patronage

M. R. Pradhan
nagpur
Writer

सन १९०४

ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत छापलेलें प्रकरण

सुलभवेदान्तगुच्छ

भाग २ रा.

हा ग्रंथ

महादेव रामचंद्र प्रधान, बी. ए.,

यांनीं लिहिला

तो

विष्णु गोविंद विजापूरकर, एम्, ए.,

संपादक ग्रंथमाला

यांणीं

पुणें, ‘जगद्धितेच्छु’ व कोल्हापूर, ‘श्रीसमर्थप्रसाद’
छापखान्यांत छापविला.

किंमत १४ आणे.

प्रस्तावना.

अमेरिकेंत वेदांतसोसायटी स्थापन झाली आहे हें वाचकांना पूर्वी कळविलेंच आहे. आज त्यासंबंधीं थोडी माहिती येथें वाचकांकरितां देत आहे.

वेदांताचा हेतुः—वेदांताचा हेतु एकादा नवीन धर्मपंथ उत्पन्न करण्याचा अथवा एखाद्यास स्वधर्मत्याग करावयास लावून परधर्माश्रयी बनविण्याचाही नव्हे. तर आपल्या जीवनचरितास लागू असणारे अध्यात्मशास्त्राचे नियम तर्कशास्त्र आणि न्याय यांच्या जोरावर समजावून देणें; तत्वविद्या आणि भौतिकशास्त्र यांच्याशीं आत्म्याच्या खऱ्या धर्माचा विरोध नसून एकवाक्यताच आहे, हें निदर्शनास आणणें; विशिष्ट धर्मांत प्रचलित असलेले नानाविध पंथ आणि मतें या सर्वांना मूलाधार असणारा सार्वत्रिक धर्म प्रस्थापित करणें; नानाविध देशांतील सत्यशोधक महर्षींनीं आणि धर्मगुरूंनीं शिकविलेलीं आणि आपल्या जीवनचरिताच्या द्वारा सोदाहरण समजावून दिलेलीं जीं तत्वें त्यांचा प्रसार करणें; आणि आपल्या आध्यात्मिक, नैतिक, बौद्धिक आणि भौतिक गरजांचे बाबतींत त्या तत्वांचा व्यावहारिक दृष्ट्या उपयोग करण्याचे कामीं मानवजातीस मदत करणें हे वेदांतशास्त्राचे हेतू होत.

न्यूयॉर्क येथें वेदांतसंबंधीं झालेलें कामः—धर्मपरिषदेंतील वेदांताचे प्रतिनिधि, (ब्रह्मीभूत) स्वामी विवेकानंद ह्यांनीं इ० स० १८९४ सालीं प्रथम न्यूयॉर्क येथें वेदांतावर व्याख्यानें दिलीं. तीं त्यांचीं व्याख्यानें १८९५ पर्यंत चालू होतीं. ह्या सुमाराला व्याख्यानांच्या आणि वर्गाच्या कामाच्या सोईकरितां बऱ्याच विद्यार्थ्यांनीं एकत्र जमून वेदान्तमंडळी स्थापन केली.

इ. स. १८९५ सालीं पावसाळ्यांत इंग्लंडला गेल्यानंतर स्वामी विवेकानंदानीं न्यूयॉर्क येथें जाहीर आणि खाजगी अशीं बरींच व्याख्यानें दिलीं. नंतर इ. स. १८९६ त ते जेव्हां हिंदुस्थानांत परत आले तेव्हां त्याचे गुरुबंधु स्वामी शारदानंद हे त्यांचें काम चालविण्यासाठीं कल-

कत्याहून तेथें गेले. त्यांनींही न्यूयॉर्क, मॉन्टक्लेअर, केंब्रिज वगैरे अनेक ठिकाणीं व्याख्यानें दिलीं आणि तेहि इ. स. १८९८त हिंदुस्थानांत परत आले. मध्यंतरीं वेदातांचें काम इतक्या झपाट्यानें चाललें होतें कीं, स्वामी विवेकानंदाच्याच तोडीचे त्यांचे गुरुबंधु स्वामी अभेदानंद, जे त्यासमयीं लंडन येथें व्याख्यानें देत होते, त्यांना वेदांतसोसायटीनें न्यूयॉर्क शहरीं येण्यास निमंत्रण पाठविलें. त्याप्रमाणें ते तेथें इ० स० १८९७ च्या आगष्ट महिन्यांत येऊन दाखल झाले. त्यांनीं तेथें मॉट मेमोरियल हॉलमध्यें इ० स० १८९७च्या सप्टेंबरपासून इ० स० १८९८च्या मेपर्यंत व्याख्यानें दिलीं. पुढील उन्हाळ्यांत त्यांनीं अनेक स्थानिक संस्थानांतून व्याख्यानें दिलीं, आणि वेदांतसोसायटीला व्यवस्थित स्वरूप आणून इ० स० १८९८च्या आक्टोबर महिन्यांत न्यूयॉर्क संस्थानांतील कायद्यान्वयें वेदांतसोसायटी नांवानें एक संयुक्त संस्था स्थापन केली. पुढें १८९८–९९ सालीं स्वामी अभेदानंद ह्यांनीं पांच महिनेपावेतों व्याख्यानें देऊन पुनः पुढील उन्हाळा न्यूइंग्लंड आणि इतर भागांत हिंडून व्याख्यानें देण्यांत घालविला.

पुढें १८९९ सालीं विद्यार्थी आणि स्नेही यांच्या परस्परसाहाय्यानें वेदांतसोसायटीच्या कचेरी आणि लायब्ररीकरितां मुख्य ठिकाण नेमण्यांत आलें. ह्याच्यायोगें मंडळीच्या कामाला एक प्रकारचा नवीन उत्साह प्राप्त झाला. सोसायटीनें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें लोकांना तेथें रोज विकत मिळूं लागलीं. नियमित वेळीं वर्ग भरवून शिक्षण देण्यांत येऊं लागलें. पांच महिनेपर्यंत स्वामी अभेदानंद ह्यांनीं टक्सेडो हॉलमध्यें दर आदित्यवारीं व्याख्यानें दिलीं. १९०० च्या वसंतऋतूंत सोसायटीनें विद्यार्थ्यांना आणि ज्यांना या विषयाची गोडी आहे अशा इतर मंडळींना सोसायटीचे सभासद होण्याकरितां विनंति केली. अशाप्रकारें ही संस्था बरीच भरभराटीस आली आहे.

१९०० च्या वसंत आणि ग्रीष्म ऋतूंत स्वामी अभेदानंदांनीं फिरून न्यूइंग्लंडमध्यें आणि मिडलस्टेट्समध्यें व्याख्यानें दिलीं. पुढें हिंवाळ्याच्या अखेर स्वामी तुरीयानंद हे हिंदुस्थानांतून तेथें गेले व एप्रिल आणि मे

असे दोन महिने सोसायटीच्या वर्गाची व्यवस्था त्यांनीं पाहिली. याच सुमारास सोसायटीचे संस्थापक स्वामी विवेकानंदहि तेथें फिरून गेले होते व त्यांनींहि तेथें व्याख्यानें दिलीं होतीं.

१९००–०१ च्या प्रारंभीं स्वामी अभेदानंद ह्यांनीं आपली रविवारची जाहीर व्याख्यानमाला कार्नेजिआ लायसिअम येथें सुरूं करून सहा महिनेपर्यंत चालू ठेविली. नंतर स्वामींनीं बराच प्रवास करून व ठिकठिकाणीं व्याख्यानें देऊन फिरून १९०१च्या नोव्हेंबर महिन्यांत कार्नेजिआ लायसिअम येथें परत येऊन व्याख्यानमालेस सुरवात केली. तीं अद्याप चालू आहेत. हींच व्याख्यानें मी महाराष्ट्रवाचकांपुढें रूपांतरानें ठेवीत अहे.

ह्या व्याख्यानांपैकीं, १ ईश्वराचें मातृत्व, २ धर्माचा शास्त्रीय पाया, ३ जीवात्म्याचा परमात्म्याशीं संबंध, ४ सुखदुःखमीमांसा व ५ परमसुखप्राप्तीचाा मार्ग, अशीं पांच पुष्पें सुलभवेदांतगुच्छ भाग १ ला. या ग्रंथांत गुंफिलीं आहेत. व या द्वितीय गुच्छांत, ६ जगदुत्क्रांति आणि तिचा उद्देश, ७ मरणानंतर आत्म्यास अस्तित्व असतें काय? ८ पुनर्जन्म, ९ उत्क्रांति आणि पुनर्जन्म व १० वें मृतोत्थापन आणि पुनर्जन्म ह्यांपैकीं शास्त्रसंमत कोणतें? अशीं पुढील पांच पुष्पें गोविलीं आहेत. स्वामींच्या सुविचारसुमनांचा परिमल लोकांना वेळोवेळीं द्यावा अशी लेखकाची इच्छा आहे खरी; पण स्वामींच्या बऱ्याच व्याख्यानांचीं रूपांतरें अद्यापि व्हावयाचीं आहेत. आणखी एवढेच चार भाग होतील एवढी सामुग्री जवळ तयार आहे त्याशिवाय स्वामींकडून आणखी कांहीं व्याख्यानें येतील तीं निराळींच. पण हें काम तडीस जाण्यास लेखकाची फुरसत, त्याचा उत्साह आणि त्याबरोबरच प्रकाशकाची सहानुभूति इतक्या गोष्टी अवश्य लागतात. लेखकाच्या फुरसतीचा आणि उत्साहाचा भाग जरी बाजूला ठेवला तरी प्रकाशकांच्या सहानुभूतिसंबंधीं उद्गार काढणें भाग आहे. **सुलभवेदांतगुच्छ भाग १ ला, ब्रह्मचर्य व गृहस्थाश्रम** व आजचा हा **सुलभवेदांतगुच्छ भाग २ रा** हीं पुस्तकें लोकांपुढें ठेवण्याचे कामीं अर्धें श्रेय गुरुवर्य

विष्णुपंत विजापूरकर यांचेकडेसच आहे व त्यांच्या ह्या सहानुभूतीबद्दल आभार प्रदर्शित करणें हें माझें कर्तव्यकर्म आहे असें मी समजतों. आतां लेखकाची फुरसत आणि उत्साह यासंबंधीं जर पाहिलें तर प्रपंचाच्या उपाधी सर्वांना आहेत. त्या संभाळून फावल्या वेळीं उत्साह कायम राहिल्यास जें कांहीं हातून कार्य घडावयाचें तेवढेंच. येथें स्वतंत्र लेखनव्यवसायाला वाहिलेलीं माणसें निपजण्यास बराच कालावधि लोटला पाहिजे व तसा काल येईतोंपर्यंत कोणतेंहि काम एकट्याच्यानें पुरतेंपणीं तडीस जाण्याची आशा बाळगावयासच नको. या कामास चार स्नेही मंडळीच्या साहाय्याचीच अवश्यकता लागते व त्यांनीं साहाय्य करण्याचें मनावर घेतल्यास हें काम सहज होण्याजोगें आहे. आतां कित्येकांकडून लेखनव्यवसायाचे बाबतींत गृहस्थितीची सबब पुढें मांडण्यांत येतें. पण त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, दारिद्र्य, अविरत आयास आणि कसोटी पाहणारीं संकटें यांच्याशींच कविजनांना आणि सज्जनांना नेहमीं झुंझावें लागलें आहे. लॉकवर जेव्हां राजद्रोहाचा आरोप येऊन त्याला हद्दपार करण्यांत आलें, तेव्हां त्यानें एका डच गॅरेट (पोटमाळ) मध्यें आश्रय पाहून तेथें त्यानें आपला ' मानवी बुद्धीवरील निबंध ' नांवाचा ग्रंथ लिहिला. तसेंच मिल्टन ह्यानें पॅरेडाइज् लॉस्ट नामक अति सुंदर व अमर काव्य रचिलें तेव्हां त्याचीहि स्थिति अगदीं निकृष्टाहून निकृष्ट आणि दारिद्र्याहून दरिद्री अशी होती.

असो; शेवटीं माझे स्नेही श्रीयुत रा. रा. जयवंत, बी. ए., एल्‌एल्. बी., नाशिक, ह्यांनीं ह्या भागाची लेखी प्रत वाचून पाहण्याची तसदी घेतली ह्याबद्दल त्यांचे आभार मानून, ज्याच्या कृपेनें ही अल्पादल्प सेवा हांतून घडत आहे त्या जगन्नियंत्याला अनन्यभावानें शरण जाणें हेंच उचित.

नागपूर,
ता० १ मे १९०४.

महादेव रामचंद्र प्रधान.

श्रीसद्गुरु

स्वामी अभेदानन्द यांच्या व्याख्यानाचें भाषांतर.

नंबर ६.

' जगदुत्क्रांति आणि तिचा उद्देश. '

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

भगवद्गीता अ. १४.

भावार्थः—महद्ब्रह्म म्हणजे (माया,) ती माझें सर्व भूतांना जन्म देण्याचें स्थान असून तिच्या ठिकाणीं मी गर्भधारणा करितों, आणि सर्व भूतांची उत्पत्ति तिजपासूनच होते.

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ २१ ॥

अध्याय ८.

भावार्थः—अव्यक्त ब्रह्म अविनाशी आहे व त्यालाच अत्युच्च पद असें म्हणतात. ज्या पदाला जाऊन पोहोंचलें असतां पुनः कधीं परत यावें लागत नाहीं; तें माझें (परमेश्वराचें) परमधाम होय.

सृष्टींतील चमत्कार ज्या नियमांच्या अन्वयें घडतात त्यांचें ज्ञान मिळविण्याकरितां आणि हे चमत्कार घडवून आणण्याकरितां सृष्टि ज्या पद्धतीचा अंगीकार करते त्या पद्धतीचें स्पष्टीकरण करण्याकरितां मनुष्य ज्ञाति फार प्राचीनकालापासून प्रयत्न करीत आहे; याविषयीं जगांतील प्रत्येक धर्मग्रंथ साक्ष देत आहे. हिब्र्यु लोकांचा ' जुना करार ', इराणी लोकांचा ' झेंडावेस्ता ' आणि आर्यांचे ' वेद ' ह्यांत त्या तीन प्रचंड राष्ट्रांतील तत्त्ववेत्त्यांनीं वरील दिशेनें केलेल्या प्रयत्नाचा उल्लेख आहे. कालक्रमानुसार बोलावयाचें झाल्यास त्या तीन ग्रंथांत वेदच

अत्यंत प्राचीन आहेत असें म्हणावें लागतें. ' जुन्या करारांत ' आणि ' झेंडावेस्तांत ' जगद्व्यतिरिक्त मूर्त ईश्वर आहे असें मानिलें आहे व ' शून्यापासून ' निर्दिष्टकालीं विश्वाची विशिष्ट उत्पत्ति झाली असें त्यांत वर्णन आहे. जेनिसेस नामक कांडांत उत्पत्तीचा जो दंतकथात्मक वृत्तांत दिला आहे त्याचा सारांश असा कीं ईश्वरानें उत्पत्तीचें कार्य सहा दिवसांत केलें. सूर्य, चंद्र आणि तारागण हे कमीजास्त तेजाचे दीप लाविले आणि ज्याचें तेज अधिक त्यानें दिवसास प्रकाश पाडावा व इतरांनीं हें काम रात्रीं करावें असें ठरविलें; नानाप्रकारच्या वृक्षवल्लीं-नीं पृथ्वीला ' हरिततृणसस्यांकुरवती ' करून ठेविली; प्राण्यांच्या यच्चयावत् जाति निर्माण करून प्राणिकोटींतील मुकुटमणी जो मनुष्यवर्ग त्याला पृथ्वीवरील सर्व वस्तूंचें आधिपत्य दिलें. ' झेंडावेस्तांत ' हि अशाच प्रकारचा वृत्तांत आढळतो. त्यांत असें सांगितलें आहे कीं जगद्व्यतिरिक्त मूर्त परमेश्वर जो ' अहुर मजदा ' ह्यांनीं विश्वाची विशिष्ट रीतीनें उत्पत्ति केली आहे. पण अशाच तऱ्हेची हकीकत सांपडेल या आशेनें जर कोणी भारतवर्षीय आर्यांच्या अत्यंत प्राचीन आणि पवित्र वेदांचें पर्यालोचन केलें तर त्याच्या आशेचा भंग झाल्यावांचून रहावयाचा नाहीं; प्राचीन भरतभूमींतील सत्यान्वेषण करणाऱ्या ऋषिगणांनीं जे चिरसंस्मरणीय ग्रंथ आणि प्रचंड लेख लिहून ठेविले आहेत त्यांचें ज्यांनीं काळजीपूर्वक अध्ययन केलें त्यांना या प्रचंड ग्रंथसमूहांत विश्वाची उत्पत्ति शून्यापासून झाली असा वृत्तांत कोठेंच आढळत नाहीं याबद्दल फार आश्चर्य वाटत आहे.

वैदिक काळाच्या ऋषिगणांच्या ठिकाणीं कवित्वशक्ति असून त्यांना सत्यान्वेषणाची इच्छा होती. " आदिपुरुष कोणीं पाहिला आहे" ? " विश्वाचा जीव रक्त आणि आत्मा हीं होतीं कोठें ?" ही उत्पत्ति कोठून झाली हें सांगण्याचें सामर्थ्य कोणाचे ठिकाणीं आहे ?" अर्थात् हें काम देवांचें नव्हे, कारण ते मागाहून आले. सृष्टीचें उद्गमस्थान कोणतें आणि सृष्टि निर्मित आहे कीं नाहीं हें तरी कोण सांगू शकेल " (ऋग्वेद १० स्तोत्र १२९) अशा प्रकारचे प्रश्न जेव्हां ऋषिवर्यांनीं

जगापुढें मांडले आणि त्यांचीं समर्पक उत्तरेंहि दिलीं तेव्हां त्यांच्या विचारशक्तीनें नित्यसत्यरूपी अमर्याद अंतरिक्षांत धर्मवेड आणि अज्ञान यांच्या मेघांच्यावर बरीच उंच भरारी मारिली होती. हे प्रश्न असंस्कृत माणसांच्या डोक्यांतून निघालेले नव्हते; ईश्वर ह्मणजे एक धोंडा अथवा लांकडाचा ठोकळा याच्या पलीकडे ज्यांच्या विचारांची आणि कल्पनांची मजल गेली नाहीं अशा अज्ञानांधकारांत चांचपणाऱ्या धर्मवेड्यांच्या मनांत हे प्रश्न उद्भवले नव्हते. आज अशा प्रकारचे प्रश्न कितीजणांना सूचतात आणि त्यांचीं उत्तरें देण्याचें सामर्थ्य कितीजणांना आहे हेंच पहाना, देवांचें अनेकत्व मानणें हाच श्रेष्ठतम धर्म असें ज्यांचें ठाम मत आहे अशा पुरुषांचे डोक्यांत “ ही उत्पत्ति कोठून आली हें सांगण्याचें सामर्थ्य कोणाचे आहे ? हें काम देवांचें नव्हे, कारण ते मागाहून आले ” असा प्रश्न उद्भवण्याचा कांहीं तरी संभव आहे काय ? प्रतिमेच्या पुढें आदरयुक्त भीतीनें कपाळ घासणाऱ्या आणि तिला विश्वनियामक मानून भजणाऱ्या मूर्तिपूजकाचे मनांत “ कोण जाणे हें जग खरोखर उत्पन्न झालें आहे किंवा कसें ? उच्चतम स्वर्गांत राहून विश्वाचें नियमन जो करीत आहे तोंच हें जाणूं शकेल अथवा त्यालाहि कदाचित् ठाऊक नसेल ” अशी शंका कधीं तरी उद्भवेल काय ? हे प्रश्न वैदिक कालांतील ऋषींना सुचले होते. त्यावेळीं इतिहास नव्हता, इतर सर्व राष्ट्रें अगदींच बाल्यावस्थेंत होतीं. लेखनकलेचें ज्ञान कोणालाहि नव्हतें. वाचनकलेचीहि स्थिति अर्थात् तशीच. आधुनिक पाठशाळा, आणि विश्वविद्यालयें यांचे विचार देखील सुचले नव्हते. आणि शास्त्रवेत्त्याच्या प्रयोगशालांतून जो नानातऱ्हेचा यंत्रांचा आणि औषधांचा संचय आपल्या दृष्टीस पडतो, व जो ज्ञानार्जनासाठीं अगदीं अवश्य गणला जातो तो तर त्या कालीं लोकांच्या स्वप्नांत देखील नव्हता. ज्या कालीं हे प्रश्न त्यांना सुचले त्या कालीं लोकशिक्षण ह्मणजे त्यांच्या सरळ आणि तत्वान्वेषणार्थ आतुर मनांत सहजगत्या व एकदम उत्पन्न झालेल्या प्रकाशलहरी हेंच होतें. हे प्रश्न त्याकालीं भारतवर्षीय तत्त्ववेत्त्यानीं विचारिलेले असून त्यांचीं उत्तरेंहि

त्यांच्याचकडून मिळालीं. ऋग्वेद जो इतका प्राचीन कीं ज्याच्या मागून सुमारें पांच हजार वर्षांनीं कोठें ख्रिस्ताचा जन्म झाला त्यांतील एका स्तोत्रांतच ह्या प्रश्नांचीं उत्तरें आपणांस आढळून येतात. ऋग्वेद १० स्तोत्र १२९ पहा. त्यांत असें ह्मटलें आहे कीं ह्या चमत्कृति परिपूर्ण विश्वाला स्वरूपविशिष्टत्व येण्यापूर्वीं असत् (Nonentity) हि नव्हतें अथवा सत् (Entity) हि नव्हतें; वातावरणहि नव्हतें आणि अंतरिक्षहि नव्हतें. मृत्युहि नव्हता. आणि मृत्युच जर नव्हता तर अमरत्व तरी कोठून असणार ? दिवस रात्र हा कालविभागहि नव्हता. तें **एकच** आपल्या मूळरूपानें अस्तित्वांत होतें. त्या **एकाहून** निराळें अथवा त्याच्या पलीकडे असें कांहींच नव्हतें. त्या **एका** बीजापासून प्रचंड उत्पादक शक्ति–**प्रकृति** (जडसृष्टि) Nature आणि पुरुष (चिदंश) Energy हीं निर्माण झालीं. " तसेंच अन्यत्र उपनिषदांतरीं काय ह्मटलें आहे पहा. " ह्या नित्य अविच्छिन्न आणि केवल (Absolute) अशा परमात्म्यापासून प्राणशक्ति, मन आणि दशेंद्रियें, आकाश (Ether) उष्णता आणि यच्चयावत् वायुरूप, द्रवरूप आणि घनरूप पदार्थ या सर्वांचें क्रमशः उत्क्रमण झालें (मुंडकोपनिषद अ० २ श्लो० १-३) मन, विचार, बुद्धि, आकाश हीं त्या एक, अविच्छिन्न आदिकारण चिच्छक्तीच्या उत्क्रांतीचीं कार्यें होत. ही **गोष्ट** इतक्या प्राचीनकाळींच भारतवर्षीय विवेकी पुरुषांच्या आणि तत्त्ववेत्त्यांच्या ध्यानांत येऊन चुकली होती हें पाहून आधुनिक पंडितांना थोडें नवल वाटतें. दुसऱ्या एका उपनिषदांत असें ह्मटलें आहे कीं " ह्या विश्वगोलाचें नामरूपाप्रत उत्क्रमण होण्यापूर्वीं तो त्या अव्यक्त आदिकारणावस्थेंत बीजरूपानें अस्तित्वांत होता. " ह्या आदिकारण चिच्छक्तीला निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांनीं नानाविध नांवें दिलीं आहेत. हिलाच कोणी ' **अव्यक्त** ' कोणी ' प्रकृति ' आणि कोणी ' माया असें ह्मणतात. पण या सर्व शब्दांचा अर्थ मात्र एक आणि **अविछिन्न** अशी आदिकारण **चिच्छक्ति** हाच होय.

ह्या चमत्कृतिपरिपूर्ण विश्वाची उत्क्रांति ज्या पद्धतीनें झाली त्या

पद्धतीचें वर्णन जें आपणांस आढळतें तें असें. " अविछिन्न अशा आदिकारण चिच्छक्तीपासून 'आकाश' Ether उत्पन्न झालें. पुढें या आकाशाचे परिमाणू परिभ्रमण करूं लागले. या गतिरूप अवस्थेला ' वायु' अशी संज्ञा दिली आहे. ही अवस्था ह्मणजे द्रव्याच्या आकर्षणानें आणि पुंजीकरणानें (परस्पराघातानें) उत्पन्न झालेल्या उष्णतेची पराकाष्ठा होय. ह्या उष्णतातिशयामुळें त्या अवस्थेला " भौतिक जगाची वायुरूप अवस्था असेंहि कधीं कधीं म्हणण्यांत येतें. आणि ह्मणून या उष्णतेला जिला संस्कृतांत ' अग्नि ' आणि लॅटिन भाषेंत ' इग्निस ' अशा संज्ञा आहेत तिला जगदुत्क्रांतीची तृतीयावस्था असें म्हटलें आहे. आतां ह्या पराकाष्ठेच्या उष्णतेचा जेव्हां विक्षेप होऊं लागतो आणि वायुरूप द्रव्योदधी शीतल होऊं लागतो तेव्हां वायुरूपावस्था जाऊन द्रवरूपावस्था येते. इलाच संस्कृतांत ' **आपः** ' असें ह्मटलें आहे. पुढें हीच आर्द्रता अथवा द्रवरूपावस्था उष्णतेच्या विक्षेपानें अधिक थंडावते तेव्हां द्रव्याचे कण घनरूपानें दिसूं लागतात. त्यालाच संस्कृतांत घनद्रव्य अथवा ' पृथ्वी ' असें ह्मणतात. एवंच जेव्हां पृथ्वीवर शीतलतेचें मान अधिकाधिक होऊं लागतें तेव्हां कोठें या स्थूल अवस्थेंत जीवतत्व प्रथमतः वनस्पतीच्या रूपानें नंतर जीवजंतूच्या रूपानें आणि सरशेवटीं मनुष्यरूपानें प्रकट होण्यास सुरुवात होते.*

असो. येणेंप्रमाणें श्रुतींत आढळणारें हें जगदुत्क्रांतीच्या मुख्य अवस्थांचें आद्य वर्णन होय. आधुनिक मीमांसकानीं उत्क्रांति तत्त्वाच्या प्रचंड इमारतीची उभारणी अध्यात्मविद्या आणि तर्कशास्त्र यांच्या बिकट पद्धतीनें ज्या पायावर केली त्याचा वरील वर्णन हा एक आधारस्तंभ होय. हिंदुस्थानांत हिंदुतत्वज्ञानाचें निरूपण करणारीं सहा प्रमुख शास्त्रें असून तीं षड्दर्शनें या नांवानें प्रसिद्ध आहेत. (सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा हीं तीं सहा दर्शनें) यांपैकीं **सांख्य शास्त्र** नामक नौका **कपिल** महामुनीनें

---

*तैत्तिरीयोपनिषद २—१ पद्य.

जगदुद्धारार्थ तयार केली असून त्यांत त्यांनीं जगदुत्क्रांतीच्या पद्धतीचें निरूपण मोठ्या संगतवार तार्किक आणि शास्त्रसंमत पद्धतीनें केलें आहे. **कपिल** मुनि बराच पूर्वींचा ह्मणजे ख्रिस्ती शकाच्या अगोदर सातव्या शतकांतील असावा असें पौरस्त्य आणि पाश्चात्य पंडितांचें मत आहे. हिंदुस्थानांतील उत्क्रांतितत्त्वाचा तो जनक होय असें म्हणतां येईल. त्याचें जगदुत्क्रांतिनिरूपण सर्व हिंदुस्थानभर पसरलें होतें आणि ज्यांचा ज्यांचा प्राचीन आर्यांशीं निकटसंबंध जडला त्या सर्वांच्या मनांवर त्याचा न्यूनाधिक प्रमाणानें परिणाम घडला होता. **कपिल** मुनिप्रणीत सांख्यशास्त्राचें जिला साहाय्य झालें नाहीं अशी एकहि प्राचीन अध्यात्मविद्या पाश्चात्य देशांत आढळणार नाहीं. प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्ते आणि निओ प्लेटोनिस्टस् (प्लेटोमतानुयायी) यांच्या जगदुत्क्रांतीविषयींच्या कल्पनेची परंपरा लावीत मागें गेलें असतां सांख्यशास्त्राच्या परिणामाचेंच तें कार्य होतें असें दिसून येतें. प्रो. इ. डब्ल्यु हॉप्किन्स हिंदुस्थानांतील धर्माविषयीं लिहितांना म्हणतो " प्लेटोचे विचारांत सांख्य मतच भरलें आहे. व तें त्यांनीं स्वतः सप्रमाण सिद्ध केलें आहे. पण घेतलें मात्र **पायथ्यागोरास**पासून. ख्रिस्ती शतापूर्वी ६ व्या शतकाच्या अगोदर पायथ्यागोरासच्या धर्मसंबंधीं तत्त्वज्ञानाच्या सर्व कल्पना भरतभूमींत प्रचलित होत्या. या गोष्टीला आधारभूत म्हणून जर एक दोनच उदाहरणें आढळलीं असतीं तर तो आपला एक ' काकतालीय न्याय ' (आकस्मिक योग) म्हणून त्यांची पर्वा केली नसती. पण असले हे योग इतके कांहीं विपुल आहेत कीं त्यांना आकस्मिक योग असें ह्मणतांच येत नाहीं." (Religions of India पृ० ९९९ पहा). पुढें आणखी प्रो. मजकूर म्हणतात. आधुनिक प्लेटोमतानुयायी आणि ख्रिस्ती अज्ञेयवादी हे उभयतां हिंदुस्थानचे बरेच ऋणी आहेत. अज्ञेयवाद्यांच्या स्वर्ग आणि भुवनें ह्यांच्याविषयींच्या कल्पना इतक्या मागच्या आहेत कीं त्यांना हिंदुतत्त्ववेत्त्यांच्या कल्पनांचा आधार आहे असें स्पष्टपणें दिसून येतें. **आत्मा** आणि **प्रकाश** परस्परभिन्न नसून एकच आहेत या मताचा प्रसार ग्रीस देशांत होण्यापूर्वी तें मत सांख्यशास्त्रां-

तच प्रकट झालें होतें आणि ग्रीसमध्यें त्या मताचा जो प्रादुर्भाव झाला तो हिंदुस्थानांतील उसनवार विचारामुळेंच झाला. सांख्यशास्त्राचीं तीन प्रमुख लक्षणेंच अज्ञेयवाद्यांचे तीन वर्ग (पहा. पृष्ठ ५६०) आधुनिक प्लेटोमतानुयायांच्या संबंधीं प्रो. गार्बे यांचें असें ह्मणणें आहे कीं " प्लेटीनस यांचे विचार सांख्यशास्त्रान्तर्गत विचारांशीं अगदीं तंतोतंत जुळतात; आणि त्यांचा शिष्य पॉर्फिरी ह्याला सत्याचें तात्काळ ज्ञान होऊन ईश्वराशीं तादात्म्य जेणेंकरून होतां येतें अशा योगशास्त्राचें ज्ञान आहे. ह्या पॉर्फिरीनीं बार्डीसेन्सच्या ज्या ग्रंथांत ब्राह्मणांचा वृत्तांत आहे त्या ग्रंथांतून निव्वळ चोरी केली आहे आणि बहुतेक प्रसंगीं तर सांख्यप्रणीत सिद्धांताची नुसती पुनरावृत्ति केली आहे, हें सर्वांना विदित असून त्याविषयीं कोणाचा वाद नाहीं." (पृ. ५६१ पहा.) असें ह्मणतात आणि सामान्य समजूतहि पण अशीच आहे कीं पायथ्यागोरासनीं प्रथम हिंदुस्थानांत येऊन सांख्यतत्त्वांचा अभ्यास केला आणि नंतर त्या तत्त्वांचा प्रसार त्यांनीं ग्रीसमध्यें आणि आलेक्शांड्रियामध्यें केला. ग्रीक दंतकथा तर इजिप्त, चाल्डिया, फीनिसीया आणि हिंदुस्थान ह्या देशांतील सॅमीयनाच्या प्रवासवर्णनानेंच परिपूर्ण आहेत. प्रोफेसर हाप्किन्‌साहेब ह्मणतात. " पायथ्यागोरासचा निकटसंबंध जेथें जेथें येत गेला तीं स्थलें आणि त्याच्या मूळपीठिकेच्या समर्थनार्थ आणि तद्विरुद्ध सांपडणारा ऐतिहासिक पुरावा ह्यांचा काळजीपूर्वक, थंडपणानें आणि विकारवश न होतां जर विचार केला तर ग्रीक तत्त्ववेत्त्यांनीं आपल्या शास्त्राच्या इमारतीची सर्व सामग्री अप्रत्यक्ष रीतीनें हिंदुस्थानांतूनच नेली असें निश्चितपणें ह्मणावें लागतें."

सांख्यप्रणीत अन्तिम सिद्धान्ताचीं अर्वाचीन शास्त्रान्तर्गत सिद्धान्ताशीं एकवाक्यता होते हें पाहून अत्यंत आश्चर्य वाटतें. सांख्यशास्त्रांत सांगितलें आहे कीं, प्रथम शून्यापासून कांहींच उत्पन्न व्हावयाचें नाहीं. (**'नावस्तुनो वस्तुसिद्धिः'**). दुसरें कारणामध्येंच कार्य असतें ह्मणजे कार्यावरून कारणाचा बोध होतो. (**' कार्य्यात्कारणमात्रं गम्यते '**)

अथवा हेंच अन्य शब्दानें बोलावयाचें झाल्यास असें कीं कारण ह्मणजे कार्याची बीजरूपावस्था अथवा अव्यक्तावस्था होय आणि जेव्हां ' कारण ' व्यक्तरूपानें दृष्टीस पडतें तेव्हां त्याला ' कार्य ' अशी संज्ञा प्राप्त होते. तिसरें एखादे वस्तूचा नाश ह्मणजे कार्याचें कारणावस्थेप्रत परावर्तन होय. हें सत्य पाश्चात्य देशांतील शास्त्रज्ञांना अगदीं आतांपर्यंत मान्य नव्हतें. चवथें असें कीं सृष्टीचे नियम सर्वत्र एकसारखे आणि संगतवार आहेत. पिंडांत—सूक्ष्म-जगतांत (Microcosm)जें आहे तें ब्रह्मांडांत-त्रिभुवनांत (Macrocosm) सुद्धां आहे. पांचवें जगत् हें जगच्छक्ति जी प्रकृती तिच्या उत्क्रांतीचा परिणाम होय. हे सिद्धान्त कपिल मुनीनें निरीक्षण आणि प्रयोग यांच्या साहाय्यानें व प्रवर्तक तर्कशास्त्राचे नियम कडकडीतपणें पाहून जे कांहीं प्रमुख सिद्धान्त ठरविले आहेत त्यांपैकींच होत. सृष्टचमत्कारांचे देखावे राग (attraction) आणि विराग (Repulsion) यांच्या पद्धतीमुळें उत्पन्न होतात अशा अर्थाचें कपिलमुनिप्रणीत एक प्रसिद्ध सूत्र* आहे, व तें कपिलमुनीस आकर्षक आणि उत्सारक (atraction and relpulsion) शक्तींचे नियम अवगत होते याची साक्ष देत आहे. कपिलमुनीचें मत आहे कीं, ' **प्रकृति** ' ही अनादि आणि नित्य असून अचेतन आहे. ती जगांतील सर्व शक्तीची समतोल अवस्था आहे. आणि त्या शक्ती अन्योन्यसंबंधी असून तिचेंच आविष्करण अथवा व्यक्तरूपें होत. अंतर्बाह्य सृष्टींतील (subjective and objective world) अनेक शक्तींच्या अन्योन्यसंबंधी भावांची आद्य कल्पना येथेंच आढळते. ह्या अवस्थेंत उत्पत्ति अगर विश्वचमत्कार वगैरे प्रकार कांहीं नसतो. या शक्तींच्या समतोल भावांत चलबिचल झाली ह्मणजे उत्क्रांतिपद्धतीला सुरुवात होते. व ती कोट्यावधि वर्षेंपर्यंत अशीच चालू राहून पुढें जगासंबंधी (involution) आवरण अथवा (Dissolution) पृथक्करणक्रियांना प्रारंभ होतो. (involution) ह्मणजे उत्क्रांतिपद्धतीच्या निवळ उलट क्रिया होय.

प्रथम उत्क्रांति, उत्क्रांतीच्या मागून अपक्रांति आणि अपक्रांतीच्या मागून फिरून उत्क्रांति असें हें रहाटगाडगें आहे. तें आदिअंतरहित आहे. जगाची उत्क्रांति होण्याला जो कांहीं काळ लागतो त्याला संस्कृतांत ' कल्प ' असें ह्मणतात. अपक्रांतीचा काळ ह्मणजे दुसरा एक कल्प. कल्पांतसमयीं सृष्टचमत्कारपरिपूर्णजगत् हें आपल्या कारणावस्थेंत फिरून लीन होतें ह्मणजे ' मूलप्रकृति ' जी चिच्छक्ति तिच्या ठायीं अंतर्धान पावतें. कपिल मुनीनें प्रथमतः प्रकृतीचा समतोलपणा कसा आणि कोणत्या सामर्थ्यानें भंग पावतो, **पुरुषाचा** अथवा **केवलात्म्याचा** प्रकाश प्रकृतीवर पडून त्यापासून चैतन्य उत्पन्न कसें होतें याचें वर्णन केलें आहे. नंतर पुरुष आणि प्रकृति यांच्या संयोगापासून बुद्धि आणि अहंकार हे कसे उत्क्रमण पावतात हें सांगितलें आहे. बुद्धि आणि अहंकार उत्पन्न झाले ह्मणजे विषयी (Subject) आणि विषय (Object) हे भिन्न भासूं लागतात. बाह्य सृष्टींत प्रकृतीच्या उत्क्रांतीचें आद्यकार्य अथवा अवस्था ह्मटली ह्मणजे ' आकाश ' (Ehter) ही होय. आजचे शास्त्रज्ञ आकाशाचे प्राक्स्थितीबद्दल साशंक आहेत. आकाशीय परमाणूंना जेव्हां गति प्राप्त होते तेव्हां त्यांच्या परिभ्रमणापासून प्रकाश, आग्नि, द्रव्याचीवायुरूपावस्था, नंतर क्रमशः द्रवावस्था आणि घनावस्था, परमाणू व परमाणूंचे लहान लहान समूह—(द्विपरमाणू) ज्यांना संस्कृतांत तन्मात्रा ह्मणतात, आणि नंतर स्थूलरूप-तत्त्वें (Gross elements) अशीं कार्यें उत्पन्न होतात. द्रव्याच्या ह्या सूक्ष्म परमाणूंतून मन ह्यालाच अंतरिंद्रिय अशी संज्ञा आहे—ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें हीं निष्पन्न झालीं आहेत. कपिलमुनीनें स्थूलतत्त्वांपासून सुरुवात करून ज्ञानविषयाचें पृथक्करण केलें आहे आणि ह्मटलें आहे कीं प्रत्येक स्थूलपदार्थ ह्मणजे द्रव्याच्या अतिसूक्ष्मरूपांचा संयोग होय. त्यांनीं ह्या सूक्ष्मरूपांना अथवा परमाणूंना इतकें मागें नेलें आहे कीं त्यांचा प्रकृतीच्या कारणावस्थेपर्यंत संबंध जोडला आहे, व त्या रूपांना शक्तींचें उद्गमस्थान अशी संज्ञा दिली आहे.एवं च हें सहज ध्यानांत येईल कीं ज्या सत्या-

चा शोध अर्वाचीन शास्त्रज्ञांनीं आतांशीं कोठें लाविला आहे तेंच सत्य भारतवर्षीय महर्षींना ख्रिस्त जन्माचे अगोदर सातव्या शतकाचे सुमारास सांपडलें. आजच्या उत्क्रांतिवाद्यांच्या आणि खगोलवेत्त्यांच्या मतानुरोधें जर आपण जगदुत्क्रांतीच्या उपपत्तीचें निरीक्षण केलें तर आपणांस असें आढळून येईल कीं आजच्या शास्त्रज्ञांनीं जे कांहीं सिद्धान्त काढिले आहेत ते पूर्वींहून मुळींच भिन्न नाहींत. प्रो० डब्ल्यू. ली. **कॉंट स्टिव्हन्स** यांचें असें ह्मणणें आहे कीं ढगाप्रमाणें दिसणाऱ्या धूमपुंजा विषयींची कल्पना जर खरी मानिली तर आपणांला हें समजून येईल कीं आपल्या या अत्यंत थंड प्रदेशापासून अंतरिक्षाच्या पोकळींत अवर्णनीय अशा दूर अंतरावर जो ढगाप्रमाणें दिसणाऱ्या जड पदार्थांचा अगाध सिंधु आहे त्याच्या उदरांतूनच आपली पृथ्वी आणि सूर्यमालेंतलि इतर ग्रह यांची क्रांति अथवा उदय होण्यास युगेचीं युगें लोटलीं आहेत. या जड पदार्थांच्या अगाधसिंधूंत केवळ एक बिंदु जर आसपासच्या पदार्थांपेक्षां अधिक घन अथवा जड झाला तर तो बिंदु गुरुत्वाकर्षणाचा केंद्रस्थान होऊन राहतो.* द्रव्याच्या पुंजीकरणानें गति स्तब्ध होते, कारण केंद्रस्थानाप्रत धांव घेणारे जे सूक्ष्म परमाणु असतात त्यांची गति बंद होते; पण त्यांच्या अंगच्या शक्तीचा मात्र नाश होत नाहीं. एकंदर गतिरूपावस्थेचा उष्ण परमाणरूपांत बदल होतो. द्रव्याचें पुंजीकरण जर अधिक असेल तर त्या मानानें उष्णतेचें प्रमाणहि अधिक असतें. आणि उष्णतेचें मान वाढलें ह्मणजे किरणपातास अथवा प्रकाशस्फुरणासहि प्रारंभ होतो; पण उष्णतेचें न्यूनाधिक्याचें प्रमाण अवश्यमेव सारखेंच असतें असा मात्र नियम नाहीं. वायुरूपी द्रव्य समुदाय क्रमशः ठणक होत जाऊन अखेरीस बहुतकरून केंद्रस्थानीं त्याला घनरूपावस्था प्राप्त होते. येणेंप्रमाणें केंद्रस्थानीं घनीभावहि अधिक असतो व उष्णताहि अतिशय प्रमाणानें असते; ह्यासं-

* प्रकृतीच्या कांहीं भागांतील घनाधिक्यामुळें द्रव्यगुणांचा समतोलपणा जेव्हां भंग पावतो तेव्हां उत्क्रांतीला सुरुवात होते. या सांख्य कल्पनेची येथें आठवण झाल्यावांचून राहत नाहीं.

भोंवतीं जे घन पदार्थ असतात ते क्रमशः टणक होत असून उष्णताहि त्याच प्रमाणानें वाढत असते; ह्या प्रदेशाला ओलांडून जरा पुढें आलें ह्मणजे तो भाग फिरून टणकपणा टाकीत टाकीत द्रवरूपावस्थेप्रत जातो; फरक कायतो एवढाच कीं त्याचे सभोंवतीं वायुरूप द्रव्यांचें जें दाट आवरण असतें त्यांत आणि त्या द्रवरूपावस्थेंत प्रथमतः मर्यादेची रेषा आंखतां येत नाहीं. " (डा. लेवीस. जी. जेन्स कृत पृथ्वीची उत्क्रांति पृष्ठ १०९ पहा) उष्णतेच्या किरणपातानें जेव्हां उष्णतेचें मान कमी होतें तेव्हां वायुरूपावस्था जाऊन तिचे जागीं द्रवरूपावस्था येते. पुढें उष्णताभाव आणि रासायनिक संयोग यांच्या योगें ह्या द्रवरूपावस्थेंत क्रमशः बदल होत जाऊन तिला घनरूपावस्था प्राप्त होते. सारांश प्रो० स्टिव्हन्स यांचीहि कल्पना हिंदु तत्त्ववेत्त्यांच्या उत्क्रांतीसंबंधी कल्पनेशीं किती जुळते हें सहज लक्ष्यांत येईल. ह्या भारतवर्षीय प्राचीन उत्क्रांतिवाद्यांनीं प्रत्येक विश्वचमत्काराला उत्क्रांतितत्त्व लागू करून सूक्ष्म प्राणबीजापासून मानवी प्राण्यांचें उत्क्रमण कसें झालें हें दाखविलें आहे. त्यांना ही गोष्ट पूर्णपणें अवगत होती कीं मनुष्यामध्यें आणि नीच कोटींतील प्राण्यामध्यें जो विशेष आहे तो एक प्रकारचा नसून पर्यायाचा आहे. ह्यांचें ह्मणणें असें होतें कीं प्रत्येक प्राणबीज द्रव्य आणि शक्ति यांच्याप्रमाणें अविनाशी आहे व तें मनुष्यरूपानें दृष्टीस पडण्याचे पूर्वीं खनिज वस्तु वनस्पति आणि प्राणिकोटी यांच्या उत्क्रांतीच्या सर्व नानाविध अवस्थांतून भ्रमण करते. आणि हिंदु लोक खाण्याकरितां अथवा चैनी करितां प्राण्याची हिंसा करूं नये असें जें ह्मणतात त्यांतील इंगित तरी हेंच होय. हिंदु उत्क्रांतितत्त्ववेत्ते असें मानतात कीं प्रत्येक प्राणबीज नीच कोटींतून उच्चकोटीप्रत संक्रमण होईतों पावेतों कायम असतें आणि ह्याच बाबतींत कायतो त्यांचा आणि आजच्या शास्त्रज्ञांचा मतभेद आहे. पण त्यांतल्या त्यांत समाधान एवढेंच कीं अर्वाचीन शास्त्राचा कल वरील विधान सत्य आहे किंवा नाहीं हें पाहण्याकडे झुकला आहे. अशारीतीनें जगदुत्क्रांतिपद्धतीचें विवरण करून उत्क्रांति सहेतुक आहे किंवा निर्हेतुक आहे हें पाहण्याकडे त्यां-

चें लक्ष्य गेलें होतें. ह्या प्रश्नांस त्यांनीं (भारतवर्षीय मीमांसकानीं) काय उत्तर दिलें हें सांगण्यापूर्वीं असाच प्रश्न आधुनिक उत्क्रांतिवाद्यांच्या मनांत उद्भवला किंवा नाहीं, अथवा उद्भवला असल्यास त्यांचें त्यावर काय ह्मणणें आहे हें आपण पाहूं. हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. ह्या प्रश्नाच्या उत्तरावरच आमच्या इहलोकींच्या जीवयात्रेचा उद्देश कोणता व नीतिशास्त्र आणि धर्म यांची अवश्यकता काय ह्या प्रश्नांचा निकाल अवलंबून आहे. जर आह्मी सृष्टिसमुद्रावरील केवळ तरंग असूं आणि आह्मांला अस्तित्व हें दैवानें अथवा आकस्मिक लाभलें असेल तर आह्मांला ज्ञानार्जनाची अवश्यकता ती कोणती ? व आह्मी नीतिमान आणि सदाचारसंपन्न तरी कां व्हावें हेंहि आह्मांस समजत नाहीं. सद्गुणांत अर्थ—उपयुक्तता (utility) ह्मणून मुळींच नाहीं. पराकाष्ठा झाली तर जी अवघी १०० वर्षें टिकणार अशा आमच्या या शुष्क जीवनयात्रेकारितां परिस्थितिरूपी अंध शक्ती आह्मांस धडपड करावयास लावीत असतील तर आह्मीं प्रत्येक वस्तु नाहींशीं कां करूं नये ? कारण तसें केल्यानें आह्माला आपली जीवनयात्रा सुखासमाधानानें कंठितां येईल व संसारसुख आनंदानें भोगावयास सांपडेल. उत्क्रांतिपद्धत जर निर्हेतुक आहे तर सृष्ट पदार्थांत इतकी विचित्रता कां ? ह्या विश्वचमत्कारांत ‘ उत्क्रांति ’ ह्मणून अशी एखादी वस्तु तरी कां असावी ? ह्या प्रश्नांना अज्ञेयवादी आह्मांला कांहीं समजत नाहीं, असें उत्तर देतील. पण अशा उत्तरानें कां खऱ्या सत्यशोधकाचें समाधान होऊन तो अज्ञान बालकाप्रमाणें आपलें आयुष्य कंठण्यास तयार होईल ? आपल्या मनाच्या हल्लींच्या स्थितीवरून आणि समजशक्तीवरून पाहिलें असतां हें ध्यानांत येईल कीं जगांत अशा किती तरी वस्तु आहेत कीं ज्या अद्यापि आपणाला मुळींच ठाऊक नाहींत व ज्या डोळ्यांनीं सुद्धां कधीं पाहिल्या नाहींत. तेव्हां आह्मांला ठाऊक नाहींत अथवा आह्मीं त्या पाहिल्या नाहींत ह्मणून त्या वस्तु जगतांतच नाहींत असें कां आह्मांला छातीला हात लावून सांगतां येईल ? एखाद्या मुलाला जर आपण विचारिलें कीं तुला गुरुत्वाकर्षणाचा नियम ठाऊक आहे काय ?

तर तें 'मला ठाऊक नाहीं' असेंच उत्तर देणार आणि ह्मणून तेवढ्यावरून गुरुत्वाकर्षणच नाहीं असें कां एखाद्याला गृहीत धरतां येईल ? खात्रीनें नाहीं. तसेंच एखाद्या अशिक्षित मनुष्याला अथवा धर्माचा फाजील अभिमान बाळगणाऱ्या धर्मवेड्यास जगदुत्क्रांतीवर तुझा विश्वास आहे काय ह्मणून जर विचारिलें तर तो 'नाहीं' हेंच उत्तर देणार. व तें केवळ त्याच्या अज्ञानपणाचें प्रदर्शनच होणार नाहीं काय ? त्याचप्रमाणें जगदुत्क्रांति सहेतुक आहे किंवा निर्हेतुक आहे हें आपणाला कांहीं ठाऊक नाहीं असें जर एखाद्या अज्ञेयवाद्यानें म्हटलें तर त्याला अज्ञान मनुष्याच्या अथवा धर्मवेड्याच्याच पंक्तीला नेऊन बसवावें लागेल. इतर पुष्कळ बाबतींत त्याची उन्नति झाली असेल कदाचित्, पण प्रस्तुतच्या या आमच्या वरील प्रश्नासंबंधीं जर पाहूं गेलों तर सत्यान्वेषणाचे कामीं त्याची किंमत मुलांपेक्षां अधिक खात्रीनें लागावयाची नाहीं. असो. अज्ञेयवाद्यांची हीं असमाधानकारक उत्तरें घटकाभर बाजूला ठेवून देऊं आणि उत्क्रांतीचा उद्देश कोणता याविषयीं आजच्या नामांकित तत्त्ववेत्त्यांचें ह्मणणें काय आहे हें आपण पाहूं. आधुनिक उत्क्रांतिवाद्यांपैकीं बहुतेकांचें असें मत आहे कीं जीवनार्थ कलह, सृष्टीची स्वाभाविक आवडनिवड आणि सर्वोत्तमांचें अतिजीवन हींच काय ती उत्क्रांतीचीं तीन प्रमुख अंगें होत. अमेरिकेंतील उत्क्रांतिवाद्यांचे शिरोमणी **जॉन फिस्क** यांचें असें ह्मणणें आहे कीं "आमचे व्यक्तिगत जीव हे जिचे मुख्य भाग अशा जगदुत्क्रांतिपद्धतींत स्वाभाविक आवडनिवड खेरीज करून इतर कार्यकारी अंगें आहेत आणि जीवनार्थ कलह हीच काय ती सगळी गोष्ट असें मुळींच नाहीं." नीतितत्त्वांचीं मुळें विश्वाच्या अत्यंत खोल पायथ्याशीं आहेत. आणि गंभीरपणानें विचार केला असतां जगदुत्क्रांति नैतिकच आहे असें दाखवितां येईल असें मला वाटतें." (Through Nature to God by John Fisk पृ. ७९।८० पहा). पुढें आणखी एके ठिकाणीं ते असें ह्मणतात. "नीतिशास्त्र हें जगदुत्क्रांतीचें केवळ मुख्य अंग आहे इतकेंच नव्हे तर तिचें आदि अंत तेंच आहे. जगदुत्क्रांतीचा प्रचंड ओघ मानवी वर्गाला

पारमार्थिक पूर्णतेप्रत नेऊन पोंहचविण्याकडेच सर्वथैव झुकलेला आहे. उत्क्रांतीची खरी अवसानभूमि पारमार्थिक पूर्णता हीच होय. प्रारंभापासून तिच्या बरोबर उदय पावलेला दिव्य हेतु तो हाच. " जगदुत्क्रांतीचा नैतिक हेतूशीं अर्थार्थी कांहीं संबंध नाहीं असें जें आह्मास हक्सले सांगतात त्यांना उत्तरादाखल मला वाटतें हेंच विचारावें कीं " केवळ नैतिक हेतुकरितांच जगदुत्क्रांति नाहीं काय ? " विश्वांतून त्याचा नैतिक अर्थ काढून टाकिला तर बाकी मिथ्या मृगजलाशिवाय कांहींच उरत नाहीं एवंच **जॉन फिस्क** यांच्या ह्मणण्याप्रमाणें उत्क्रांतीची पर्यवसानभूमि आणि तिचा उद्देश मानवी स्वरूपाची नैतिक आणि पारमार्थिक दृष्टीनें पूर्णता होणें हाच आहे हें आपल्या लक्षांत येईल. " पारमार्थिक पूर्णता ह्मणजे, **जॉन फिस्क** सांगतात, नीतिशास्त्राची पर्यवसानभूमि व मानवी वर्तनक्रम पूर्ण होऊन त्याला कर्तव्य ह्मणून कांहींच जेथें उरत नाहीं असें स्थान "* (पृष्ठ ११४ पहा). पुढें लगेच ते ह्मणतात " पृथ्वीतत्त्व जेव्हां कालाच्या अनाद्यनंत भागावर परमेश्वराचें जगद्रूपी दृश्य वस्त्र शांतपणें पण अखंड विणलेलें असतें तेव्हां कोठें आपल्या द्यौष्पितराच्या स्वरूपांत पारमार्थिक पुरुषाची पूर्णता होणें ह्मणजे तद्रूप होणें हा जो सर्वतोपरि ज्ञानाविष्ट आणि पवित्र हेतु तत्सिध्यर्थ अपजय आणि दुष्कीर्ति ह्यांचा उदय प्रारंभापासूनच झालेला आहे हें कळण्यास प्रारंभ होतो. " (पृ. ११६ पहा).

आतां उत्क्रांतीच्या हेतूसंबंधीं हिंदु मीमांसकांचें काय ह्मणणें आहे हें पाहूं. ते असें ह्मणतात कीं प्रकृतीचा जगदुत्क्रांति करण्यांत हेतु असा आहे कीं ' **पुरुषाला** अथवा मनुष्याच्या खऱ्या आत्म्याला अज्ञान, अपूर्णता आणि अहंकार यांच्या बंधनांतून मुक्त होऊन मोक्षप्राप्ति व्हावी आणि पूर्ण स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घेतां यावा; पूर्ण स्वातंत्र्य ह्मणजे पारमार्थिक पूर्णता. ' आह्मी जावत्कालपर्यंत कोणत्याना कोणत्या तरी मा-

---

* येथें ' सर्वं **कर्मा**खिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ' या भगवदुक्तीचें वरील विचाराशीं किती तरी साम्य आहे, पहावें.

भा. क.

नसिक अथवा शारीरिक परिस्थितींनीं घेरलेले असूं तावत्कालपर्यंत आह्मी स्वतंत्र आहोंत असें आह्मांस ह्मणतां यावयाचें नाहीं.

उत्क्रांतिपद्धतीचें जर काळजीपूर्वक निरीक्षण केलें तर आपणास असें आढळून येईल कीं पशूच्या रूपाची उच्च स्थितीप्रत उत्क्रांति होणें हाच तिचा प्रकट उद्देश अथवा हेतु होय. या भूतलावर सद्यःस्थितींत पशूला जेव्हां मानवीरूप प्राप्त होतें तेव्हां तो पूर्णपदाप्रत येऊन ठेपला असें होतें व तेव्हांच पशूच्या उत्क्रांतीचा हेतु परिपूरित होतो. पृथ्वीच्या पाठीवर मानवी स्वरूपाहून उच्चतर असें स्वरूप निदान हल्लींच्या परिस्थितीच्या घनदाट छायेखालीं तरी असूं शकणार नाहीं. परिस्थितींनींच जर आपलें रूप बदललें तर मानवी रूपांतहि बदल झाल्यावांचून राहावयाचा नाहीं. पृथ्वीवर हल्लीं जें हवेचें दडपण आहे त्यांत जर न्यूनाधिक्य झालें तर मानवी प्राण्यांना मुळीं जिवंतच राहतां यावयाचें नाहीं; ज्यांना तशा प्रकारची हवा सुखावह होईल असे इतर कांहीं प्राणी जगले तर जगतील. आपणाला आपल्या जीवनार्थ एक विशिष्ट प्रकारचीच हवा लागत असते आणि त्या हवेंतच मानवी स्वरूपाची भरमराटी होते. प्रकृति प्रथमतः परिस्थिति निर्माण करिते, नंतर अदृश्य प्राणबीज उत्पन्न करते व त्या प्राणबीजापैकीं प्रत्येकाला आपापल्या ठिकाणचें अदृश्य सामर्थ्य व्यक्त करतां यावें म्हणून योग्य असें रूप देते. पशूंना नैतिक अथवा पारमार्थिक सामर्थ्य मुळींच नसतें; हें सामर्थ्य प्रकट करण्यास मानवी इंद्रियेंच कायतीं समर्थ आहेत. उच्च प्रतीचें ह्मणजे निष्काम प्रेम, आत्मत्याग, आणि आत्मदमन ह्या गुणांचा विकास करून दाखविण्यास जर कोणतें रूप आणि इंद्रियरचना समर्थ असेल तर तें एकटें मनुष्याचें होय. पशूला दाबांत ठेवणारा असा कायतो एकटा मनुष्यवर्गच होय. व जर मानवी देह ह्मणजे पशूच्या रुपाची पूर्णावस्था आहे आणि सृष्टीचे नियम विसंगत नसून जर एकसारखे आहेत तर पूर्णावस्था हीच उत्क्रांतीची अवसानभूमि आहे असें आपणास म्हणतां येणार नाहीं काय ? पशूची उत्क्रांति मानवीरूप प्राप्त होईपर्यंत चालू होती व त्याला मानवी रूप प्राप्त होतांच तिचें कार्य आटो-

पलें. प्राणिवर्गांतील श्रेष्ठतम असा जो मानवी वर्ग त्याला पूर्ण इंद्रियें प्राप्त झालीं ह्मणजेच रूपोत्क्रांतीचा हेतु परिपूरित होतो. प्राणबीजाला मानवीरूपानें प्रकट होण्यास किती तरी धडपड करावी लागली! नीचकोटींतील प्राण्यांना मानवी जन्म प्राप्त होणें अत्यंत दुर्लभ आहे, अशा अर्थाची संस्कृतांत एक ह्मण आहे. कारण असें कीं मानवी वर्गाचे ठिकाणीं आढळणाऱ्या उच्चतर आणि अत्यंत अवघड अशा इंद्रियरचनेच्या रूपानें आपलें कार्य प्रकट करण्यास प्रकृतीला (Nature) बराच काल लागतो. प्राण्यांमध्यें नीतिसंपन्न, सदाचारी आणि पारमार्थिक इत्यादि विशेषणांचा जर कोणी अधिकारी असेल तर तो एकटा मानवी वर्गच होय. मनुष्य अगदीं रानटी स्थितींत असला म्हणजे तो आणि पशु एकसारखेच असतात. त्यांच्यांत आणि पशूंत कांहींच फरक नसतो. पशूंच्या आणि त्याच्या ठिकाणीं सदसद्विवेकबुद्धीचा अभाव सारखाच दृष्टीस पडतो. फरक इतकाच कीं पशूच्या ठिकाणीं ती मुळींच नसते आणि मनुष्याच्या ठिकाणीं ती असते, पण तिचा विकास त्याचे हातून होत नसतो. सारांश मनुष्याचें उच्च स्थितीप्रत उत्क्रमण होतें याचा अर्थ असा कीं, पशुवर्ग सोडून नीतीच्या राजमार्गानें प्रवास करीत करीत पारमार्थिक पदापर्यंत येऊन ठेपतो. आपल्या नीच ‘ स्वयं ’ ची ज्ञानवत्ता अथवा अहंप्रत्ययता जेव्हां संकुचित आणि मर्यादित असते तेव्हांच तिला पश्ववस्था हें नांव शोभतें, कारण या स्थितींत तो असें समजत असतो कीं, माझा देह हाच ‘ मी ’ ह्मणून जो कोणी तो आहे. अथवा अन्य शब्दानें सांगावयाचें म्हणजे देह हाच आत्मा अशी त्याची भावना असते आणि त्याचे विचार आपल्यापुरतेच असतात. इतरासंबंधीं त्याचे मनांत कांहीं एक विचार येत नाहीं कारण स्वतःखेरीज इतर लोक त्याला दिसतच नाहींत. पशुवर्गांतून निघून नीतीच्या राजपथाचें आक्रमण करीत करीत आपण परमार्थ पदाप्रत येऊन ठेपतो. आपल्या नीच वृत्तींचा व्यापार जितका अधिक कमी होत जाईल तितके आपण अधिक वरच्या पायरीवर चढूं ह्मणजे पशुस्थिति जाऊन उच्चतर स्थिति प्राप्त होईल. जेव्हां आह्मी दुसऱ्यांचा जीव जाणूं, त्यांचा आत्मा ओळखूं;

त्यांच्या सुखार्थ झटून त्यांच्या उपयोगीं पडूं, तेव्हांच आह्मी मनुष्य या नांवास खरोखर पात्र होऊं; व येथूनच आमच्या सदाचरणाला प्रारंभ होणार. मग आमचे हक्क जसे आह्मी ओळखतों तसे ते आम्ही दुसऱ्यांचेहि ओळखावयास लागू. ' Do unto others as you would that they should do unto you ' लोकांनीं आपणाशीं अमुक तऱ्हेनें वागावें अशी जर आपली इच्छा असेल तर त्यांच्याशीं तशाच रीतीनें आपण वागलें पाहिजे. या वाक्यांत नीतीचें केवढें उदात्त तत्त्व भरलें आहे. ह्या नीतिनियमाचें अत्युत्कृष्ट उदाहरण आपणांला जीजस ख्राइस्टच्या वचनांत आढळतें. त्याचें असें सांगणें कीं (Love thy neighbour as thyself) आपला जीव जसा आपल्याला प्यारा वाटून आपण त्यावर प्रेम करतों तद्वत् आपण आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करावें. ' असें आपल्या हातून घडूं लागले ह्मणजेच आपण खरे सदाचारी बनलों असें समजावें. मग पशूप्रमाणें खाऊन पिऊन आणि प्रजोत्पत्ती करून आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता आपण संपविली असें वाटण्यास जागा राहणार नाहीं. उलटें आपणास असें कळून येईल कीं आपल्यासारखें दुसऱ्यावर प्रेम करण्यांतच खरें जीवितसाफल्य आहे. अहंकार विगलित होऊन खरी मुक्ति जी आपणास मिळावयाची ती याच वेळेस. दुसऱ्याच्या खऱ्या आत्म्यावर निष्काम प्रेम करण्यानेंच ही मुक्ति साध्य होते. व आपले खरे स्वरूपाची जेव्हां आपणांला ओळख पटेल तेव्हांच कायतें आपल्याला दुसऱ्यावर निष्काम प्रेम करतां येईल. आणि ह्मणून निरहंकार प्रेम हें स्वस्वरूप ज्ञानावर अवलंबून आहे. प्रत्येक व्यक्तिगत आत्मा पूर्णपदाप्रत जाऊन पोहोंचलाच पाहिजे असें हिंदुमीमांसकांचें मत आहे. आत्म्याला पूर्णस्थिति प्राप्त होणें ह्मणजेच परमार्थपदाला जाऊन पोहोंचणें होय. परमार्थावांचून मनुष्यास सदाचारी होता येईल. पण पारमार्थिक पुरुषाचे ठिकाणीं अनीति केव्हांहि दृष्टीस पडावयाची नाहीं. परमार्थाला सदाचाराची (moral life) कांहीं एक गरज नाहीं असें कित्येकांचें ह्मणणें आहे. पण ती चूक आहे. जगांतील मोठमोठ्या महात्म्यांनीं परमार्थ शब्दाचा जो अर्थ केला

आहे त्याहून त्याचा अर्थ कदाचित् निराळा असेल. नीतीची पूर्णावस्था ह्मणजेच परमार्थता. ह्मणून आपण पारमार्थिक आहों असें म्हणवून घेण्यापूर्वीं प्रत्येक व्यक्तिगत आत्म्याला नीतिदृष्ट्या पूर्ण झालेंच पाहिजे. नित्य दंडाच्या भीतीनें एखाद्यानें सदाचारी बनावें असें हिंदु तत्त्ववेत्ते सांगत नाहींत. तर उत्क्रांतीच्या सहज पद्धतीच्या द्वारा मनुष्यानें नैतिक व्हावें असें त्यांचें सांगणें आहे. जेव्हां आत्म्यास पूर्णानंदस्थिति प्राप्त होते तेव्हां त्याला आपल्या इहलोकींच्या संसारयात्रेंत प्रतिक्षणीं स्वस्वरूपाची ओळख होऊन तो आपलें दिव्यरूप प्रकट करीत असतो. आणि येथेंच उत्क्रांतीच्या कार्याची परिसमाप्ति होते. उत्क्रांतीची अवसानभूमि जी पारमार्थिक पूर्णावस्था त्या अवस्थेप्रत आपणांपैकीं सर्वांना जाऊन पोहोंचावयाचें आहे. अतएव **श्रीकृष्ण परमात्म्यानें** आपल्या गीतेंत म्हटलें आहे " ज्यानें आपलें दिव्य स्वरूप ओळखलें तो उत्क्रांतीच्या सर्व अवस्थांतून पार पडून त्याला अत्युच्च स्वर्गसुख प्राप्त होतें, सर्व बंधनांतून तो मुक्त होतो आणि इहलोकीं नित्यानंदसागरांत पोहत असतो. "

। ॐ तत्सत् ।

श्री.

' मरणानंतर आत्म्यास अस्तित्व असतें काय ? '

नंबर ७

हन्ता चेन्मन्यते हन्तुं हतश्चेन्मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥

कठोपनिषद् अ. १ व २ श्लो. १९.

भावार्थः—मारणारास ' मी मारिलें ' अथवा ज्याला मारिलें त्याला ' मी मारिला गेलों ' असें वाटत असेल तर आत्म्याला मारितां येत नाहीं अथवा तो मरतहि नाहीं हें दोघांसहि माहीत नाहीं.

वेदांत विषयाचा परिचय करून देणारीं जीं अनेक उपनिषदें आज उपलब्ध आहेत त्यांत दशोपनिषदें प्रधान गणलीं आहेत. या दशोपनिषदांपैकींच ' कठोपनिषद् ' हें एक आहे. हें यजुर्वेदांतील कठशाखान्तर्गत आहे असें मानिलें आहे. कठ हें नांव एका ऋषिविशेषाचें असून त्यानें सांगितलेलें हें उपनिषदसुद्धां त्याचेच नांवानें प्रसिद्ध आहे. ह्यांत प्रथमपासूनच आचार्य आणि शिष्य यांचा संवाद आहे. वाज नांवाच्या अन्नदानानें ज्याची कीर्ति दिगतरीं पसरली व त्यावरून ज्याला राजश्रवा हें नांव पडलें त्या राजश्रवा ऋषीचा पुत्र जो वाजश्रवस त्याला नचिकेता या नांवाचा एक मुलगा होता. ह्याला आपल्या पूर्वजन्मींच्या शुद्ध संस्कारानुरूप व वासनानुरूप बाल्यावस्थेपासूनच आत्मज्ञानाची उत्कंठा लागली होती. पुढें कांहीं कारणावरून त्याचा पिता राजश्रवस हा त्याचेवर फार रागावला व त्याचा त्यानें त्याग केला. नंतर नचिकेता हा यम नांवाच्या ब्रह्मज्ञानी आचार्याजवळ जाऊन ब्रह्मविद्या शिकला. यांत आचार्यांचा उपदेश फारच हृदयंगम असा आहे.

या उपनिषदालाच ' मृत्यूचें गुह्य ' (The secret of death) हें नांव देऊन त्याचें इंग्रजींत भाषांतर सर एडविन अर्नाल्ड नामक एका आंग्ल तत्ववेत्यानें केलें आहे. त्यानें त्याचें प्रथमारंभींच पुढील श्लोकाच्या पूर्वार्धाचें भाषांतर घेतलें आहे.

येयं प्रेते विचिकित्सा मनुष्येऽस्तीत्येके नायमस्तीतिचैके ।
एतद्विद्यामनुशिष्टस्त्वयाहं वराणमेष वरस्तृतीयः ॥ २० ॥

अ. १ व. १.

याचा अर्थ असा कीं, शंका ही आहे. जेव्हां मनुष्याला मरण येतें तेव्हां कित्येकांच्या मतें तो अगदींच नाश पावतो, व कित्येकांच्या मतें तो मेला तरी अस्तित्वांत असतो. यांपैकीं खरें कोणतें? या प्रश्नाला नानाविध उत्तरें मिळालीं आहेत. अध्यात्मविद्या, तत्त्वविद्या, शास्त्र, आणि धर्म या सर्वांनीं हें कोडें उकलण्याचा प्रयत्न केला आहे. व एकसमयावच्छेदेंकरूनच दुसरीकडे हा प्रश्न अजीबात दाबून टाकण्याचे व मरणानंतर मनुष्य अस्तित्वांत असतो किंवा नाहीं ही चौकशीच होऊं नये एतदर्थ प्रयत्न घडले आहेत. ह्या महत्वाच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याकरितां शेंकडों तत्त्ववेत्यांनीं सर्व प्रकारचीं प्रमेयें पुढें मांडलीं आहेत.

हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून नास्तिकवादी (athiestic) आणि अज्ञेयवादी (agnostic) होऊन गेले; त्यांनांसुद्धां ' जड देहाच्या मरणानंतर आत्मा अस्तित्वांत असतो ' हें ह्मणणें कबूल नव्हतें. ह्यांना चार्वाक मताचे लोक असें ह्मणतात. त्यांची अशी समजूत आहे कीं जडदेह हाच आत्मा आहे व देहाखेरीज इतर ठिकाणीं त्याला अस्तित्व नसतें. आणि देह वसनाबरोबर त्याचाहि नाश होतो. ज्या वस्तूंचें ज्ञान इंद्रियांना होत नाहीं अशा वस्तूंवर ते मुळींच विश्वास ठेवीत नाहींत. त्यांचीं वचनें अशीं आहेत कीं " जावत्कालपर्यंत आपणाला या जगतांत रहावयाचें आहे तावत्कालपर्यंत उपभोगादि चैन करण्यांत कधीं कमी करूं नये. जेणेंकरून आपणाला सुख मिळेल अशा रीतीनें आपला जीवनव्यापार चालू ठेवावा, आणि सं-

सारसुख पूर्णपणें भोगावें. भविष्यकालाविषयीं यत्किंचित्‌हि विचार मनांत आणूं नये. आपल्या सर्व गरजा आणि वासना परिपूर्ण करून घ्याव्यात व तसें करण्यास जर द्रव्यबल नसेल तर तें भिक्षा मागून अथवा ऋण काढून मिळवावें. कारण एकदां ह्या जड शरीराची राखरांगोळी झाली ह्मणजे मग आपल्या कृतकर्माबद्दल जबाबदार कोणीहि नाहीं."

अशा मताचे चार्वाक प्रत्येक देशांत आढळतात. उदाहरणार्थ इंग्लंडच घ्याना. तेथें ओल्ड टेस्टमेंट ह्यांत सालोमन ह्यानें काय उद्गार काढिले आहेत ते पहा. तो म्हणतो " मनःपूतं वागावें, आपलें अन्न आनंदानें सेवन करावें आणि प्रफुल्लित अंतःकरणानें मद्यपेय घ्यावें... आपल्या पत्नीबरोबर आनंदानें काळ घालवावा व आपल्या हाताच्या तावडींत जें जें ह्मणून कांहीं सांपडेल तें सर्व पूर्णपणें पार पाडण्यास आपलें अंगचें सामर्थ्य खर्ची घालावें.कारण पुढें ज्या थडग्याची वाट आपण धरली आहे तेथें मुळींच काम नाहीं, युक्त्या प्रयुक्त्याहि नाहींत अथवा ज्ञान आणि शहाणपण यांपैकीं एकहि नाहीं. [Eul. IX. 7- 9. 10 पहा] असल्या तत्ववेत्त्यांचे अनुयायांचा सुळसुळाट जिकडे तिकडे मोठ्या त्वरेनें होत असून त्यांची संख्याहि प्रत्यहीं वाढत आहे. त्यांच्यापैकीं कोणी (Atheists) निरीश्वर वादी, कोणी (.Agnostics अज्ञेयवादी तर कोणी (Materialistic) देहात्मवादी असे आहेत. ह्यांच्या मतें आत्मा हा जड शरीरांहून भिन्नपणें आस्तित्वांत असतो असें मानणारे अथवा पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारे लोक अगदीं अज्ञानी आणि अत्याचारी असून महा मूर्ख आहेत; व स्वमतानुयायी मात्र हुशार आणि बुद्धिमान आहेत असें ते समजतात. ज्याला आत्मा ह्मणतां येईल असा कोणताहि पदार्थ नाहीं असें त्यांच्या पैकीं बहुतेकांचें अगदीं ठाम मत आहे. कोणत्याहि प्रकारचीं प्रमाणें त्यांच्यापुढें मांडा, त्यांची खात्री ह्मणून व्हावयाची नाहीं अथवा त्यांच्या मतामध्यें यत्किंचत्‌हि फरक पडावयाचा नाहीं. कारण इंद्रियांच्या आटोक्याच्या पार असणाऱ्या अथवा इंद्रियांच्या मर्यादित शक्तीनें ज्यांचें

ग्रहण करतां येत नाहीं, अशा एखादे वस्तूचें आस्तित्वच मुळीं ते कबूल करित नाहींत. आत्म्याच्या आस्तित्वाविरुद्ध त्यांनीं भराभर ग्रंथ लिहून ठेविले आहेत, आणि मनाच्या ठिकाणीं उद्भवणाऱ्या असल्या ह्या प्रश्नांचीं तोंडें त्यांनीं अजीबाद दाबून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. पण इतकेंहि करून अखेरीस निष्पन्न काय झालें ? ' आपण मेल्यानंतर आपल्या मागें काय राहतें ? हा जो अंतर्भूत प्रश्न बहुतकरून प्रत्येक मनुष्याचे अन्तःकरणांत आपोआप उद्भवतो तो त्यांना मुळींच बंद करतां आला नाहीं. हजारों वर्षांच्यापूर्वीं हा प्रश्न जसा निवत असे तसाच आजहि निवत आहे. तो कोणालाहि बंद करितां यावयाचा नाहीं; कारण त्या प्रश्नाचा आपल्या प्रकृतीशीं व स्वरूपाशीं अगदीं नित्य संबंध आहे.

हा प्रश्न सर्व राष्ट्रांतील आणि सर्व देशांतील पुण्यश्लोक साधू आणि आचारभ्रष्ट पापी, पैगंबर आणि धर्माध्यक्ष, राव आणि रंक या सर्वांना सारखाच उद्भवला होता. व त्याच प्रश्नाची आज आपण चर्चा करीत आहोंत व भविष्यत्कालींहि त्याची अशीच चर्चा होईल. आपण आपल्या जीवनार्थकलहांत व संग्रामांत गुंतलों असतां कदाचित् तितक्यापुरता आपणांला विसरहि पडेल. आपण आपल्या सुखांत ऐषआरामांत आणि ऐंद्रियोपभोगांत जेव्हां अगदीं गर्क असूं तेव्हां आपणांला ह्या प्रश्नाचें कदाचित् भान राहणार नाहीं. नाना तऱ्हेच्या खोट्या कुतर्कांनीं आपण आपलें सांत्वन करून आपण स्वतःस फसवूनाहि घेऊं. पण मृत्यूचें उग्र स्वरूप अकस्मात् दृष्टीस पडलें, आपले अगदीं जवळचे आणि अत्यंत प्रिय असे कोणी मृत्युपंथाला लागले ह्मणजे मग आपण शुद्धीवर येतों. किंचित्कालपर्यंत आपण अगदीं स्तब्ध बसतों आणि ही गडबड कसची आहे, हा कोठें गेला आहे, तो अद्याप जिवंत आहे कीं काय ? त्याचें काय झालें असावें इत्यादि प्रश्नमालिकेचा आपण आपल्या मनाशींच विचार करित असतों. आपल्या अंतःकरणांत गुप्तपणें वास करित असलेला हा प्रश्न नवीन रूपधारण करून आपल्यापुढें उभा राहतो आणि आपल्या मानसिक शांततेचा भंग करतो. मग

आपण चौकशीला आरंभ करतों. पण सुरवातीलाच मक्षिकापात अशांत-ला प्रकार घडतो ह्मणजे चौकशीला सुरवात करावयाचाच उशीर तों आपल्यासमोर एक मोठी अपरिहार्य अडचण येऊन उभी राहते; ज्यांची मति अल्प त्यांची गति येथेंच खुंटते. त्या अडचणींतून पार पडण्याकरितां त्यांचे हातून जे प्रयत्न घडतात ते फलद्रूप होत नाहींत. आतां ती अडचण ह्मणजे ही कीं शरीर हेंच आत्म्याचें कारण आणि आत्मा हा शरीराचें कार्य आहे असा झालेला ग्रह. ज्यांना ही अडचण दूर सारतां येईल त्यांना मरणानंतर आत्म्याला अस्तित्व आहे किंवा नाहीं हें सहज कळून येईल. एकादा विशिष्ट पुरुष मरणानंतर अद्भुत रीतीनें जिवंत झाला अशा आख्यायिकेवरून मरणानंतर आत्म्याला अस्तित्व व सर्व मनुष्यांना एक प्रकारचें जीवित आहे असें अनुमान काढण्याची ही प्राचीन पद्धति आतां कोणाही विचारी मनुष्याच्या बुद्धीस रुचत नाहीं. एकाद्याचे वचनावर आंधळ्याप्रमाणें विश्वास ठेवण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. आम्ही आतां लहान मुलाप्रमाणें अज्ञान नाहीं. आह्मांला अधिक पोक्त विचार करावयाचा आहे. व ह्या प्रश्नाचा अधिक बारकाईनें खल करावा असें आम्हांस वाटतें. ज्यांचा लोकोत्तर मृतोत्थापनावर विश्वास आहे, ते कदाचित् असें म्हणतील कीं, ज्याना तें खरें वाटत नाहीं त्यांनीं ह्या प्रश्नाची वाटाघाटच करूं नये. पण हें त्यांचें ह्मणणें क्षणभरदेखील कबूल करतां येत नाहीं. हल्लींचा काळ असा येऊन ठेपला आहे कीं या प्रश्नाचा उहापोह शास्त्रीय, अध्यात्मिक, तात्त्विक इत्यादि सर्व दृष्टीनें होणें जरूर आहे.

आतां शरीर हें आत्म्याचें कारण आहे अथवा आत्मा हें शरीराचें कार्य आहे हें जें एक उत्तर आपणांस मिळतें तें कितपत समाधानकारक आहे हें पाहूं. आत्मा, कल्पनेचा पिंड (Manof thought) अथवा त्याला वाटेल तें नांव द्या तो ज्या द्रव्यांनीं आपलें हें जड शरीर बनलें आहे त्या द्रव्याच्या एकीकरणाचें कार्य आहे असें गृहित धरून चालल्यास आह्मी असें विचारतों कीं आपला हा जड देहच कशाचें

कार्य आहे अथवा त्याचें आदिकारण कोणतें ? ज्याच्या साह्यानें द्रव्यांचें एकीकरण होऊन त्यांचें शरीर हें रूप बनलें अशी शक्ति कोणती ? तुमचा देह एका आकाराचा व माझा देह दुसऱ्या आकाराचा घडविणारी ही शक्ति कोणती ? ह्या विशेषांचें आदिकारण कोणतें ? देहात्मवादी चार्वाक मताचे जे लोक आहेत ते असें उत्तर देतील कीं हें आपलें शरीर आमच्या मातापितरांच्या शरीरापासून उत्पन्न झालें आहे. आणि ज्या अर्थी मातापितरांना हें शरीर उत्पन्न करतां येतें त्या अर्थी त्यांचें शरीर हेंच आमच्या शरीराचें कारण आहे पण हें खरें खरें उत्तर नव्हें. कारण ह्यांत ह्या शरीराचें आणि द्रव्याच्या संयोगाचें कारण न दाखवितां ते दुसराच एक अनेक द्रव्यांचा संयोग कारण ह्मणून दाखवित आहेत. आणि ह्मणून मूळचा प्रश्न आहे तो आहेच. आह्मी असें विचारितों कीं हा जो दुसरा एक द्रव्याचा संयोग पहिल्या संयोगास कारण ह्मणून दाखविण्यांत येत आहे त्याचें–अर्थात् मातापितरांच्या शरीराचें–कारण कोणतें ? तर त्यावरही त्यांचें उत्तर फिरून तेंच यावयाचें. ह्मणजे मातापितरांचें शरीर हें तिसऱ्या एका संयोगाचें कार्य अथवा परिणाम होय. पण अशानें प्रश्नाचें समर्पक उत्तर मिळत नाहीं व द्रव्याच्या संयोगाच्या खऱ्या कारणाचा पत्ता लागत नाहीं आणि एक संयोग दुसऱ्या एखाद्या मागील संयोगाचें कार्य आणि मागील संयोग हा त्याच्या मागील संयोगाचें कार्य अशी परंपरा लावीत गेल्यास त्याचा अंत कधींच लागावयाचा नाहीं व अखेरच्या संयोगाचें तरी कारण कोणतें हा प्रश्न फिरून आहे तो आहेच. शरीराच्या द्वारा आत्म्याची ओळख करून देणें ह्मणजे कार्यावरून कारण समजून देणें होय व हा घोड्यापुढें गाडी जुंपण्यासारखाच प्रकार होय.

आजच्या काळांतील प्राणिगुणधर्मशास्त्रज्ञ, शरीरशास्त्रवेत्ते, रोगनिरूपणविद्यावेत्ते आणि कित्येक अनात्मवादी व तसेच अज्ञेयवादी या सर्वांचें असें मत आहे कीं विचार, बुद्धि, ज्ञान, मन अथवा आत्मा यांची उत्पत्ति अनेक द्रव्यांच्या संयोगापासून झालेलें जें शरीर त्या-

पासून होते. वैद्यकीय शाळांतील आणि विश्वविद्यालयांतील लॅबोरेटरी-मधून विद्यार्थ्यांना असें शिक्षण देण्यांत येतें कीं विचार अथवा बुद्धि अथवा ज्ञान हें केवळ मेंदूचें एक कार्य होय. शिवाय त्यांना असेंही सांगण्यांत येतें कीं विचाराचें प्रत्येक विशिष्ट स्वरूप ह्मणजे मज्जातंतूच्या विशिष्ट भागाच्या चैतन्याचा परिणाम होय. उदाहरणार्थ जेव्हां आपण वस्तूंचें अवलोकन करीत असतों अथवा दृष्ट पदार्थाविषयीं विचार करीत असतों तेव्हां ज्यांचा दृष्टीशीं संबंध असतो असे जे आपल्या मेंदूचे भाग ते चेतनासंयुक्त असतात. आणि जेव्हां आपण कर्णेंद्रियांचा उपयोग करीत असतों तेव्हां कर्णेंद्रियांशीं ज्यांचा संबंध आहे असा भाग चैतन्ययुक्त असतो. आणि हीच गोष्ट इतर इंद्रियांच्या व्यापारांसंबधीं लक्ष्यांत आणावयाची.

विचाराचें उगमस्थान मज्जातंतु हें होय, असें प्रतिपादन करणारे आजच्या शास्त्रज्ञांत जे आहेत त्यांचें असें ह्मणणें आहे कीं 'मन आणि मेंदूचें कार्य यांची अवसानभूमि एकच आहे ? कारण जर मेंदूच्या क्रिया बंद पडल्या तर मन, बुद्धि, ज्ञान आणि सर्व प्रकारचे मनोव्यापार हेही खटकन् बंद पडतात. प्रत्येक वेगवेगळ्या मुख्य मनोव्यापारास मेंदूच्या विशिष्ट व मुख्य भागाची क्रिया कारण आहे. आत्मा ह्मणून निराळी वस्तुच नाहीं आणि जर आत्माच नाहीं, तर मृत्यूनंतर आत्मा अस्तित्वांत असतो किंवा नाहीं हा वादच संभवत नाहीं. आत्म्याला अस्तित्व नाहीं असेंच ते प्रतिपादन करीत असतात. ऐंद्रिय स्थितींत बदल झाला ह्मणजे चेतना भ्रष्ट होऊं लागते आणि अखेरीस इंद्रियचक्रें बंद पडलीं ह्मणजे ती नष्ट होते. ज्या ज्ञानसामुग्रीचें मन बनलेलें असतें ती मेंदूपासून तयार होते. मेंदूच्या द्वारा विचाराची उत्पत्ति कशी होते याचें निरूपण करतांना कित्येक असें सांगतात कीं ज्याप्रमाणें उदराचे ठायीं चर्वितान्नाचें पचन करण्याची व यकृताचे ठायीं पित्तोत्सर्ग करण्याची शक्ति पूर्वनियुक्त अथवा तदंगभूतच असते तद्वत् मेंदूचीही रचना अशीच कांहीं विशिष्ट प्रकारची असते. त्यापासून विचार आणि ज्ञानवत्ता हीं उत्पन्न होतात. अन्न आपल्या वशावाटें आं-

त उतरून एकदां जठरांत जाऊन बसलें ह्मणजे तेथें जसे त्याच्या स्थितींत बदल होऊन त्याचे ठायीं नूतन धर्म उत्पन्न होतात तद्वतच ज्ञानवाहिनी शिरांमधून येऊन मज्जातंतूवर उमटलेल्या संस्काराचें कल्पना, विचार, मनोवृत्ति, इच्छा, चेहऱ्यावरील स्वरूप, मुद्रा, संभाषण, स्वभाव इत्यादि प्रकारें रूपांतर होतें. एवंच विचार अथवा आत्मा हा मेंदूचा विकार होय. मेंदूच नाहींसा झाला ह्मणजे मग आत्मा राहणार कोठें? तो त्याचे बरोबरच नाहींसा होणार. येथें जें संस्काराचें अन्नाशीं तारतम्य दर्शविलें आहे त्यावरून असा बोध होतो कीं जणूं काय ते मज्जातंतूवरील संस्कार हे वस्तूचीं स्थूलरूपें होत. अथवा कळणें अथवा जाणणें हा ज्याचा नैसर्गिक धर्म आहे अशा मनापासून ते स्वतंत्रपणें अस्तित्वांत आहेत. अति विख्यात अनात्मवाद्यांपैकींच **बुचनेर** हा एक आहे. याचें असें ह्मणणें आहे कीं 'मनुष्याचे व्यापार स्नायूंच्या व इतर अवयवांच्या चलनापासून—चळवळीपासून—भिन्न नाहींत आणि विचार करणें हा व्यापारही या सर्वसाधारण स्वाभाविक चळवळीचाच एक विशिष्ट प्रकार आहे असेंच मानिलें पाहिजे. **जे. लुइस** याचें असें ह्मणणें आहे कीं ज्याप्रमाणें एखादी धातूची कांब धगधगीत विस्तवांत खुपसून ठेविली असतां ती हळूं हळूं तापते व अग्निसंपर्कानें तींत क्रमशः—प्रथम उज्ज्वल तांबडा, नंतर अगदीं गहिरा तांबडा, व अखेरीस तेजस्वी शुभ्र असे वर्णभेद तिजवर दृष्टीस पडून तिच्यांतील उष्णतेचें प्रमाण जसजसें वाढत जातें तसतसें तिच्यापासून बाहेर पडणारी उष्णता आणि प्रकाश यांचा पूर्णपणें विकास होतो. तद्वतच सजीव प्राण्याचे ठिकाणीं असणारे ज्ञानतंतु उत्तेजक पदार्थांच्या सांनिध्यानें चलन पावून त्यांच्या अंतर्गत चैतन्याचा पूर्ण विकास होतो.

मि. पर्सिव्हल लोवेल यांचें असें ह्मणणें आहे कीं "आपल्याला जेव्हां एकादा विचार सुचतो अथवा काय ह्मणतात नाहीं कीं एखादी कल्पना डोक्यांत येते तेव्हां अंतर्यामीं जी कांहीं क्रिया घडत असते ती बहुधा अशा प्रकारची असते. अगदीं सूक्ष्म कणाच्या रूपानें

मज्जातंतूचे प्रवाह स्नायूंतून वर चढत चढत शरीरांत जेथें मज्जातंतूचा कोश आहे त्याच्यामधून सरते शेवटीं त्वक्संबंधीं कोशाला येऊन मिडतात. आणि त्वक्कोशाला स्पर्श झाला ह्मणजे तेथें फिरून सूक्ष्म परमाणूंच्या एका पुंजक्याशीं गांठ पडते; ह्या परमाणूंच्या ठिकाणीं मात्र वरच्या इतका फेरबदल होत नाहीं. मज्जातंतूच्या प्रवाहाला येथें जो प्रतिबंध पोहोंचतो त्याच्याशीं झगडल्यानें कोशांच्या ठिकाणीं चैतन्य उत्पन्न होतें. ह्या चैतन्यालाच आह्मीं ' ज्ञानवत्ता ' ' अहंप्रत्ययता ' असें ह्मणतों. सारांश Consciousuess ज्ञानवत्ता ह्मणजे ज्ञानतंतूची जागृत–उद्बोधित–अवस्था होय. शारीरिक शक्तींचें रूपांतर कल्पना, विचार आणि मनोविकार ह्यांत होतें असें ह्मणणारे जे पाश्चात्य अनात्मवादी आहेत ते हें रूपांतर या वरील पद्धतीनें घडतें असें सांगतात. **मि. हर्बर्ट स्पेन्सर** हे अज्ञेयवादी असून त्यांचेंहि असेंच ह्मणणें आहे कीं ज्ञानवत्तेच्या ज्या अवस्था त्या शारीरिक शक्तींचें रूपांतर आहेत. पण तें रूपांतर कोणत्या पद्धतीनें होतें याचा मात्र ते उल्लेख करीत नाहींत. त्यांनीं तें गूढ ' अज्ञेय ' आहे असें ह्मणून तेथेंच हात टेकले आहेत. ह्मणजे हें रूपांतर घडतें यांत त्यांना बिलकुल संदेह वाटत नाहीं, पण तें कसें घडतें हें मात्र त्यांना कळत नाहीं. अथापि **स्पेन्सर** साहेब मेंदूलाच आत्मा ठरवितात आणि त्याची ते पिआनोशीं (एक इंग्लिश वाद्य) तुलना करतात. त्यांच्या ह्मणण्याचा आशय हा आहे कीं कल्पना ह्मणजे हार्मोनिअमच्या पडद्यांतून निघणाऱ्या सुराप्रमाणें होत. पुढल्या पडद्यावर सूर काढिला ह्मणजे मागील पडद्यांचा सूर मंद होत होत अगदीं ऐकूं येईनासा होतो. व हे सूर ऐकूं येईनासे झाले तरी पडदे आणि मंदसूर हे पेटींत असतातच. हें ह्मणणें जितकें सयुक्तिक आहे तितकेंच मागील कल्पना मेंदूंत (आत्म्यांत) कायम असतात हेंहि म्हणणें सयुक्तिक आहे. (Principles of Psychology V11 p.485). परंतु बाजाच्या पेटींतून सूर निघतात हें खरें, पण ते काढावयास कोणी तरी लागतो, हें **स्पेन्सर** साहेब या वेळीं विसरले आहेत. जर वाजविणारास गाण्याचें अंग नसेल तर पेटीच्या

अंगांत अशी कांहीं करामत नाहीं कीं ती आपण होऊनच गाण्यास प्रारंभ करील, हें कोणासही कळणारें आहे; कर्त्यावांचून क्रिया कधींहि निर्माण व्हावयाची नाहीं. अतएव स्पेन्सर साहेबांची ही कल्पनेची पिआनोशीं केलेली तुळना अपुरी आणि अयोग्य आहे हें ध्यानांत येईल. यापेक्षां ज्याप्रमाणें पेटी वाजविणारा पेटीच्या पडद्यांतून सूर काढीत असतो तद्वतच व्यक्तिगत आत्मा अथवा मन हें ज्ञानतंतू आणि मज्जातंतूपासून भिन्न असून त्यांच्या द्वारें आपलें कार्य करीत असतें.

दुसरे एक प्रो. डब्ल्यू के. क्लिफर्ड नांवाचे अनात्मवादी आहेत. त्यांनाहि हें संयोगतत्त्व (Combination theory) मान्य असून, त्यांचें असें म्हणणें आहे कीं " ज्ञानवत्ता ही अनेक मूलद्रव्यांच्या एकीकरणानें बनलेली वस्तु आहे. मेंदूचें कार्य हें देखील तसेंच आहे म्हणजे तें अनेक ज्ञानवाहिनींच्या कार्यांचें एकीकरण होऊन बनलेली वस्तु आहे. ज्ञानवत्तेच्या प्रत्येक अवस्थेबरोबर मेंदूतून एक ज्ञानवाहिनीचा प्रवाह निघतो. ज्ञानवत्ता ही केवळ अथवा सरळ वस्तु नसून संमिश्र अशी आहे. ती अनेक विकारांचा संयोग होऊन बनलेला एक प्रवाहच होय. कित्येक प्रतिकूल गोष्टींच्या योगें आपल्या ज्ञानवत्तेचा संबंध आपल्या शरीराशीं जडला आहे. व तोहि सगळ्या ज्ञानवत्तेचा अखिल शरीराशीं नुसता एकच संबंध आहे असें नव्हे; तर आपल्या मेंदूचे जे भाग आहेत त्या भागांशीं ज्ञानवत्ता ही खंडशः संलग्न आहे. आणि जर अशा प्रकारचा संबंध आपल्या सूक्ष्म शरीराशींहि असेल तर यावरून असें अनुमान निघतें कीं, जड शरीराबरोबरच सूक्ष्म शरीराचाहि नाश झाला पाहिजे. " एवंच आत्मा हा मेंदूपासून अथवा जड शरीरापासून वेगळा नाहीं, असें ह्मणणारे जे देहात्मवादी आहेत ते परिणामकल्पनेचा अथवा संयोगतत्त्वाचा बादरायण संबंध जोडून मन आणि बुद्धि हीं द्रव्य अथवा द्रव्यसंयोग यांपासून उत्पन्न झालीं आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न करितात.

अशा प्रकारचे अनात्मवादी हिंदुस्थानांतहि होते, नव्हते आणि नाहींत असें नाहीं. चार्वाकमताचे आणि बौद्धमताचे लोकांनीं हींच

मतें प्रतिपादन केलीं होतीं. ह्या लोकांचेंहि मत असेंच होतें कीं आत्मा हा स्थूल शरीराहून वेगळा अस्तित्वांत नाहीं. बौद्धानुयायांचें तर असें मत होतें कीं, आपलें हें स्थूल शरीर हेंच मन आणि बुद्धीचें कारण होय. अर्थात् मन आणि बुद्धि हीं शरीराचें कार्य होय. आणि ज्ञानवत्ता अथवा अहंप्रत्ययता हीं शारीरिक चैतन्यरहित शक्ति आणि जड द्रव्यें यांच्या संयोगाचा परिणाम होय. ते दीप आणि दीपज्योति हें उदाहरण देत असत. आपलें शरीर हा दिवा आणि बुद्धि अथवा अहंप्रत्ययता ही त्या प्रज्वलित दिव्याचा प्रकाश.

पण वेदान्त तत्त्ववेत्त्यांनीं या देहात्मवाद्यांच्या प्रमुख प्रमाणांतील हेत्वाभास दाखवून त्यांचें खंडण केलें आहे. वेदान्तांत असें सांगितलें आहे कीं द्रव्य (matter) अथवा पदार्थ (विषय object) विश्वाची एक केवळ अर्धबाजू आहे व दुसरी अर्धबाजू मन. पदार्थ द्रष्टा (विषयी Subject) अथवा आत्मा होय. एकीवरून दुसरीचें अनुमान करणें ही गोष्ट असंभवनीय आहे. प्रथमतः द्रव्य आणि शक्ति यांच्याविषयींच्या आपल्या ज्ञानाचें जर आपण पृथक्करण करूं लागलों तर आपल्या असें नजरेस येईल कीं, द्रव्य आणि शक्ति स्वतंत्रपणें आपणांला कळणें अशक्य आहे. जें कांहीं आपणांला कळतें तें एक मानसिक विकार आहे. याखेरीज कांहीं नाहीं. द्रव्याचें ज्ञान ह्मणजे आपल्याला ठाऊक असलेल्या एका मनोविकाराचें ज्ञान होय. या पलीकडे दुसरें कांहीं नाहीं. द्रव्याला अस्तित्व असतें असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां तरी ज्याच्या पलीकडे आपणांला कांहींहि कळत नाहीं, अशा एका विशिष्ट मानसिक विकाराचेंच आपणांला ज्ञान असतें. मनाची धांव आपल्या स्वतःपलीकडे कधींहि जाऊं शकत नाहीं. ह्मणजे मनाला मनाचे पलीकडे जातां येत नाहीं. आत्मा अथवा मन हें मेंदूचें कार्य आहे असें जें आपलें ज्ञान त्या ज्ञानाला देखील दुसऱ्या एका मनाचें अथवा जाणत्याचें अस्तित्व गृहीत धरावें लागतें. ज्ञानवत्ता अथवा आत्मा हा द्रव्यसंयोगाचा परिणाम आहे असें जेव्हां आपण म्हणतों ते-

व्हां त्या ह्मणण्याला देखील त्या कल्पनेचें ज्ञान असणाऱ्या दुसऱ्या एखाद्या मनाची अवश्यकता लागतेच.

मानवी मेंदू छिन्न विछिन्न करूनहि जेव्हां त्यांत एखाद्याला आत्म्याचा अथवा मनाचा मागमूस लागत नाहीं व तेणेंकरून तो त्याचें अस्तित्वच कबूल करीत नाहीं अथवा मन अथवा आत्मा हा मेंदूचें एक कार्य आहे असें हट्टानें प्रतिपादन करतो, तेव्हां अशा प्रकारचे ज्ञानावरून मनाचें अथवा आत्म्याचें अस्तित्व गर्भितार्थानें सिद्ध होतें याचें त्याला भान राहत नाहीं. असें मिल्लचें ह्मणणें आहे तें अगदीं यथार्थ आहे. ज्ञान मग तें द्रव्याचें असो अथवा मेंदूचें असो अथवा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचें असो, तें अहंप्रत्ययतेवर अवलंबून असतें. आणि असें ज्या अर्थी आहे त्याअर्थी अहंप्रत्ययतेचा अथवा ज्ञानवत्तेचा, बुद्धीचा व अखिल ज्ञानाचा जो आधार व ज्याचे साहाय्यानें एखाद्याला द्रव्याच्या अस्तित्वाचा अथवा तत्संयोगाचा बोध होऊं शकतो अशा मूलाधाराची पूर्वता अथवा प्राधान्य (Priority.) नाकबूल करणें ही गोष्ट असंबद्ध होईल. **जी. जे. रोमेन्स** ह्मणतात 'ज्या मनांत विचारांचे अंकूर उत्पन्न होतात त्या मनाचें अस्तित्व अगोदर गृहित धरल्यावांचून दृश्य जगतांतील कोणत्याहि गोष्टीविषयीं आपणांला विचार करतां येत नाहीं, आणि अतएव निदान आपला जितका संबंध पोंहोंचतो तितक्या बाबतींत तरी प्रत्येक वस्तूचेपूर्वी मन हें अवश्यमेव आहेच असें ह्मणावें लागतें. आपल्या दृष्टीनें अस्तित्वाचा खरा प्रकार हा एकटाच, आणि तर्कानें जे अस्तित्वाचे प्रकार सिद्ध करावयाचे आहेत ते याच्याशींच ताडून पाहिले पाहिजेत. 'मन हें गतीचें कार्य आहे,' हें 'मन हें मनाचेंच कार्य आहे. ' याचें कांहीं अंशीं अस्पष्ट परिभाषेंत रूपांतर आहे. तेव्हां माझ्या समजुतीनें अनात्मवाद्यांचें सामान्यतः खंडन अशा प्रकारें होईल." अर्वाचीन शास्त्रावरून असें सिद्ध झालें आहे कीं गतीपासून गतीवांचून अन्य कांहींहि उत्पन्न व्हावयाचें नाहीं व हें जर शास्त्रसिद्ध सत्य असेल तर मज्जातंतूच्या सूक्ष्म परमाणूंच्या गतीपासून ज्ञानवत्ता (Consciousness) अथवा बुद्धि (Intelligence उत्पन्न

होते असें आपणांस कसें ह्मणतां येईल. कारण ज्ञानवत्ता अथवा बुद्धि ही गतीसारखी गति नसून गतीला जाणणारी आहे. ह्मणून वेदांतांत जें सांगितलें आहे कीं, ज्ञानवत्तेचें उगमस्थान द्रव्याचे ठिकाणीं नाहीं तर तें स्वतंत्र आहे. ज्याला आपण द्रव्य ह्मणून ह्मणतों तें केवळ ज्याच्या द्वारा 'ज्ञानवत्ता' ही आपलें स्वरूप प्रगट करते असें एक साधन होय.

पाश्चात्य देशांतील डाक्तर **शिलर** नांवाच्या विख्यात तत्त्ववेत्त्याचीं मतें अशाच सारखीं आहेत. तो असें म्हणतो कीं " द्रव्य ही ज्ञानवत्ता उत्पन्न करणारी वस्तु नव्हे, तर उलट ज्ञानवत्तेला मर्यादित करून तिच्या प्रगतीला कांहीं एक प्रकारच्या मर्यादेनें संकुचित करते. भौतिक सृष्टि (material organisation) परमाणुघटित वस्तूंतून ज्ञानवत्ता उत्पन्न करूं शकत नाहीं; पण उलटी ती आपल्या मंडलांत ज्ञानवत्तेचें आविष्करण संकुचित मात्र करते. आणखी इतर अज्ञेयवाद्यांचें ह्मणणें असें आहे कीं " आत्मा ही सद्वस्तु आहे अशी कल्पना करणें ह्मणजे निवळ कल्पनेनें मानससृष्टि रचणेंच होय. कँट नामक प्रसिद्ध तत्ववेत्ता म्हणतो कीं " आत्म्याच्या रचनेसंबंधानें त्याला स्वतंत्र अस्तित्व आहे किंवा नाहीं याविषयीं ज्ञान मिळविण्यास आपणांस कांहींही साधन नाहीं; "

भरतभूमींतील कांहीं बौद्धानुयायी तत्ववेत्त्याप्रमाणेंच **डेविड ह्यूम** याचें मत आहे. तो असें ह्मणतो कीं " मानवी आत्मा ह्मणजे केवळ संस्कार आणि विचार यांचा संघात (bundle of impremious and ideas) होय, दुसरें काय " आणखी तो ह्मणतो कीं " जेव्हां मी स्वस्वरूपांत अगदीं एकनिष्ठपणें प्रवेश करतों, तेव्हां 'शीतोष्ण' प्रकाश अथवा अंधकार, राग अथवा द्वेष, सुख अथवा दुःख अशा प्रकारचा कांहींना कांहीं तरी विशिष्ट प्रकारचा बोध होऊन मी नेहमीं अडखळतों. गाढ निद्रा लागून किंचित्कालपर्यंत जेव्हां माझे अंगची संवेदनशक्ति नाहींशी होते तेव्हां माझे स्वरूपाचें मला भान नसतें व मी अस्तित्वांतच नसतों असें खरोखर ह्मणतां येईल. आणि मृत्यूनें

जर माझे शरीरांतील अखिल चैतन्य नाहींसें केलें आणि हा देहघट भंग पावल्यानंतर विचार करणें, वाटणें, पाहणें, राग द्वेष करणें इत्यादि मनोधर्म नष्ट झाले ह्मणजे मला वाटतें माझा सर्वस्वीं नाश होईल. अथवा मी पूर्णपणें अवस्तु बनण्यास याहून आणखी कशाची गरज आहे याची मला कल्पनाच करतां येत नाहीं. '' तेव्हां ह्यूमचे ह्मणण्याप्रमाणें आपले आत्मे प्रतिरात्रीं आपल्याला गाढ निद्रा लागली ह्मणजे मरण पावतात. पण मानवी आत्म्याच्या प्रकृतीचें हें विवरण कितीजणांना पटेल याची शंकाच आहे.

जे केवळ ऐंद्रिय ज्ञानावरच भिस्त ठेवितात ते मेंदूला छिन्न विच्छिन्न करून आत्म्याला पाहण्याचा प्रयत्न करतात. पण इंद्रियांना जेव्हां तो प्रत्ययास येत नाहीं तेव्हां ते त्याचें अस्तित्वच नाकबूल करितात. व ज्याप्रमाणें प्राचीनकाळीं जिज्ञासुवर्गानीं आत्म्याला शोधून काढण्याचा प्रयत्न केला तद्वतच ह्यांनीं देखील आत्म्याला अंतःकरणांत अथवा उदरीं शोधून काढण्याचा प्रयत्न केला तरी परिणाम तोच होईल. ' आत्मा हा शरीराचें कार्य आहे ' अथवा ' तो द्रव्यसंयोगाचा परिणाम आहे ' अथवा ' आत्म्याला मुळीं अस्तित्वच नाहीं ' या कल्पनेला आधारभूत ह्मणून अनात्मवाद्यांचीं आणि अज्ञेयवाद्यांचीं जीं प्रमेयें आहेत तीं सर्व तर्कशास्त्रदृष्ट्या किती मिथ्या आणि विसंगत आहेत हें थोडें काळजीपूर्वक निरीक्षण केलें असतां सहज लक्षांत येईल. प्राचीन काळापासूनच निरनिराळे देशांतील तत्ववेत्ते अशा प्रकारचे चार्वाकमताचे सिद्धान्त वारंवार काढीत आले आहेत. पण अशा ह्या विचारांनीं आपले मनाचें सांत्वन होईल काय? व मृत्यूनंतर आणखी जन्म आहे काय ? हा जो प्रश्न आपण वारंवार विचारतों तो बंद होतो काय ? आत्मा ह्मणून मुळीं नाहींच असा प्रतिध्वनी आपल्या कर्णकुहरीं लाखों वेळ जरी घुमला तरी मृत्यूनंतर पुढें जन्म नाहीं अशी आमची खात्री कधींहि होणार नाहीं; आमचा सर्वस्वीं नाश होईल असा विचार देखील आह्मांला शिवत नाहीं; आमचें व्यक्तित्व कायमचें नष्ट होईल हें ह्मणणें आह्मांला विश्वसनीय वा-

टत नाहीं. अशा प्रकारचीं उत्तरें आपल्या बुद्धीला पटत नाहींत व तेणेंकरून मनाचें समाधानहि होत नाहीं. अथवा अन्य कोणत्याहि रीतीनें जीवाचें सांत्वन होत नाहीं. अशा उत्तरावरून सत्याविषयींचें अज्ञान मात्र उघड होतें. जें नित्य असतें तेंच सत्य होय; आणि अस्तित्व हें जर आज सत्य आहे तर तें अनंत कालपर्यंत सत्यच असलें पाहिजे.

आत्म्याला शरीराहून वेगळें अस्तित्व नाहीं असें जर आपण ह्मणूं लागलों तर आपल्या आयुष्यांत पुष्कळ वेळां घडणाऱ्या पुष्कळ गोष्टींचें व यूरोप व अमेरिका येथील Psychical Rescarch society च्या रिपोर्टांतून वर्णिलेल्या खऱ्या चमत्कारांचें स्पष्टीकरण करतां येत नाहीं. आपल्या खोलींत पलंगावर अथवा आरामखुर्चीवर विश्रांति घेत असतांना पुष्कळ नास्तिक व अज्ञेयवादी लोकांनीं आपल्या प्रतिमा अथवा आपलीं लिंगशरीरें पाहिलीं आहेत. त्यांच्या चरित्रांत वर्णिलेल्या गोष्टीकडे आपणाला दुर्लक्ष्य करतां यावयाचें नाहीं. असल्या प्रकारच्या प्रतिमा अथवा लिंगशरीरें बोलल्याचालल्याचीं अथवा त्यांनीं नानाविध इतर गोष्टी केल्याचीं उदाहरणें आहेत. तेव्हां ह्या गोष्टींचा उलगडा कसा करावयाचा. हिंदुस्थानांत योगी पुरुषांनीं आपलीं लिंगशरीरें प्रकट करून दाखविल्याचीं अनेक वर्णनें आहेत. व असल्या गोष्टी ह्मणजे एक तर नजरबंदीचा खेळ, दृष्टीची भूल, अथवा नाहीं तर मेंदूची भ्रमिष्टावस्था असावी असें प्रतिपादन करून त्यांचें स्पष्टीकरण करण्याचे नानाविध प्रयत्न आजवर घडत आले आहेत. पण जर ते सत्याच्या कसोटीला उतरतात तर त्यांना दृष्टीची भूल असें तरी कसें ह्मणतां येईल. सूक्ष्म शरीरें दिसल्याचीं उदाहरणें योग्य रीतीनें खरीं ठरलेलीं अशीं अनेक आहेत. अशी कल्पना करा कीं एखादा आपल्या निजण्याच्या खोलींत दार बंद करून एकटाच बसला आहे व त्याच्या कामधंद्यासंबंधीं एखादा महत्त्वाचा व बिकट असा प्रश्न उद्भवला आहे अथवा त्याला एखादा कूट प्रश्न सोडवावयाचा आहे व तो न सुटल्यामुळें त्याचें मन अगदीं व्यग्र झालें आहे,

व एकाएकीं अगदीं त्याच्याच सारखा माणूस त्याचे दृष्टीस पडून तो त्याच खोलींतील टेबलावर कांहीं लिहीत आहे, व थोडासा विचार केल्यावर ज्या प्रश्नानें आपलें डोकें आज इतके दिवस गोंधळवून टाकिलें होतें त्याच प्रश्नाचें उत्तर त्यानें लिहिलें आहे" असें वाटतें. तेव्हां याचा उलगडा तुह्मी कसा करणार? हा भ्रम तरी कोणच्या प्रकारचा? याहून बलवत्तर आणि अधिक समाधानकारक असें कोणतें प्रमाण तुह्मांला पाहिजे? हा दिव्यदृष्टीचा अथवा टेलीपथीचा प्रकार आहे असें ह्मणून त्या गोष्टी पूर्णपणें समजावून सांगतां यावयाच्या नाहींत. कित्येक म्हणतील हें झूट आहे. पण नुसत्या खोट्या ह्मणण्यानें खऱ्या गोष्टी खोट्या होत नसतात हें लक्षांत बाळगिलें पाहिजे. एखादी गोष्ट नाकबूल जरी केली तरी तिच्या स्वरूपांत बदल होत नसतो, खऱ्या गोष्टी त्या खऱ्याच, मग त्या आह्मांला कबूल असोत वा नसोत. आमच्या प्रचलित उपपत्तीनें त्यांचा उलगडा होवो अथवा न होवो. दिव्यदृष्टि Telepathy आणि विचारांचें अदृश्यपणें स्थलांतर (Thought transference दुसऱ्याकडून त्याच्या न कळत आपल्या विचारानुरूप कार्य घडवून आणणें) ह्यांनीं ह्या वरील गोष्टींचा उलगडा होत नाहीं. असल्या गोष्टींचें स्पष्टीकरण आत्मा शरीराहून वेगळा अस्तित्वांत आहे ह्या कल्पनेनेंच कायतें करतां येणारें आहे. ज्या कल्पनेनें बऱ्याच गोष्टी सिद्ध करून दाखवितां येतात ती कल्पना खरी असें शास्त्राचें मत आहे. आणि त्याहून अधिक चांगली कल्पना अथवा अधिक चांगलें विवरण आपणांस सांपडेपर्यंत तीच कल्पना मान्य करावी हें अधिक चांगलें. जे उत्पादनकल्पनेवर अथवा संयोगकल्पनेवर भरंवसा ठेवितात त्यांचे डोळे असल्या गोष्टींनीं दिपून जातात यांत नवल नाहीं. पण दुसऱ्याकडून आपल्या विचारानुरूप त्याच्या नकळत कार्य घडवून आणतां येतें या कल्पनेवर जे भरंवसा ठेवितात अथवा अन्य शब्दानें बोलावयाचें झाल्यास ज्याच्या द्वारा आत्मा आपलें सामर्थ्य प्रकट करतो तें साधन मेंदू अथवा मानवी शरीर हें होय असें ज्यांचें मत आहे त्यांना ह्या प्रतिमेसंबंधाचे

खरे खरे चमत्कार स्पष्ट करून दाखविण्यास मुळींच अडचण पडत नाहीं.

हारवर्डचे प्रो. वुइल्यम जेम्स असें म्हणतात कीं, ह्या विचारवाहन कल्पनेचा (Transmission theory) देखील ज्या अनुभवांचें स्पष्टीकरण उत्पादनकल्पनेच्या योगें कष्टानेंच होतें त्या अनुभवाच्या यच्चयावत् वर्गाशीं संबंध आहे.

तसेंच मेल्यानंतर लागलींच कांहींजण आपल्या प्रिय मित्रांच्या नजरेस पडल्याचीं खरीं उदाहरणें आढळतात आणि अशीं उदाहरणें भरतभूमींत, युरोपांत आणि प्रत्येक देशांत अनेक आहेत. आमचे पश्चात् आमच्या मुलांबाळांची जोपासना आपण करावी अथवा आमचा एवढा शेवटचा निरोप त्यांना कळवा असे जे अंतकाळीं आपल्या स्नेह्यांपाशीं उद्गार काढितात तींच माणसें मरणानंतर त्या स्नेह्यांच्या नजरेस पडल्याचीं उदाहरणें घडण्याचा संभव आहे. असल्या गोष्टींचा अनुभव घेण्यास आत्म्याचें प्रकटीकरण करण्यास एकत्र जमणाऱ्या ब्रह्मवाद्यांच्या परिषेंदत जाण्याची जरूर आहे असें नाहीं. अशा प्रकारचे अनेक अनुभव लोकांना संसारांत आणि तेहि स्वगृहींच मिळाले आहेत व ते त्यांनीं चांगले तावून सुलाखून पाहिले आहेत. अशा ब्रह्मवाद्यांचा परिषदेंत जे प्रकार घडतात त्यांत नव्याण्णव हिस्से खोटे असतात; आणि असा खोटा धंदा ज्यांनीं पत्करला आहे त्यांचे कृत्यांपैकीं अनेक कृत्यें मोठ्या अनुकंपनीय रीतीनें उघडकीस आलीं आहेत. अशा लोकांचा मुख्य हेतु द्रव्यार्जन अथवा चरितार्थयाचन हाच असतो.

हिंदुस्थानांत हिंदु लोक अशा धंदेवाल्या भोंदूवर सहसा भरंवसा ठेवीत नाहींत. व अशा सोंगामध्यें कांहीं तरी तथ्य असेल तर आत्म्यांना अशा कारणासाठीं त्रास देणें हें अधिक निंद्य आहे असें ते समजतात. अशा लोकांची सामान्य फकिरांत गणना होत असते. अशा प्रकारच्या अनेक फकिरांचीं कृत्यें जरी उघडकीस आलीं आहेत, आणि आत्म्याचें प्रकटीकरण ह्मणजे पुष्कळदां मोहनी अथवा ऐंद्रजालिक विद्येचे खेळ आहेत असें जरी सिद्ध झालें आहे तरी पण ह्या खोटप-

णावरून आत्म्याला शरीराहून वेगळें अस्तित्व नाहीं अथवा मृत्यूनंतर पुनर्जन्म नाहीं असें ह्मणण्यास कारण उत्पन्न होत नाहीं. आतां अशी शंका मात्र सहज उद्भवेल कीं जर मृत्यूनंतर आत्मा हा अस्तित्वांत असतो तर तो आपलें व्यक्तित्वहि कायम ठेवतो काय ? ह्या प्रश्नाला वेदान्तशास्त्र हो ह्मणूनच उत्तर देतें. भूमीशीं संलग्न अशा भूतांचे आत्मे देखील आपलें व्यक्तित्व कायम ठेवतात. हिंदु तत्त्वज्ञानाचा फारसा परिचय नाहीं असे कांहीं पाश्चात्य लेखक आत्म्याचा कायमचा विनाश हाच हिंदुधर्माच्या दृष्टीनें अत्युच्च पुरुषार्थ होय असें ह्मणतात. असल्या पोरकट विधानांवरून या लेखकांचा हिंदूंविषयीं दुराग्रह व अज्ञान मात्र स्पष्ट दिसून येतात. ज्यांना आपल्या धर्मावांचून इतर धर्मांत चांगलें कांहीं दिसतच नाहीं अथवा जे आपले हेतु सफलीकृत करण्याकरतांच आपली लेखणी झिजवितात अशा ख्रिस्ती पाद्र्यांनीं लिहिलेले हिंदुधर्माचे वृत्तांत वाचून आह्मी मोठें पंडित बनलों असें जे समजतात असेच लेखक अशा प्रकारचीं विधानें करतात. पण तोच हिंदूंचा प्रचंड लेखसंग्रह पहा. त्यांत मृत्यूनंतर आत्मा नाश पावतो असें एकहि वाक्य दृष्टीस पडावयाचें नाहीं. उलट आत्मा नित्य आहे. अमर आहे. तो अनाद्यनंत आहे. जन्ममृत्यूविकाररहित आहे असेंच दृष्टीस पडेल. भगवद्गीतेंत म्हटलें आहे.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ अ. २ श्लो. २३

भावार्थः—आत्म्याला शस्त्रें तोडीत नाहींत. त्याला अग्नि जाळीत नाहीं, पाण्याच्यानें तो भिजविला जात नाहीं अथवा वायूच्यानेंहि तो सुकविला जात नाहीं.

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ अ. २ श्लो. १९

राल्फ वाल्डो इमरसन नामक तत्त्ववेत्त्यानें ह्या वरील श्लोकाचें भाषांतर आपल्या ‘ ब्रह्म ’ नामक काव्यांत केलें आहे तें असें:—

If the red Slayer think he Slays,
Or if the Slain think he is Slain,
They know not well the Sublle ways,
I keep and pass and turn again,

ह्मणजे ' मी मारतों ' व ' मी मारला जातों ' अथवा ' आत्मा मरतो' व ' मारतो ' असें जें ह्मणतात त्या उभयतांनाहि ' मी ज्या सूक्ष्म मार्गानें राहतों, जातों आणि फिरून येतों तो मार्ग कळत नाहीं. '

व्यक्तित्व कायम ठेवण्यासंबंधीं वेदान्तांत असें सांगितलें आहे कीं प्रत्येक जीवात्मा मृत्यूनंतर इहलोकीं मिळविलेले सर्व अनुभव, संस्कार आणि कल्पना आपल्याबरोबर घेऊन जातो. मन, ज्ञान, बुद्धि आणि ऐंद्रिय सामर्थ्य हीं बरोबर नेऊन आपल्या स्वतःच्या विचारांचे व आचारांचे परिपाक भोगीत असतो.

हिंदूंच्या उत्तरक्रियांचे वर्णनाकडे जर दृष्टि फेंकिली तर असें आढळून येईल कीं एकादा मनुष्य मेला ह्मणजे त्याचे आप्त त्याच्या नांवानें पुण्यकर्मं करितात. मृत मनुष्याच्या नांवानें केलेले सद्विचार, प्रार्थना, आणि पुण्यकर्में ह्यांच्या योगें मृताच्या आत्म्याला सद्गति मिळण्यास साहाय्य होतें अशी त्यांची समजूत आहे. आणि जर आपण त्यांच्याविषयीं नित्य चिंतन करून त्यांच्या कल्याणाचा विचारहि मनांत न आणतां केवळ आपल्या मनकामना सिद्ध होण्याकरितां त्यांनीं आह्मांजवळ रहावें ह्मणून त्यांची प्रार्थना केली तर ज्या जडदेहांचा त्याग करून ते पुढें चालते होतात त्या देहांशीं संलग्न असलेलें जें विशिष्ट व्यक्तित्व त्या व्यक्तित्वालाच त्यांना चिकटून राहण्यास आपण लावतों असा त्यांचा ग्रह आहे. व्यक्तित्व हें नेहमीं देहाशीं संबद्ध असतें.

ज्या ज्या वेळीं देह जन्मास येतो त्या प्रत्येक वेळीं आपणांला आपल्या परिस्थित्यनुरूप एखादें व्यक्तित्व प्राप्त होत असतें, आणि जर आपण एका आत्म्याला एकाच व्यक्तित्वांत अथवा एकाच प्रकारच्या परिस्थितींत कोंडून ठेविलें तर पारमार्थिक क्षेत्रावरील आत्म्याच्या उ-

न्नतीचें द्वारच बंद केल्यासारखें होईल. अतएव आपल्या मृत मित्रांना आपलें अस्तित्व ज्या भूमीवर आहे तिजवर परत आणण्याऐवजीं सद्विचार पाठवून त्यांना साहाय्य करणें हें अधिक चांगलें.

वैदिक कालच्या अति प्राचीन ग्रंथावरून असेंच दिसून येतें कीं त्या कालीं लोक मरणानंतर मृतांचे आत्मे पितृलोकीं जातात असें मानीत असत. पितृलोकींच्या राजाला यम अशी संज्ञा आहे. त्या लोकीं यमाचा प्रवेश प्रथम झाला आणि ह्मणूनच मागाहून जे तेथें गेले त्यांचा तो राजा बनला.

हिंदु लोक स्वर्ग आहे असें मानितात, पण नरकावर मात्र ते विश्वास ठेवीत नाहींत. हिंदूंचा स्वर्ग ख्रिस्त्यांच्या अथवा मुसलमानांच्या स्वर्गाहून निराळा आहे. हिंदु लोक असें मानतात कीं, स्वर्गलोक ह्मणजे जेथें मृताचे आत्मे आपल्या पुण्याचरणाच्या मधुर फलांचा आस्वाद घ्यावयास जातात तें भुवन होय, तेथें ते कांहीं काळपर्यंत ह्मणजे आपल्या सत्कर्माचें फळ पूर्णपणें मिळेतोंपर्यंत राहतात आणि नंतर पुण्यसंचय क्षीण झाल्यावर फिरून मर्त्यलोकीं प्रवेश करतात. ख्रिस्ती, मुसलमान आणि पार्शी लोक हे असें मानतात कीं स्वर्ग ह्मणजे जेथें सर्व प्रकारचे ऐंद्रियोपभोग घ्यावयास मिळतात. जेथें कोणत्याही प्रकारची यातायात न पडतां अनायासें सुखसागरांत पोंहावयास सांपडतें असें स्थान होय. हिंदूंना अशा प्रकारचे स्वर्ग इष्ट वाटत नसून ते असें ह्मणतात कीं हे सर्व स्वर्गीय सुखोपभोग सृष्टचमत्कारांपैकींच असून कालभंगुर आहेत. एखादा पुण्यात्मा स्वर्गांत इंद्रसुखासारखे भोग लक्षावधी वर्षेंपर्यंत अथवा एक कल्पपर्यंत जरी भोगीत राहिला अशी कल्पना केली तरी त्या काळाची अनाद्यनंत काळाशीं तुलना करून पाहिली असतां तो अफाट सागरांतील एका बिंदुमात्राप्रमाणें ठरतो. ह्मणून हिंदु लोक ह्मणतात कीं स्वर्गांत पुण्यकर्माचे परिपाक भोगिल्यानंतर प्राण्याला आपापल्या मनप्रवृत्त्यनुरूप अथवा सामर्थ्यानुरूप मर्त्यलोकीं अथवा दुसऱ्या एखाद्या लोकीं जन्म घ्यावा लागतोच लागतो. अतएव भगवद्गीतेंत ह्मटलें आहे कीं,

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥ अ. ८

भावार्थः—ब्रह्मलोकापर्यंत जे सात लोक आहेत ते पुनः पुनः जन्ममरण येणारे आहेत, पण हे कुंतिपुत्रा अर्जुना माझ्याकडे आलें असतां पुनर्जन्माचें अस्तित्व नष्ट होतें.

पर्शिअन लोकांची समजूत अशी होती कीं जीवात्मा मरण पावला ह्मणजे तीन दिवसांनीं फिरून उठून आपले विचार, उच्चार, आचार या त्रयींच्या अनुरोधें स्वर्गलोक अथवा नरक यांपैकीं कोठें तरी जातो. हीच इराणी लोकांची स्वर्गाविषयींची कल्पना पुढें ज्यू लोकांनीं आणि ख्रिस्ती लोकांनीं उचलली. प्राचीन हेब्र्यू लोकांनीं तर पुनर्जन्माविषयीं विचार करण्याचा स्वतःला मुळीं त्रासच दिला नाहीं. ते असें मानीत होते कीं परमेश्वरानें मानवी प्राण्याच्या नाकांत प्राणवायू घालून त्याला सजीव केलें आहे. हा प्राण ज्या जुहोवापासून आला आहे त्या जुहोवाप्रत फिरून परत जाणार; त्याचप्रमाणें यच्चयावत् जीवजंतूंच्या ठिकाणचा प्राणवायु जेथून आला तेथेंच परत जाणार. " जे नियम मानवी वर्गाला लागू आहेत ते नीच पशूलाही लागू पडतात. " ते ह्या प्राणवायूला कधीं कधीं "Nephesh" "Ruach," अथवा " Neshama " असें ह्मणत होते. इजिप्शिअन लोक एक प्रकारचा लिंगदेह आहे असें मानीत असत. लिंगदेह ह्मणजे शरीराची छाया अशी त्यांची समजूत असे; जोंपर्यंत शरीर तोंपर्यंत ती छाया. ह्यावरूनच मृतशरीररक्षणाची कल्पना उदय पावली. शरीराला जर एखादे जागीं जखम अथवा दुखापत झाली तर तशीच ती लिंगदेहाला अथवा आत्म्याला होते अशी त्यांची कल्पना होती म्हणून आत्म्याला कांहींएक धक्का न पोंहचावा या हेतूनें ते शरीराचें संरक्षण करीत होते

चाल्डीअन्सही लिंगदेह मान्य करीत होते; ते म्हणत कीं शरीराच्या नाशाबरोबर त्याचाहि नाश होतो. मेलेला मनुष्य पुनः सजीव होतो असें समजून ते मृतोत्थापनाची अपेक्षा करीत. ख्रिस्तानुयायांपैकीं बहुतेकांचा हाच समज आहे. ह्या मृत शरीराला मालमसाला घालून पु-

रून ठेवण्याच्या वहिवाटीचा उगम हीच कल्पना असावी. मृत्यूनंतर शरीर पुनः सजीव होतें असें अद्याप ख्रिस्तानुयायांपैकीं कांहींचें मत आहे. बाकीच्यांचा मात्र मृतोत्थापनावर भरंवसा नाहीं.ते असें मानतात कीं जरी आत्मा अनादि नाहीं तरी तो अनंत आहे. आत्म्याच्या उत्पत्तीसंबंधीं ख्रिस्ताची कल्पना अशी आहे कीं सर्वशक्तिमान परमेश्वर जन्माचेवेळीं प्रत्येक आत्मा नवीन निर्माण करतो. पण हिंदूंचें म्हणणें असें आहे कीं ज्याला आदि आहे तें अनंतकालपर्यंत कधींच राहू शकत नाहीं; त्याला अंत असलाच पाहिजे. परमेश्वरानें अथवा दुसऱ्या एकाद्यानें आत्मा निर्माण केला आहे असें हिंदु मानीत नाहींत. आत्मा हा नित्य आहे व नित्यपणा हा त्याचा स्वभाव आहे. तो अनाद्यनंत आहे. मृत्यु म्हणजे नाश असें हिंदु लोक समजत नाहींत. ते मृत्यु म्हणजे 'देहांतर' अथवा 'रूपांतर' असें समजतात. व अशा प्रकारचा मृत्यु जन्मास आलेल्याच्या पाठीमागें अखंड लागलाच आहे. सृष्टचमत्कारांतील जीवित हें देहांतर अथवा रूपांतराच्या शिवाय अशक्य आहे, आपण प्रत्यहीं मरत आहों. प्रत्येक सातव्या वर्षीं आपल्या देहांतील प्रत्येक कण जुनें रूप टाकून देऊन नवें रूप धारण करतो.

प्रो० **हक्स्ले** ह्मणतात "Debemur morti nos nostraque" ह्या खेदजनक वाक्याचा अर्थ रोमन कवीनें जों कांहीं केला आहे त्यापेक्षां गहनार्थानें आणि गुणधर्मशास्त्रानें जीविताचे द्वारावर लिहिलें आहे. जीव कोणत्याहि रूपाचा आश्रय करो, गोमयजाच्या रूपाला जावो, कीटक असो अथवा मनुष्य असो, सरते शेवटीं त्याचा नाश होऊन खनिज आणि चैतन्यहीन घटकावयांत त्यांचें पृथक्करण होतें इतकेंच नव्हे, तर तो सदोदित मरतच असतो, व हें विरुद्ध मत जरी कर्णाला कटु लागेल तरी तो मेल्याशिवाय जगतच नाहीं असेंच ह्मणावें लागतें, शरीराच्या प्रत्येक अणुरेणूचें जरी रूपांतर होतें तरी आपलें अस्तित्व अखंड राहतें. कौमार्यावस्थेपासून तें जरावस्थेपर्यंत आपली 'मी' पणाची भावना व आपलें जीवैक्य आपण कायम ठेवतों. ह्या मीपणाच्या सातत्याचें एखाद्या भौतिक अथवा रसायनशा

त्राच्या नियमानें स्पष्टीकरण कधींहि करतां यावयाचें नाहीं. वेदांतमतानुरोधें पाहतां विचार अथवा मनोविकार अथवा ज्ञान हे विकार एखाद्या यांत्रिक अथवा परमाणूंच्या गतीनें कधींहि उत्पन्न होणारे नाहींत. ‘ गतीपासून गतिवांचून अन्य कांहींच उत्पन्न होत नाहीं’ असा अर्वाचीन शास्त्राचा सिद्धांत आहे. आणि असें जर आहे तर शरीराच्या परमाणूंच्या गतीपासून ‘ ज्ञानवत्ता ’ कशी निर्माण होणार! ती (ज्ञानवत्ता) कोणत्या तरी श्रेष्ठ सामर्थ्याचे अथवा शक्तीचे कार्यापासून उत्पन्न झालेली असली पाहिजे. ह्या श्रेष्ठ शक्तीलाच साधारणपणें “आत्मा” असें म्हणतात. आत्मा हा शरीरांतील परमाणूंच्या विकारांना वश नाहीं, उलटें तो त्या विकाररूपी कार्याचें कारण आहे असें म्हणणें अधिक शोभेल. तो अविक्रिय आणि अतएव अविनाशी आहे. तो ज्ञानावस्थेच्या सातत्याचा आणि व्यक्तित्वाच्या ऐक्यभावाचा पाया होय. ज्याप्रमाणें प्रत्येक सातवे वर्षी आपल्यांत रूपांतर होऊनहि आपलें व्यक्तित्व आपण कायम ठेवतों तद्वतच शेवटच्या देहान्तरानंतर अर्थात् आपल्या शरीराच्या रूपाचें अखेरचें पृथक्करण झाल्यानंतर व्यक्तिवाचक आत्मे म्हणून आपण जीवंत राहूं. भगवद्गीतेंत म्हटलें आहे.

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥ अ० २

भावार्थः—ज्याला देह आहे अशा आत्म्याच्या देहामध्यें बाळपण, तरुणपण, म्हातारपण ज्याप्रमाणें असतात, त्याप्रमाणेंच आत्म्याला निरनिराळ्या देहाची प्राप्ति होते. तेथें असें झालें म्हणून शहाणा मनुष्य मोह पावत नाहीं.

ॐ तत्सत्

॥ श्रीसद्गुरुवे नमः ॥

' पुनर्जन्म. '

नंबर ८

विश्वांतील दृश्य चमत्कार कार्यकारणांच्या सार्वजनिक नियमानें बद्ध आहेत. कार्य हें दृश्य अथवा इंद्रियगोचर असतें; आणि कारण हें अदृश्य अथवा इंद्रियातीत असतें. झाडावरून फळ गळून खालीं पडणें हें अशाच एका अदृश्य शक्तीचें कार्य आहे; तिला ' गुरुत्वाकर्षण ' असें ह्मणतात. जरी ही शक्ति अतींद्रिय आहे तरी तिचें कार्य दृश्य ह्मणजे इंद्रियगोचर आहे. इंद्रियगोचर चमत्कार हे सर्व द्रव्याच्या सूक्ष्म आणि अतींद्रिय रूपांवर ज्या नानाविध शक्ति अदृश्यरूपानें आपले व्यापार चालवित आहेत त्यांचीं केवळ अनेक व्यक्त कार्यें होत. ह्या अदृश्यशक्ति आणि द्रव्याचा अतींद्रिय अणुसमुच्चय मिळून विश्वचमत्कारांची सूक्ष्मावस्था बनली आहे. जेव्हां एखादी सूक्ष्म शक्ति कार्यरूपानें प्रकट होते तेव्हां ती स्थूल पदार्थांच्या रूपानें दृष्टीस पडते. ह्मणून प्रत्येक स्थूलरूप हें द्रव्याच्या सूक्ष्म अणुसमुच्चयावर व्यापार करणाऱ्या कोणत्या तरी सूक्ष्म शक्तीचें व्यक्त कार्य होय असें आपणांस ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. हैड्रोजन आणि आक्सिजन यांचे सूक्ष्म परमाणु जेव्हां रासायनिक शक्तीच्या योगें एकत्र होतात तेव्हां ते जलाच्या स्थूल रूपानें दृश्यमान होतात. हैड्रोजन आणि आक्सिजन हीं जलाचीं सूक्ष्म घटकावयव आहेत, त्यांच्यापासून जल हें पृथक् कधींहि काढतां यावयाचें नाहीं. जलाचें अस्तित्व त्याच्या घटकावयवांच्या अस्तित्वावर अवलंबून असतें अथवा हेंच अन्य शब्दानें सांगावयाचें ह्मणजे जलाचे सूक्ष्म रूपावरच त्याचें अस्तित्व अवलंबून असतें. सूक्ष्मावस्थेंत जर बदल होईल तर त्याचे स्थूल प्रगट रूपांतहि बदल होईलच. वृक्षाच्या स्थूल रूपांतील विशेष धर्म हा त्या-

चें सूक्ष्म रूप जें बीज त्याच्या विशिष्ट धर्मावर अवलंबून असतो. अत्यंत सूक्ष्म सजीव पिंड आणि अत्युच्च मानवी वर्ग ह्यांच्या मधील ज्या अवस्था त्यांपैकीं प्रत्येक अवस्थेंत जें सूक्ष्मरूप नानाविधरूपानें प्रकट होत असतें त्यावर जीवकोटींतील स्थूलरूपांचा विशिष्ट धर्म हा अवलंबून असतो. मानवी स्थूल देहाचा त्याच्या सूक्ष्म (लिङ्ग) शरीराशीं निकट संबंध असतो. इतकेंच नव्हे, तर शारीरिक स्थूल रूपांतील प्रत्येक हालचाल अथवा फेरफार हीं लिंग शरीराच्या हालचाली आणि फेरफारांमुळें होत असतो. सूक्ष्म शरीरांत जर यत्किंचित् विकार झाला तर स्थूल शरीरांतहि तसाच विकार होतो. भौतिक देह हा लिंग शरीराचें प्रकटरूप असून त्याचा जन्म, त्याची वाढ, त्याचा क्षय आणि मृत्यु या सर्व गोष्टी त्याच्या सूक्ष्म शरीरांतील विकारावर अवलंबून असतात. जावत्कालपर्यंत लिंग शरीर कायम आहे तावत्कालपर्यंत तें तदनुरूप अशा स्थूलरूपानें प्रकट होत राहणारच.

आतां आपण सूक्ष्म शरीर ह्मणजे काय हें स्पष्टपणें समजून घेऊं. तें सजीव पदार्थाचें सूक्ष्म बीज आहे. यापरतें दुसरें कांहीं नाहीं. प्राणशक्तीनें एकत्र धरून ठेवलेला द्रव्याचा अदृश्य अणुसमुच्चय त्यांत असतो; त्याचे ठिकाणीं मन अथवा विवेकशक्ति हीहि बीजरूपानेंच असते. व हें एखाद्या वनस्पतीच्या बीजामध्यें जीवनवेग व वृद्धिंगत होण्याची शक्ति हीं दोन्ही जशीं अदृश्यपणें वास करीत असतात तद्वतच होय (ह्मणजे मनुष्याच्या लिंगदेहामध्यें जीवनवेगानें संबद्ध झालेले अदृश्य द्रव्यपरमाणु असतात इतकेंच नव्हे, तर भावी वृद्धिंगत होणारा मनोवेगाहि असतो. वेदान्तशास्त्रानुरोधें लिंगशरीर हें अंतःकरणात्मक असतें; ह्मणजे त्यांत, अंतरिंद्रिय अथवा मन, मनाचीं नानाविध रूपांतरें, पंचज्ञानेंद्रियें (चक्षु, कर्ण, घ्राण, जिव्हा, त्वचा,) पंचकर्मेंद्रियें (वाक्, हस्त, पाद, उपस्थ, गुद,) आणि पंचप्राण (प्राण, अपान, व्यान, उदान, समान) ह्यांचा समावेश होतो. प्राण ह्मणजे जीवनशक्ति. तो प्राण जरी एकच आहे, तथापि शरीरांतील निरनिराळ्या वायूंस स्थानभेदावरून आणि त्यांच्या पृथक् पृथक् कार्यावरून त्याला पांच

निरनिराळीं नांवें पडलीं आहेत. तीं पृथक् कार्यें आणि नांवें येणें-प्रमाणें. पहिला 'प्राणवायु' हा हृदयस्थानीं असून त्याचा धर्म बाहेरचा वायु फुप्फुसांत घेऊन आंतील बाहेर टाकावयाचा हा आहे. दुसरा 'अपानवायु' शरीरांत ज्या वायूंची अथवा पदार्थांची गरज नाहीं तें बाहेर टाकणें ही क्रिया हा वायु करतो. शरीरांतील पचनक्रिया करून त्याच्या प्रत्येक भागास अन्नरस पोहोंचविणें हें काम तिसरा जो 'समानवायु' त्याचें आहे. चवथा 'उदानवायु' ह्याचा धर्म घशाखालीं उतरलेलें अन्न जठराग्नीस पोहोंचविणें व वाचाशक्ति उत्पन्न करणें हा आहे. आणि पांचवा 'व्यान' वायु हा नखशिखान्त शरीराच्या सर्व भागांत व नाडींत फिरून शरीराची आकृति कायम ठेवणारा आहे आणि तो प्रत्येक इंद्रियाला चलनवलनादि शक्ति देऊन तरतरी आणतो. अशीं हीं जीवनवेगाचीं नानाविध कार्यें आहेत. ह्या वर सांगितलेल्या ह्या सूक्ष्म शक्ति, स्थूल शक्ति, स्थूल शरीरांतील द्रव्य-परमाणु व एका जन्मामध्यें मनुष्याचे मनावर घडलेले संस्कार, उठलेले संकल्प आणि उदय पावलेल्या प्रवृत्ति अथवा वासना ह्यांचीं भावी रूपें मिळून लिंगदेह बनला जातो. मनुष्य ह्या जन्मीं जीं जीं भिन्न भिन्न मानसिक आणि कायिक कर्में करितो त्यांचे परिणाम पुढील जन्मीं होणाऱ्या वासना व संकल्प होत. पूर्व जन्मांतील कोणत्याहि संस्काराचा परिणाम पुढच्या जन्मीं झालेला नाहीं अशी गोष्ट होत नाहीं.

एका जन्मामध्यें आपण जीं शारीरिक व मानासिक कर्में करितों व जे जे संकल्प मनाचे ठिकाणीं उदय पावतात ते सर्व सूक्ष्म बनून संस्काररूपानें आपल्या मनोभूमिकेंत संचित होतात. हे संस्कार कांहीं वेळपर्यंत स्तिमित ह्मणजे अदृश्य राहतात हें खरें, पण नियमित कालानंतर समुद्रलहरीप्रमाणें तें गुप्त संस्कारित मन प्रक्षुब्ध होऊन तें नवीन इच्छा उत्पन्न करतें. त्यास वेदान्तशास्त्रांत वासना असें ह्मणतात. वासना ह्याच नवीन देहाचे जनक होत. हजारों वेळां जन्मास येऊनहि जर मनुष्यामध्यें ऐहिक सुख व पदार्थ ह्यांच्याविषयीं प्रबल वासना कायम राहिली तर त्याला फिरून जन्म घ्यावेच लागतात. त्या प्रबल वासनांची गति

कशानेंहि कुंठित होत नाहीं. त्यांची शांति अथवा परिपूर्णता आजना उद्यां केव्हां तरी झालीच पाहिजे.

लिंगदेहामध्यें जे जे गुप्तसंस्कार संचित असतात त्या संस्कारान्वयें शरीराचीं, इंद्रियाचीं अथवा मनाचीं कर्मे, मग तीं ऐच्छिक असोत वा अनैच्छिक असोत, घडून येतात. जरी आपल्या स्थूल भौतिक शरीराची वाढ, ज्या पद्धतीनें त्याचें पोषण होतें ती पद्धत, आणि इतर सर्व विकार अवश्यमेव अशा दृश्य कारणानुरूपच घडून येतात, तथापि अखिल कर्ममालिका, आणि अतएव प्रत्येक व्यक्तिमात्राचें कर्म, तें कर्म घडून येण्यास शरीराची जी अवस्था लागते ती अवस्था, इतकेंच नव्हे तर ज्या पद्धतींत आणि पद्धतीनें शरीर कायम राहतें ती पद्धत, अर्थात् सर्व अवस्थांतरें, हीं सर्व लिंगदेहांत संचित झालेल्या गुप्त संस्कारांचीं दृश्य कार्यें होत. संस्कारांच्या स्वरूपाचा एकंदर मानवी शरीराशीं असणारा ऐक्यभाव वर सांगितलेल्या गोष्टीवरच अवलंबून राहतो. अतएव प्राण्याच्या ठिकाणीं ज्या वासना अत्यंत बळवंत आणि प्रकट होण्यास अत्युत्कट असतात, त्यांशीं अन्वय अथवा साम्यता पावणारीं अशींच इंद्रियें बनतात. अर्थात् इंद्रियें हीं वासनांचे दृश्य परिणाम ह्मणजे व्यक्त रूपें होत. जर मनुष्याला क्षुधा अथवा अन्नभक्षणाची इच्छा नसेल तर दांत, कंठ, आणि आंतडीं हीं असलीं काय आणि नसलीं काय सारखींच. कोणताही पदार्थ ग्रहण करण्याची किंवा चळनवळनाची इच्छा नसेल तर हस्तपादादि अवयव अगदीं निरर्थक होतील. त्याप्रमाणेंच हेंही दाखवितां येईल कीं पाहण्याच्या व ऐकण्याच्या इच्छेमुळेंच नेत्र आणि कर्ण हे निर्माण झाले आहेत. माझ्या हस्ताचा उपयोग करण्याची जर मला वासना नसली, व हाताचा मीं मुळींच उपयोग केला नाहीं, तर थोड्याच दिवसांत तो वाळून काष्ठवत् होईल. आपल्या या आर्यदेशांत असे काष्ठवत् ऊर्ध्वहस्त झालेले कांहीं धार्मिक वेडेपीर अथवा अघोरपंथी वैरागी वाचकांच्या पाहण्यांत आलेले असतीलच; अशा लोकांचे हात पुढें कांहीं मासावधी लोटल्यानंतर अगदीं काष्ठवत् होऊन निर्जीव होतात. तसेंच एकादा मनुष्य सहा महिनेपर्यंत सारखा अंथरुणावर

पडून राहील तर कांहीं दिवसांनीं त्याची चालण्याची शक्ति अगदीं नष्ट होईल. अशा प्रकारें इंद्रियें निरुपयोगी ठेवून घातुक परिणाम झाल्याचीं उदाहरणें विपुल आहेत. ज्याप्रमाणें सामान्यतः मानवी प्राण्याच्या शरीराचा आकार त्याच्या इच्छेशीं अनुरूप असतो, त्याप्रमाणेंच त्याच्या वासना, इच्छा व विचार ह्यांना अनुरूप अशीच व्यक्तिमात्राच्या शरीराची ठेवण (structure) बनते. आणि त्यावरून पाहतां मानवी बाह्य आकार हा त्याच्या अंतस्स्वरूपाचें केवळ आविष्कारण होय. यावांचून अन्य कांहीं नाहीं. जें एका मागून एक असें क्रमशः नानाविध रूपानें व्यक्त दशेस येतें तेंच प्रत्येक व्यक्तिमात्राचें अंतस्स्वरूप. मनुष्य मरतो, तेव्हां त्याचा जीवात्मा नष्ट होत नाहीं. तर तो अदृश्य रूपानें अस्तित्वांत राहतो. माळेंतील सूत्र जसें निरनिराळे मणी एकत्र करून कायम असतें तद्वत् हें जीवसूत्र कार्यकारणभावाच्या नियमामुळें आपले भिन्नभिन्न आयुर्मणी अर्थात् जन्म एकत्र करून कायम राहतें. अनंत व अनादि कालापासून सद्वस्तूच्या नित्य महासागरांतून निर्माण झालेल्या जलबिंदूप्रमाणें हा लिंगदेह असून त्यांत अविकार्य अशा **चित्प्रकाशाचें**–परब्रह्माचें–प्रतिबिंब वठलेलें असतें. जसा एकादा जलबिंदु कधीं मेघामध्यें अदृश्य बाष्पस्थितींत असतो, कधीं पर्जन्यधारारूपानें, कधीं हिमरूपानें, कधीं बर्फाच्या रूपानें असतो, कधीं कधीं फिरून त्याची वाफ होते, व कधीं चिखलाच्या रूपानेंही असतो, पण त्याचा समूळ नाश कधींच होत नाहीं, त्याप्रमाणेंच लिंगदेह कधीं कधीं अव्यक्त दशेंत व कधीं कधीं पूर्व जन्मांतील वासना व संस्कार यांना अनुरूप अशा एकाद्या प्राण्याच्या किंवा मनुष्याच्या स्थूलरूपानें व्यक्त दशेस येतो. तो स्वर्गांत अथवा आकाशांतील एकाद्या ग्रहगोलावरही जाईल, किंवा ह्या भूतलावरच फिरून जन्मास येईल. ह्या सर्व गोष्टी पूर्व जन्मार्जित वासना आणि मनप्रवृत्ति ह्यांच्या स्वरूपावर आणि जोरावर अवलंबून असतात. ह्या कल्पनेचें निरूपण वेदांतशास्त्रांत फार स्पष्टपणें केलें आहे. यावज्जीव जे विचार, ज्या इच्छा अथवा ज्या वासना मनुष्याच्या ठिकाणीं अत्यंत प्रबळ असता-

त त्या मरणकाळीं फार जोरावून मरणाराचें अंतस्स्वरूप त्याप्रमाणें बनतें. व अशा रीतीनें नवीन बनलेलें अंतस्स्वरूप नवीन रूपानें ह्मणजे पुनर्जन्माचे रूपानें व्यक्त होतें. अशा रीतीनें अंतस्स्वरूप तयार करणारे जे संकल्प, वासना व इच्छा यांच्यामध्यें असें कांहीं एक सामर्थ्य आहे कीं त्याच्या योगें त्या त्या वासना परिपूर्ण होण्यास ज्या परिस्थितीची अथवा उपाधींची गरज लागते त्याची निवड ते संकल्प व त्या वासनाच करतात. ह्या पद्धतीला उत्क्रांतितत्त्वाभिमानी लोक 'स्वाभाविक अथवा नैसर्गिक आवडनिवड' असें ह्मणतात. इंग्रेजींत ह्याला (Law of Natural Selcetion) अशी संज्ञा आहे.

ही वर सांगितलेली पद्धत स्पष्टपणें कळण्यासाठीं निरनिराळ्या वनस्पतींचीं बीजें सामान्य परिस्थितींतून भिन्न भिन्न सद्रव्यसामुग्रीची कशी निवड करितात, भिन्न भिन्न रसांचें शोषण कसें करतात, व भिन्न भिन्न मूल द्रव्यांच्या समुच्चायाचें समीकरण कसें करतात हें पाहूं. अशी कल्पना करा कीं एका कुंडींत दोन प्रकारचें बीज आपण रुजण्यास घातलें आहे. त्यांपैकीं एक आम्रबीज आहे व दुसरें संत्र्याचें आहे. दोन्ही बीजांतील वर्धनसामर्थ्य सारखेंच असतें. दोघांनाही माती, पाणी आणि सूर्याची उष्णताही सारखीच असते. पण इतकें असूनहि त्या प्रत्येक बीजाचे ठिकाणीं असा कांहीं एक विशेष धर्म असतो कीं, त्यायोगें सामान्य परिस्थितींतून भिन्न भिन्न मूल द्रव्यांतील लागेल तेवढाच रस, आणि प्रत्येक झाडाचें फळ, पुष्प, व पर्ण यांची विशिष्ट स्वरूपानें वाढ होण्यास साहाय्यकारक असणारे असेच इतर गुणधर्मही तें शोषून घेतें. त्यांच्या मधुर आणि आंबट अशा दोन जाती आहेत, तेव्हां जर निरनिराळ्या अवस्थेंत त्यांच्या विशिष्ट स्वरूपांत बदल होऊन तीं झाडें मधुर जातीचीं निघालीं तर बीजामध्यें जो कांहीं फेरबदल होईल त्याबरोबरच एकसमयावच्छेदेंकरून वृक्ष, त्याचीं पानें आणि फळें यांच्या अखिल स्वरूपामध्येंहि बदल होईल. व आंबट जातीचें असतांना तें ज्या द्रव्यांचें व गुणधर्मांचें परिस्थितींतून आकर्षण, शोषण अथवा समीकरण करीत होतें त्या प-

दार्थांची आणि गुणधर्मांची आतां त्याला मुळींच गरज लागणार नाहीं. ह्याच विचारसरणीनें असें पहा कीं, वर सांगितलेल्या नैसर्गिक आवडनिवडीच्या नियमाप्रमाणें मरणाऱ्या मनुष्याचा नवीन तयार झालेला लिंगदेह सामान्य परिस्थितींतून अशाच अवस्थांची निवड करून त्यांचें आकर्षण करितो कीं, त्यांच्यायोगें आपल्या अवशिष्ट वासनांस प्रकट होण्याची योग्य संधी मिळेल. मनुष्य मरण पावल्यानंतर पुनर्जन्म प्राप्त होणाऱ्या ज्या अनेक अवस्था, त्यांपैकींच **मातापितरें** ही एक मुख्य अवस्था होय. व्यक्तिमात्राचें नवीन बनणारें अंतस्स्वरूप किंवा लिंगदेह आपणांस योग्य अशाच मातापितरांची निवड नैसर्गिक आवडनिवडणुकीच्या तत्त्वान्वयें करितो, आणि नंतर त्यांच्या पोटीं तो जन्मास येतो. उदाहरणार्थ जर मला चित्रकलेंत प्राविण्य मिळविण्याची बलवत्तर इच्छा आहे, व ती साऱ्या जन्मभर खटपट करूनहि साध्य झाली नाहीं, तर मी मरणोत्तर अशाच मातापितरांच्या पोटीं येईन, व त्यांना अशीच परिस्थिति प्राप्त होईल कीं, तेणेंकरून मला उत्कृष्ट चितारी बनण्यास साहाय्य होईल.

एथपर्यंत विवेचन केलेल्या ह्या क्रियेस पूर्वात्य तत्त्वज्ञानामध्यें **पुनर्जन्म** असें ह्मणतात. जीवात्म्याला पुनर्जन्म आहे, हें पूर्वात्यतत्त्व पाश्चात्य राष्ट्रांत जरी सर्वमान्य नाहीं, तथापि प्राचीनकालीं व अर्वाचीन कालींहि अनेक लोकांनीं निःसंशय मान्य केलें आहे. पुनर्जन्माच्या कल्पनेचें शास्त्रीय विशदीकरण जरी आर्यांच्या ग्रंथांवांचून अन्यत्र कोठेंहि आपणांला आढळत नाहीं, तथापि एवढें खरें कीं भिन्न भिन्न देशांतील महान तत्त्ववेत्ते, धर्मोपदेशक ऋषिवर्य, आणि पैगंबर ह्यांनीं तें तत्त्व फार प्राचीन कालापासून मान्य केलें होतें. इजिप्तच्या प्राचीन सुधारणेची इमारत तरी पुनर्जन्म तत्त्वाच्या अपरिणत रूपावरच रचलेली होती. प्रसिद्ध ग्रीक इतिहासकार **हेरोडोटस** ह्यानें असें म्हटलें आहे कीं, " आत्मा हा अमर अथवा अविनाशी असून मृत मनुष्याचे शरीरांतून जेव्हां तो वेगळा होतो तेव्हां त्याला घेण्यास तयार असलेल्या दुसऱ्या एकाद्या शरीरांत प्रवेश करतो, असें तत्त्व इजिप्शिअन लोक प्र-

तिपादन करीत असत. " ग्रीस व इटलीमध्यें पुनर्जन्म तत्त्वाचा प्रसार **पायथागोरस** आणि त्याचें शिष्यमंडळ ह्यांनीं केलेला आहे. **पायथागोरस** म्हणतो " आत्मा सर्वांना आहे; सजीव सृष्टींतील सर्व व्यापार आत्म्याचें भ्रमण हाच होय, तो शाश्वत इच्छेला आणि नियमाला अनुरूप असेंच वर्तन करीत आहे."

ड्रायडन नामक आंग्ल कवीनें आपल्या ओव्हिड नामक काव्यांत तर पुढीलप्रमाणें उद्गार काढिले आहेत. " मृत्यूच्या ठायीं अमर आत्म्याला मारण्याचें सामर्थ्य नाहीं, आत्म्याच्या प्रस्तुतच्या देहाची जेव्हां मृत्तिका होते, तेव्हां तो दुसऱ्या एखाद्या देहाचा शोध लावितो आणि पूर्वीच्याच सामर्थ्यानें नूतन देहाचे ठिकाणीं जीव आणि (प्रकाश) ज्ञान प्रबोधित करितो " साक्रेटिसाचा सच्छिष्य व महान् तत्त्ववेत्ता जो प्लेटो, त्यानें रचिलेल्या तत्त्वविद्येवरील ग्रंथाची तर गुरुकिल्ली पुनर्जन्म हीच होती. प्लेटोनें असें ह्मटलें आहे कीं, " आत्मा हा शरीरापेक्षां प्राक्कालीन आहे ह्मणजे तो फार जुनापुराणा आहे, व तो पुनः पुनः जन्ममृत्यूच्या येरझारा करितो." ग्रीस व इतालीमध्यें पुनर्जन्माच्या कल्पनेचा विस्तारानें प्रसार पायथागोरस, एम्पिडोकल्स, प्लेटो, व्हर्जिल आणि ओव्हिड ह्या लोकांनींच केलेला आहे. निओ प्लोटोनिस्ट, प्लेटिनस, आणि प्रोक्लस ह्यांनाहि तें तत्त्व अवगत होतेंच. प्लोटिनस म्हणतो " आत्मा शरीर सोडून जाऊं लागला ह्मणजे ज्या शक्तीचा पराकाष्ठेचा विकास त्याचे ठिकाणीं झाला असतो तीच शक्ति तो बनतो. ह्मणून (अज्ञान टाकून देऊन ज्ञानमय जगतांत आपण जाऊं या) (इंद्रियगोचर पदार्थांच्या नादीं लागून इंद्रियांचें कोड पुरविण्यानें ज्यांत निवळ विषयोपभोगच ध्यावयास सांपडतात असा जन्म आपणांस प्राप्त होऊं नये एतदर्थ) " परशियन मॅगीच्या धर्माचें पुनर्जन्म हें तर मूलतत्त्वच होतें. अलेक्झांडर दी ग्रेट ह्याचा हिंदुतत्त्ववेत्त्यांशीं संसर्ग घडल्यानंतर त्यांनीं ही कल्पना मान्य केली होती. आत्म्याच्या पूर्वजन्माविषयीं थोडीबहुत श्रद्धा गॉल्स लोकांचे ठिकाणीं होती असें ज्युलिअस सीझर ह्याला आ-

ढकून आलें होतें. प्राचीन गॉलचे ड्रुइडलोक तर असें मानीत होतें कीं मनुष्याचा आत्मा देह नष्ट झाल्यावर आपल्या स्वभावास व इच्छेला अनुरूप अशा दुसऱ्या शरीरांत प्रवेश करितो. " सेल्टस आणि ब्रिटन्स ह्या लोकांवरहि ह्या कल्पनेचा संस्कार घडला होता. अरबस्तानांतील प्राचीन तत्त्ववेत्ते व मुसलमान सुफी पंडित ह्या लोकांचा पुनर्जन्म हा आवडता विषयच होऊन बसला होता. यहुदी लोकांनीं बाबिलोनिया एथील बंदीवासानंतर पुनर्जन्ममत मान्य केलें होतें. ख्रिस्ताचा समकालीन जो आलेक्झांड्रियाचा फायलो ह्यानें मानवी आत्म्याचा पूर्वजन्म आणि पुनर्जन्म ह्याविषयींची प्लेटोची कल्पना हिब्र्यु लोकांना शिकविली होती. फायलो म्हणतो " देहाहून वेगळे निघालेल्या आत्म्यांची नानाविध क्रमानें वांटणी होते. त्यांच्यापैकीं कांहींचा नियम असा आहे कीं मर्त्य अथवा नाशिवंत शरीरांत प्रवेश करावा आणि तेथें नियमितकालपर्यंत राहून फिरून मुक्त व्हावें. जॉन बापटिस्ट हा दुसरा एलिजाच होता. अर्थात् एलिजा हाच फिरून जॉनबापटिस्टच्या जन्मास आला होता असें यहुदी लोक मानीत असत. खुद्द येशुख्रिस्त हाहि पूर्वींच्या कोणा एका शुभवर्तमान सांगणाऱ्या पैगंबराचा अवतार होता असें बहुतेक लोक मानीत असत. (matt XVI 14, आणि XVII., I2. पहा) . सालोमन ह्यानें आपल्या विचाररत्नाकरामध्यें असें म्हटलें आहे कीं ' पूर्वजन्मीं मी सुस्वभावाचा होतों ह्मणून मला चांगला आत्मा प्राप्त झाला अथवा माझ्या सौजन्यामुळेंच मला शुद्धदेह प्राप्त झाला आहे. "

टॅलमद आणि काबला हे ग्रंथहि वरील तत्त्वाचाच अनुवाद गात आहेत. टॅलमदमध्यें ह्मटलें आहे कीं, ॲबेलच्या आत्म्यानें प्रथम सेथच्या शरीरामध्यें प्रवेश केला आणि नंतर मोझेसच्या शरीरांत प्रवेश केला म्हणजे ॲबेल हाच सेथच्या व फिरून मोझेसच्या जन्मास आला होता. ख्रिस्ती धर्म देखील पुनर्जन्ममतापासून अलिप्त आहे असें नाहीं. आरिगेन आणि इतर धर्मोपदेशक ह्यांनाहि ही कल्पना मान्य होती. आरिगेन नामक ख्रिस्ती धर्मोपदेशक लिहितो कीं " कारण प-

रमेश्वरानें आपल्या प्रजेची ज्याच्या त्याच्या पात्रत्वानुरूप मोठ्या न्यायीपणानें व्यवस्था करून एकाच सुसंगत जगतांत अनेक मनांचें वैचित्र्य एकत्र करून ठेविलें आहे. असें करण्यांत परमेश्वराचा हेतु जणुंकाय आपल्या विश्वभवनांत सुवर्ण, रौप्य, मृण्मयादि सर्व प्रकारच्या उपयोगी निरुपयोगी पात्रांनीं, मनांनीं आणि आत्म्यांनीं अलंकृत करण्याचाच होता. जगतांत जें हें वैचित्र्य दृष्टीस पडत आहे त्याचीं कारणें हींच होत, व परमेश्वरी दूरदर्शित्वानें प्रत्येकाला आपआपल्या प्रवृत्ति, वासना आणि स्वभाव यांना अनुरूप अशीच बरी बाईट स्थिति लाभली आहे. " तो आणखी ह्मणतो " मनुष्याच्या मनावर घटकेंत चांगला तर घटकेंत वाईट परिणाम म्हणजे एका कालीं पुण्याकडे तर एका कालीं पापाकडे प्रवृत्ति होते, ती तशी कां व्हावी ? हा फार गूढ प्रश्न आहे. मला वाटतें ह्याचीं कारणें देहोत्पत्तीच्या फारच अगोदरचीं असलीं पाहिजेत. म्हणजे देहोत्पत्तीनंतर ह्याचें कारण शोधूं लागलें तर कांहीं एक पत्ता लागत नाहीं " ख्रिस्ती लोकांत पुनर्जन्माच्या मताचा फैलाव इतका त्वरित होऊं लागला होता कीं, रोमन लोकांचा बादशहा जो **जस्टानियन** त्याला ख्रिस्ती शकानंतर ५३८ सावे वर्षीं कान्स्टांटिनोपल येथील राजसभेमध्यें एक नवा कायदा पास करून या मताचा उच्छेद करणें भाग पडलें. त्या कायद्यांत असें ठरविलें होतें कीं,—" आत्म्याला पूर्वजन्म होता व पुनर्जन्महि आहे असें जें पौराणिक आणि चमत्कारिक मत तें मान्य करून त्याचा जो फैलाव करील त्याला बहिष्कृत केलें जाईल. " बोगोमाइल्स, पॉलिशिअन्स, इत्यादि मध्यकालीं झालेल्या पंथांतील लोकांत पुनर्जन्माच्या तत्त्वांचा विस्तार नास्टिक्स आणि मॅनिशिअस ह्यांनीं केला होता. असल्या ह्या मिथ्या ग्रहानुयायांपैकीं कांहींचा तर ख्रिस्ती शकानंतर ३८९ सालीं अगदीं निष्ठुरपणानें छल झाला.

सातव्या शतकांत केंब्रिज विश्वविद्यालयांतील प्लेटोच्या मतानुयायांपैकीं कांहींनीं उदाहरणार्थ डा. हेनरी मूर, पुनर्जन्माचें मत मान्य केलें होतें. जर्मनीच्या इतिहासांतील मध्यकालीं झालेल्या व सांप्र-

तच्या पुष्कळ जर्मन तत्त्ववेत्त्यांनीं ह्याच तत्त्वाचें प्रतिपादन केलेलें आहे. कँट, स्कोटस, शेलिंग, फिश, निबनिटझ, शोपेनहार, जिआर्डानो ब्रुनो, गोएथ, लेसिंग, हर्डर प्रभृति अनेक महान् महान् तत्ववेत्त्यांच्या ग्रंथांतून पुनर्जन्म मताच्या पुष्टीकरणार्थ आह्मांला अनेक अवतरणें देतां येतील, पण विस्तारभयास्तव तसें केलें नाहीं. महान् स्याद्वादी अथवा नास्तिकशिरोमणि ह्यूम ह्यानें आत्म्याच्या अमरत्वाबद्दल एक निबंध लिहिला असून तो त्याच्या मरणोत्तर प्रसिद्ध झालेला आहे. त्यांत त्यानें असें लिहिलें आहे कीं,—" पुनर्जन्म हीच कायती अशा प्रकारची एक पद्धत होय कीं जिचा तत्त्वविद्येशीं ऐक्यभाव आहे. म्हणजे मनुष्यमात्रामध्यें आढळणाऱ्या अवस्थाभेदांचा जर तात्त्विकदृष्ट्या विचार केला तर पुनर्जन्ममत मान्य केल्यावांचून गत्यंतरच नाहीं. फ्लॅमेरिअन आणि हॅक्स्लेसारख्या शास्त्रज्ञांनींहि पुनर्जन्माच्या तत्त्वाविषयीं आपलें अनुकूल मत प्रदर्शित केलें आहे. प्रो. हक्स्ले असें म्हणतात कीं,—" अनुषंगिक असंगतीच्या सबबीवर पुनर्जन्म असंभाव्य आहे असें अविचारी लोकांखेरीज दुसरे कोणीहि म्हणणार नाहींत.जगांतील वस्तुस्थितीचें खरें ज्ञान होण्यास उत्क्रांतितत्त्व जसें अवश्यक आहे तसेंच पुनर्जन्म मान्य केल्यावांचून जगांतील अनेक गोष्टींचा उलगडा होणें शक्यच नाहीं. " (Evolution and Ethics पृ. ६१ पहा.)

अध्यात्मवाद्याच्या अध्वर्यूंपैकीं कांहींनीं ह्याच तत्त्वाचा उपदेश केला आहे. विख्यात जर्मन अध्यात्मवादी डा. ज्युलिअसमुल्लर ह्यानें आपल्या एका ग्रंथांत पुनर्जन्मतत्त्वाचें समर्थन केलें आहे. डा. डार्नर ईर्नेस्टि, रूकर्ट, एडवर्ड बीचर, हेनरी वार्डबीचर, फिलिफ्स ब्रुक्स प्रभृतीसारख्या अति प्रख्यात अध्यात्मवाद्यांनीं आत्म्याचा पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांविषयीं अनेकवार उपदेश केलेला आहे. स्वीडनबर्ग आणि इमर्सन ह्यांनींहि ह्या तत्त्वाचें मोठ्या आवेशानें प्रतिपादन केलें आहे. ईश्वरज्ञानवेत्ता इमर्सन ह्यानें आपल्या ' अनुभवावरील निबंधांत असें म्हटलें आहे कीं,—" आपल्या जागृतावस्थेंत पाहिलें तर आपण

सोपानपरंपरेच्या मध्यभागीं बसलों आहों असा भास होतो. खालीं पाहिलें तर पुष्कळ पायऱ्या चढून आपण वर आलों आहों असें दिसतें. वरें वर दृष्टि फेकावी तर असें नजरेस येतें कीं आपणांस अद्याप पुष्कळ पायऱ्या चढून वर जावयाचें असून कांहीं पायऱ्या तर इतक्या उंच वर गेलेल्या आहेत कीं तेथें आपली दृष्टिहि पोहोंचत नाहीं.

प्राचीन अथवा अर्वाचीन कविमंडळापैकीं बहुतेकांनीं ह्या वरील तत्त्वाचाच प्रतिज्ञापूर्वक अनुवाद गाइला आहे. **वुइल्यम् वर्डसवर्थ** कविश्रेष्ठ ह्मणतात. 'ज्याच्या निरंतर प्रकाशांत आह्मी आपला जीवनव्यापार चालवितों असा जो आत्मा तो आमच्या या जडदेहाबरोबरच जन्मास येतो. त्याचा अस्त पूर्वीं अन्य कोणत्या तरी देहाबरोबरच झालेला असतो, व तो फार लांबून निघालेला आहे ह्मणजे पूर्वीं किती तरी देहांचे ठिकाणीं जन्म घेत घेत आला आहे.' **टेनिसन** ह्यांनेंहि आपल्या Two voices' नामक काव्यांत पुढीलप्रमाणें उद्गार काढिले आहेत. अथवा जर नीच कोटींत जन्म घेत घेत आजचा जन्म मला प्राप्त झाला आहे व मागील सर्व अनुभवांचें एकीकरण या मनांत आणि देहांत झालेलें आहे तर माझ्या त्या दुर्भाग्याची मला आठवण नसेल हें संभवनीय आहे. कारण आपल्या पहिल्या वर्षाची तरी आपणांला स्मृति कोठें आहे? स्मृतीच्या नित्य स्थानांतून तर कांहींच प्रतिध्वनी निघत नाहीं.' **वाल्ट व्हिटमन** कवीनें ह्मटलें आहे कीं, हे जीवात्म्या तुझ्या संबंधीं विचार केला ह्मणजे मला असें वाटतें कीं तूं अनेक वेळां जन्ममृत्यूंच्या फेऱ्यांत सांपडून शिल्लक राहिला आहेस. मला हा जन्म लाभण्याचे पूर्वीं मी हजार वेळां जन्ममृत्यूंच्या चक्रांत सांपडलों आहे यांत संदेह नाहीं. अशाच अर्थाचे उतारे भिन्न भिन्न देशांतील बहुतेक सर्व कवींच्या काव्यांतून देतां येतील. आफ्रिका, एशिया, उत्तर आणि दक्षिण अमेरिका खंडांतील मूळच्या अडाणी लोकांमध्येंहि पुनर्जन्ममताविषयीं श्रद्धा होती, अशाबद्दल आधार सांपडतो. एशिया खंडांतील जवळ जवळ तीन चतुर्थांश लोकसंख्या पुनर्जन्ममतावर विश्वास ठेवणारी आहे, व ह्या कल्पनेच्या द्वाराच जीविताच्या कोड्याचें समाधानकार-

क उत्तर त्यांना मिळतें. मृत्यूनंतर जीवात्मा कायम राहतोच ही कल्पना ज्यांत मान्य केलेली नाहीं असा जगाच्या पाठीवर एकही धर्म सांपडणार नाहीं.

जे लोक पुनर्जन्म मतावर विश्वास ठेवीत नाहींत, ते लोक जगांतील सुखदुःखावस्थेचें आणि वैचित्र्याचें विशदीकरण दोन तऱ्हेनें करतात. ते ह्मणतात कीं जगांतील सुखदुःखें एक तर सर्वशक्तिमान परमेश्वराच्या इच्छेनें निर्माण झालीं असलीं पाहिजेत अथवा तीं वंशपरंपरेनें चालत आलीं असलीं पाहिजेत. पण प्रत्यहीं आपणांस जें सुखदुःखादिकांचें वैषम्य दृष्टीस पडतें त्याचें स्पष्टीकरण करण्यास वरील दोहोंपैकीं एकाहे कल्पना समर्थ नाहीं. जर सर्वशक्तिमान् मूर्त परमेश्वरानें हें विश्व कांहीं नाहींपासून—शून्यापासून—निर्माण केलें आहे तर याला यच्चयावत् वस्तुजात चांगलें आणि प्राणिमात्र सुखी निर्माण करितां आले नसते काय ? प्रत्येक जीवात्म्याचा जन्म होण्यापूर्वीं जर परमेश्वर त्याला निर्माण करितो तर त्यानें एकाला सुखी आणि एकाला दुःखी असें कां करावें ? एका पुरुषाच्या अथवा स्त्रीच्या ठिकाणीं जन्मतःच पुण्यप्रवृत्ति व दुसऱ्याच्या ठिकाणीं पापप्रवृत्ति असा भेद कां असावा ? एक सर्व जन्मभर सदाचारी व दुसरा दुराचारी असें कां ? एक बुद्धिमान् तर एक मठ्ठ असा कां निपजावा ? जर परमेश्वरानें आपल्या इच्छेनें ह्या सर्व वैषम्याचें बीज पेरलें असेल अथवा अन्य शब्दांनीं बोलावयाचें म्हणजे एकाला सुखांत व एकाला दुःखांत घातलें असेल तर परमेश्वराचे घरीं केवढा पक्षपात आणि अन्याय म्हणावा ? खरोखर परमेश्वर अत्यंत जुलमी राजापेक्षांहि अधिक दुष्ट असला पाहिजे. व असें जर आहे तर आम्हीं त्याच्या भजनीं तरी कसें लागावें आणि त्याला सर्वदयाघन व न्यायी असें तरी कसें म्हणावें ?

विश्वांतील यच्चयावत् चांगली वस्तु तेवढी ईश्वरनिर्मित आहे व वाईट म्हणून जेवढें आहे तेवढें सैतानाचें कार्य आहे. चांगलें तेवढें ईश्वरानें निर्माण केलें आहे; पण जगांत दुःख उत्पन्न करून प्रत्येक

गोष्ट जी वाईट करून ठेविली आहे ती सैतानानें केली आहे. आतां या म्हणण्यांत तार्किक दृष्ट्या कितपत याथार्थ्य आहे हें पाहूं. चांगलें आणि वाईट अथवा सुख आणि दुःख या दोन्ही सापेक्ष संज्ञा आहेत. एकाचें अस्तित्व दुसऱ्याच्या अस्तित्वावर अवलंबून असतें म्हणजे सुखरहित दुःख अथवा दुःखरहित सुख. अर्थात् निखालस सुख अथवा निखालस दुःख जगतांत असूं शकत नाहीं. दुःखावांचून सुखहि अस्तित्वांत राहूं शकत नाहीं आणि सुखाशीं संबंध असल्यावांचून दुःखहि अस्तित्वांत राहूं शकत नाहीं. ज्याला आपण सुख ह्मणून ह्मणतों तें जेव्हां ईश्वरानें निर्माण केलें तेव्हां त्यानें दुःखहि एकसमयावच्छेदेंकरूनच निर्माण केलें असलें पाहिजे. कारण त्याला निखालस सुखच कांहीं निर्माण करितां आलें नाहीं. दुःखोत्पादकानें, मग तुह्मी त्याला वाटेल तें नांव द्या, जें जगांत दुःख उत्पन्न केलें तें परमेश्वरानें जेव्हां सुख निर्माण केलें तेव्हांच केलें असलें पाहिजे; नाहींतर परमेश्वराला दुःख सापेक्ष असणारे सुख निर्माण करितां आलेंच नसतें. व असें जर आहे तर सुखदुःखांचें मिश्रण जें हें जग तें निर्माण करण्यास सुखदुःखोत्पादक एका समयीं एकेच ठिकाणीं बसले होते ही गोष्ट कबूल करावी लागेल. आणि हें कबूल केलें ह्मणजे त्यांच्यापैकीं दोघेहि सारखेच शक्तिमान असून ते परस्परांनीं मर्यादित आहेत हेंहि कबूल करावें लागेल. असें झालें ह्मणजे मग सामर्थ्यानें अमर्यादित (Infinite) अथवा सर्वशक्तिमान (Omnipolent) असा त्या दोघांपैकीं कोण ? अर्थात् एकहि नाहीं आणि ह्मणून सर्वशक्तिमान परमेश्वरानें सुखच काय तें निर्माण केलें आणि दुःख मात्र निर्माण केलें नाहीं असें आपणांस ह्मणतां यावयाचें नाहीं.

वंशपरंपरेच्या कल्पनेचें समर्थन करणारे लोक जो एक युक्तिवाद पुढें ठेवितात त्यानेंहि जगांतील सुखदुःखावस्थेचें आणि वैचित्र्याचें कारण काय असावें याचा उलगडा होत नाहीं. एकाच आईबापांच्या पोटीं निपजलेलीं मुलें त्यांच्या आईबापांशीं व इतर भावंडांशीं लावून पाहिलीं असतां त्यांच्यांत जो कांहीं विलक्षण प्रकारचा सादृश्याभाव

दिसून येतो तो कां ? जुळीं भावंडें एकाच मातापितरांच्या पोटीं एकाच वेळीं जन्मास येऊन व सारख्याच परिस्थितींत वाढूनहि परस्परांचा स्वभाव व परस्परांचे गुणधर्म परस्परांशीं अगदींच विसदृश असतात. तर हें असें कां ? ह्याचें समाधान वंशपरंपरेच्या नियमानें कसें करतां येतें ? कल्पना करा कीं एखाद्याला पांच मुलें आहेत; त्यांच्यापैकीं एक प्रामाणिक आणि सद्गुणी आहे. दुसरा अगदीं खुळा, तिसरा खुनी निवडलेला, चवथा देवभक्त आणि पांचवा बिचारा पंगु आणि व्याधिग्रस्त अशीं आहेत. हें वैषम्य यांच्यांत कोणीं उत्पन्न केलें ? त्याला दैवगति (accident) ह्मणून ह्मणतां यावयाचें नाहीं. दैवगति अथवा आकस्मिक योग ह्मणून अशी वस्तुच नाहीं. विश्वांतील प्रत्येक घटना अथवा परिणाम कार्यकारणांच्या नियमानें बद्ध आहे. ह्या वैषम्याचें कांहीं तरी कारण असलेंच पाहिजे. एकाला प्रामाणिक आणि सद्गुणी, दुसऱ्याला महामूर्ख असें कोणीं केलें ? आईबापांनीं केलें ह्मणावें तर ती गोष्टच व्हावयाची नाहीं. आपल्या पोटीं खुनी, दुष्ट, अथवा मूढ अशीं रत्नें निपजावींत अशी कल्पना त्यांच्या स्वप्नांतसुद्धां नव्हती, उलटपक्षीं आपली प्रजा अत्युत्कृष्ट, आणि अत्यंत सुखी अशी व्हावी, अशी बहुतेक सर्व आईबापांची इच्छा असते. पण अशी इच्छा असूनहि त्यांच्या पोटीं वरील प्रकारचीं मुलें जन्मास येतात, तीं कां ? त्याचें कारण काय ? वंशपरंपरेच्या नियमानें ह्याचें समर्पक उत्तर देतां येतें काय ? मुळींच नाहीं. प्रथमतः मातापितरांना प्राप्त झालेले गुण आणि स्वभाव एकाद्याला कुलक्रमेण अथवा परंपरया प्राप्त होतात अगर नाहीं याबद्दलच वंशपरंपरेच्या कल्पनेचें समर्थन करणाऱ्या पक्षांमध्यें मोठा वाद आहे. एका मुलाच्या ठिकाणीं त्याच्या मातापितरांच्या आनुवंशिक प्रवृत्ती प्रबल असतात, दुसऱ्या मुलाच्या ठिकाणीं त्याच्या पितामहाच्या अंगच्या प्रवृत्तींचें प्राबल्य असतें, तिसऱ्या मुलाच्या ठिकाणीं त्याच्या मातामहाच्या प्रवृत्ती अवतीर्ण झालेल्या असतात आणि चवथ्याच्या ठिकाणीं त्याच्या प्रपितामहाच्या प्रवृत्ती असतात, इत्यादि कल्पना डा. आगस्ट **बेसमन** आणि त्याचे

मतानुयायी यांना संमत नाहींत. उलटपक्षीं डा. **वेसमन** असें म्हणतो कीं, संपादित गुणधर्म अथवा दानत जी असते ती वंशपरंपरेनें कधींहि प्राप्त होत नसते. अंकुर*—भूमिका—भेदानेंच व्यक्तिगत वैषम्य अथवा एकाला सुखावस्था तर दुसऱ्याला दुःखावस्था अशा अवस्था उत्पन्न झाल्या आहेत. सूक्ष्म मूळ बीज सतत कायम राहतें, असें तो मानितो. पुढील त्याच्याच शब्दानें दिलेल्या अवतरणावरून त्याच्या उपपत्तीचा उलगडा अगदीं सहजरीत्या होणारा आहे. तो म्हणतो, मीं ह्या वस्तुला सूक्ष्ममूलबीज (Germ-plasm) असें म्हटलें आहे; व त्याची रचना अति भानगडीची असून संमिश्र इंद्रियरचनेच्या रूपानें विकसित होण्याचें सामर्थ्य त्याचे ठिकाणीं आहे असें गृहित धरिलें आहे.'' (Weisman on Heredity v. 1 p. 170.) आणखी तो असें ह्मणतो. " अतएव पिढ्यान् पिढ्या ह्या सूक्ष्म मूळबीजाचें सातत्य असतेंच. एखाद्याला ह्याचें रूपकाच्या अथवा दृष्टांताच्या रूपानें निवेदन करावयाचें झाल्यास तो असें ह्मणेल कीं, ही वस्तु म्हणजे एक बराच लांबवर पसरत जाणारा मूलसंचय असून त्यांतून कालावधीनें रोपडे उदय पावत असतात. हे रोपडे म्हणजेच एका मागून एक येणाऱ्या पिढ्यांतील व्यक्ति होत. म्हणून त्यावरून असें निष्पन्न होतें कीं, मातापितरांचे अंगचे संपादित गुणधर्म वंशपरंपरेच्या नियमानें मुलांच्या ठिकाणीं संक्रमित होणें ही गोष्ट अगदीं अशक्य आहे; कारण प्रत्येक व्यक्तिमात्राच्या ठिकाणीं प्रत्येक जन्मांत जर अंकुरभूमिका ही नवीन उत्पन्न होत नसून पूर्व जन्मीं असणाऱ्या अंकुरभूमिकेंतूनच उत्पन्न होते असें म्हणावें तर तिची रचना आणि सर्वां अगोदर तिची अणुमय प्रकृति ही ज्या व्यक्तिमात्राच्या ठिकाणीं तिचा दैववशात् प्रवेश होतो त्याच्या अंगच्या गुणधर्मावर अवलंबून नसते. उलटी अशी व्यक्ति

* मूळांत Germ-cells हा शब्द वापरला आहे त्याचा अर्थ प्राण्याच्या ठिकाणीं असणाऱ्या सूक्ष्म जंतूंचे कोश असा होतो. तरी पण वरचा **अर्थ** अधिक इष्ट वाटल्यावरून तोच योजण्यांत आला आहे.

म्हणजे त्या मूलबीजाच्या-अंकुराच्या वाढीला पोषाक भूमिकाच केवळ होऊन बसते असें म्हणतां येईल; व ही अंकुरभूमिकेची जी रचना आहे तिची वाढ होण्यास सुरुवात होण्यापूर्वींपासूनची आहे. परंतु वंशपरंपरेच्या ज्या प्रवृत्ति आहेत, व ज्यांची अंकुरभूमिका ही वाहक आहे, त्या ह्याच वरील अणुमय रचनेवर अवलंबून असतात, आणि ह्मणून पूर्वापिढींत जे कांहीं गुणधर्म वंशपरंपरेनें आले असतील तेवढेच काय ते पिढ्यान्‌पिढ्यांतून संकुचित होणें शक्य आहेत, ह्मणजे त्या अंकुरभूमिकेच्या रचनेंत जे कांहीं गुणधर्म बीजरूपानें अस्तित्वांत असतात तेवढेच वंशपरंपरेनें येणें शक्य आहेत. यावरून असेंहि निष्पन्न होतें कीं मातापितरांनीं आपल्या हयातींत विशिष्ट बाह्य परिस्थितीच्या प्राबल्यानें जे कांहीं गुणधर्म संपादित केले असतील ते भावी पिढीमध्यें मुळींच संक्रमित होत नाहींत. " (V. I. P. 273) शेवटीं उपसंहारांत वेसमन लिहितो कीं " पण परिणामीं एवढी निदान गोष्ट आपणांला कळून चुकली आहे कीं, मातापितरांच्या संपादित गुणधर्मांचें भावी प्रजेच्या ठिकाणीं संक्रमण होतें हें ह्मणणें ज्या कांहीं गोष्टींवरून प्रत्यक्षपणें सिद्ध होतें असें वाटतें त्यांचें अगदीं खंडन झालें आहे आणि ही वरील कल्पना ज्या एका भक्कम पायावरती यावत्कालपर्यंत रचलेली होती तो अगदीं ढासळून गेला आहे. (V. I. P. 461.)

एवंच डा० **वेसमन** ह्यांनीं वंशपरंपरेच्या प्राचीन कल्पनेचा अगदीं उच्छेद करीत करीत तिला थेट पुनर्जन्मतत्त्वाच्या अगदीं सान्निध आणून सोडली आहे. वेसमनच्या कल्पनेप्रमाणें ह्या वरील पांच मुलांपैकीं प्रत्येकाचे गुणधर्म हे वंशपरंपरेच्या नियमाचें कार्य नसून जे गुणधर्म मूल अंकुरभूमिकेमध्यें बीजरूपानें अस्तित्वांत होते त्यांचेंच प्रकटरूप होय. दुसरें असें जर आहे तर असा एक प्रश्न उद्भवतो कीं, अंकुरभूमिकेंत बीजरूपानें असणारे गुणधर्म अथवा प्रवृत्ति ह्या मूळच्या आल्या कोठून ? वेसमननें ह्या प्रश्नास असें उत्तर दिलें आहे कीं, ते गुणधर्म "सर्वसाधारण मूलसंचयांतून" आले आहेत. पण तो "सर्वसाधारण मूलसंचय " कोणता आणि कोठें आहे हें मात्र वेसमन आपणांला

सांगत नाहीं. ह्मणून त्याचें उत्तर समाधानकारक नसून त्यानें नुसती अर्धीच बाजू सिद्ध होत आहे.

हें गूढ वेदांतांत उकलून दाखविलें आहे. तें असें कीं, ह्या अंकुर-भूमिकांपैकीं प्रत्येक अंकुरभूमिका ह्मणजेच फिरून जन्मास येणारें सूक्ष्म शरीर होय. ह्यांतच पूर्व जन्मांतील अनुभव, गुणधर्म, प्रवृत्ति आणि वासना हीं सर्व बीजरूपानें अस्तित्वांत असतात. मरणकाळीं जीवात्मा संकुचित होऊन प्राणबीजाच्या रूपानें रहतो. आणि ह्मणूनच वरील पांच मुलांच्या स्वभावाबद्दल मातापितरहि अपराधी नसतात, अथवा ती परमेश्वरी इच्छाहि नसते. तर प्रत्येक मुलगा आपल्या प्रवृत्ति, पात्रता, सामर्थ्य, आणि स्वभाव या सर्वांबद्दल स्वतःच जबाबदार असतो असें वेदांतांत सांगितलें आहे. ‘ **बुद्धिः कर्मानुसारिणी** ’ ह्या न्यायानें आपआपल्या कर्मबळानेंच प्रत्येक मुलगा खुनी अथवा साधु, सद्गुणी अथवा दुराचारी निपजतो. लिंगशरीरांत बीजरूपानें जें जें कांहीं संचित असतें तें पुढें व्यक्तीच्या स्वभावांत व्यक्त होत असतें. अल्प वयांतच अलौकिक बुद्धिमत्ता निदर्शनास आल्याचीं अनेक उदाहरणें आहेत; त्यांचें अत्यंत समाधानकारक व सयुक्तिक असें स्पष्टीकरण जर कशानें करितां येणें शक्य असेल तर तें एकट्या ‘ पुनर्जन्मतत्त्वानेंच होय. वंशपरंपरेच्या कल्पनेनें ह्या गोष्टी कशा घडतात त्याबद्दल यावत्काल एखादें सबळ कारण पुढें आलें नाहीं. **पास्कल** ह्मणून जो एक विद्वान होऊन गेला, तो बारा वर्षांचा असतांच त्यानें सरळ भूमितीचीं मुख्य प्रमेयें शोधून काढिलीं, ह्यांतील इंगित काय असावें ? **मंगी आमेलो** हा जातीचा धनगर, पण तो पांच वर्षांचा असतांनाच एखाद्या गणिताचे यंत्राप्रमाणें गणिताचीं उदाहरणें अगदीं सहज सोडवित असे हें कसें ? तसेंच **झेरा कालबर्न** ह्मणून जो एक विद्वान होऊन गेला, त्याला आठवें वर्षहि लागलें नव्हतें तेंव्हांच, तो पाटी पेन्सिलीचें साहाय्य न घेतां गणिताचीं अत्यंत बिकट उदाहरणें तोंडानेंच चटकन् सोडवित होता. एकदां त्यानें ८ ह्या संख्येचा षोडशघात तोंडानें करून दाखविला. त्या षोडशघाताची संख्या पंधरा आंकड्यांची ह्मण-

जे, २८१, ४७४, ९७६, ७१०, ६५६ ही होती. ह्यांतील प्रत्येक आंकडा अगदीं बरोबर होता. त्याला सहा आंकड्यांच्या रकमेचें वर्गमूळ विचारिलें असतां तो तें तावडतोब आणि अगदीं बिनचूक सांगे. फार तर काय पण दशकोटीसंख्येचें घनमूळ विचारल्याबरोबर तो तावडतोब सांगत असे. एकदां त्याला एकानें ४८ वर्षांचीं मिनिटें किती ह्मणून विचारिलीं. तेव्हां त्यानें २५२, ८८, ८८० असें एकदम सांगितलें.

मोझार्ट ह्या नांवाचा एक प्रसिद्ध गायनशास्त्रज्ञ होऊन गेला. तो चार वर्षांचा असतांच त्यानें लहान लहान पदें रचिलीं होतीं, व आठवे वर्षीं तर त्यानें एक संगीत नाटक रचलें होतें. **थेरेसो मिलानोला** नांवाची जी एक स्त्री तंतुवाद्यांत प्रवीण होऊन गेली, ती अल्पवयांतच सारंगी इतक्या उत्कृष्ट रीतीनें वाजवित असे कीं, तें पाहून पुष्कळ लोक असें ह्मणत असत कीं, तिनें तंतुवाद्यांचा अभ्यास पूर्वजन्मींच केलेला असावा. ह्याप्रमाणेंच बाल्यावस्थेंत ज्यांनीं आपल्या अंगच्या अलौकिक बुद्धिसामर्थ्यानें लोकांना आश्चर्यचकित करून सोडिलें, असे कित्येक शिल्पज्ञ आणि चित्रकार होऊन गेल्याचीं उदाहरणें आढळतात. **श्रीमच्छंकराचार्य** ह्यांनीं आपल्या बारावे वर्षींच वेदान्त ग्रंथांवरील ह्मणजे उपनिषदें, गीता, ब्रह्मसूत्र यांवरील भाष्य पुरें केलें. असल्या उदाहरणांचें स्पष्टीकरण वंशपरंपरेच्या कल्पनेनें कसें करतां येतें? **जोसेफ हाफमन** ह्मणून एक प्रसिद्ध पिआनो वाजविणारा होऊन गेला. तो दहा वर्षांचा असतांच त्यानें आपलें अद्भुत बुद्धिसामर्थ्य आणि पिआनोमध्यें पूर्ण प्राविण्य लोकांना दाखविलें होतें. तसेंच **होमर, प्लेटो, शेकसपिअर, बीथोव्हेन, राफेल,** ह्या पुरुषांनीं बाल्यावस्थेंतच जी लोकोत्तर बुद्धिमत्ता प्रकट केली, त्याचा संबंध त्यांच्या पूर्वजांच्या वंशावळींतील कोणाकडेहि लावतां येत नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांत, साक्रेटिस, प्लेटो, सीझर, ख्राइस्ट, न्यूटन, स्पेन्सर व आमच्या राष्ट्रांत बुद्ध, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, बाळाजी विश्वनाथ, कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादिकांच्या वाडवडिलांमध्यें असे काय उत्तम

गुण होते कीं, हीं मानवरत्नें त्यांच्याच पोटीं जन्मास यावीं ? सारांश अलौकिक बुद्धितेज आणि शक्ति कशीं उत्पन्न होतात याचें समाधानकारक उत्तर पुनर्जन्मतत्त्वावांचून अन्य कोणत्याहि तत्त्वानें देतां येत नाहीं.

असो. वेदांतीलोक पुनर्जन्मतत्त्वाचे समर्थनार्थ दुसरें एक प्रमेय पुढें आणतात तें असें कीं, " विश्वांतील कोणत्याहि वस्तूंचा समूळ नाश होत नाहीं. " आधुनिक पदार्थविज्ञानशास्त्रवेत्त्यांप्रमाणेंच वेदांत मीमांसकांना एखाद्या वस्तूचा समूळ नाश होतो ही गोष्ट अगदीं अपरिचित आहे. ते असें म्हणतात कीं, "असत् हें सत् कधींहि होऊं शकत नाहीं. आणि सत् हेंहि कधीं असत् होऊं शकत नाहीं. अथवा हेंच अन्य शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे जी वस्तु पूर्वीं कधींच अस्तित्वांत नव्हती, तो अस्तित्वांत येणें शक्यच नाहीं; आणि उलटपक्षीं जी वस्तु कोणत्या तरी रूपानें अस्तित्वांत असेल, ती अगदीं नाहींशी झाली असेंहि कधीं होणार नाहीं. हा सृष्टिनियमच आहे. गीताशास्त्रांत,

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।

असें वचन आहे. त्याचाहि भावार्थ वरीलप्रमाणेंच आहे. त्यावरून पाहतां आज आपल्या मनावर जे संस्कार झाले, मनांत ज्या कल्पना उठल्या, आणि जें सामर्थ्य आज आपल्या ठिकाणीं आहे, त्या सर्वांचा समूळ नाश न होतां, तीं कोणत्याना कोणत्या तरी रूपानें आपल्या ठिकाणीं नेहमीं कायम राहणारच. आत्म्याला देहांतर प्राप्त होईल, अथवा आपल्या शरीरांत कदाचित् बदल होईल, पण सामर्थ्य, कर्म, संस्कार आणि शरीराचीं घटकावयवें हीं सर्व अव्यक्तरूपानें लिंगदेहांत कायम राहिलींच पाहिजेत. सृष्टिनियमाप्रमाणें त्यांचा नाश कधींहि होणार नाहीं. तसेंच शास्त्राचा असाहि एक सिद्धांत आहे कीं, जें जें कांहीं अव्यक्तदशेंत अथवा बीजरूपानें अस्तित्वांत असतें तें केव्हांना केव्हां तरी प्रत्यक्षरूपानें प्रकट झालेंच पाहिजे. व यावरून असें ठरतें कीं, आज ना उद्यां कधींतरी हीं शरीरें टाकून दुसरीं शरीरें अवश्य

धारण केलींच पाहिजेत. याच अर्थाचें एक वचन श्रीमद्भगवद्गीतेंत आहे. तें असें:—

' जातस्य हि ध्रुवो मृत्युः ध्रुवं जन्म मृतस्य च '

याचा अर्थ असा कीं, जो जो म्हणून जन्मास आला त्याला मरण हें ठेवलेलेंच, आणि ज्याला मृत्यु आला, त्याला पुनः जन्म हा ठेवलेलाच. अशा प्रकारच्या ह्या ' **पुनरपि जननं पुनरपि मरणं** ' चक्रांतून प्रत्येक प्राणबीजाला येरझारा घातल्यावांचून गत्यंतरच नाहीं.

पुनर्जन्मतत्त्वाविरुद्ध असा एक आक्षेप नेहमीं घेण्यांत येतो कीं, जर आम्हांला अनेक पूर्वजन्म झाले आहेत, तर त्यांपैकीं एकाची आम्हांला आठवण कां राहूं नये ? ह्या आक्षेपावरून बऱ्याच लोकांना पूर्वजन्म मान्य करावासा वाटत नाहीं. पण ही मंडळी असा विचार करीत नाहींत कीं आपल्या प्रस्तुत जन्मांतील कुमार अवस्थेंत आपल्या हातून ज्या अनेक गोष्टी घडल्या त्यांची तरी आपणांला आठवण होते काय ? मग पूर्वजन्माचें स्मरणाची वार्ता कशाला ? मीं लहानपणीं काय काय कृत्यें केलीं, ह्याचें स्मरण जरी मला आतां राहिलें नाहीं, तरी मला बाळपणच नव्हतें असें मला म्हणतां येईल काय ? मुळींच म्हणतां येणार नाहीं. सन १८८७ च्या मार्च महिन्याच्या २४ व्या तारखेस दोनप्रहरीं तुह्मीं काय केलें, ह्याचें तुह्मांला तरी स्मरण आहे काय ? तुम्हांला तें खचित आठवत नाहीं, एवढ्यावरून तुह्मी त्या तारखेला मुळीं नव्हतांच असें म्हणतां येईल काय ? कसें बरें म्हणतां येईल. अहो आपली स्मरणशक्ति फार कोती आणि अपूर्ण आहे. आपल्या मनांत बाल्यावस्थेंत जे जे संकल्पविकल्प उठले आणि स्वप्नांत ज्या ज्या गोष्टी आपण पाहिल्या त्या सर्वांची जर आपणांला आठवण करितां आली तर आपण पूर्वजन्मीं कोण होतों आणि काय केलें ह्याचें यथार्थ स्मरण फार सहज रीतीनें होईल. ज्यांना आपल्या पूर्वजन्मांची स्मृति होऊन लोकांनाहि सांगतां येते असे अनेक योगीपुरुष आढळतात. आणि त्यांचा खरेपणा अनेक तऱ्हेनें प्रस्थापित करितां येतो. **पातञ्जल** योगशास्त्रांत काय सांगितलें आहे पहा.

अपरिग्रहस्थैर्ये जन्मकथन्ता सम्बोधः ॥ ३९ ॥

साधनपादः ।

या सूत्राचा अर्थ असा कीं, त्यागाचा अभ्यास झाला म्हणजे योग्यास भूत भविष्य जन्माचें यथार्थ ज्ञान प्राप्त होतें. तसेंच आणखी एक सूत्र आहे तें असें कीं:—

संस्कारसाक्षात्करणात् पूर्वजातिज्ञानम् ॥ १८ ॥

विभूतिपादः ।

या सूत्राचा अर्थ असा आहे कीं, संस्काराचा प्रत्यक्षानुभव आल्यानें पूर्वजन्माचें ज्ञान प्राप्त होतें. संस्कार दोन प्रकारचे आहेत. १ स्मृति व पांच प्रकारच्या क्लेशांचें कारण हे मिळून वासनारूप संस्कार होतात. २ ज्यांचें कारण फळ आहे तें धर्माधर्मरूप असतें. हे संस्कार पूर्वजन्मींच्या कर्माचे असतात. याप्रमाणें जैगीषव्य ऋषीस दहा कल्पांतील जन्मांचें ज्ञान झालें होतें. विद्युन्मानस शास्त्राचे कर्ते **मेस्मेर** हे ‘ दिव्य दृष्टी ’ (Clair voyance) संबंधानें असें लिहितात कीं, “ मनुष्याच्या अंतरिंद्रियांचा सृष्टीशीं संबंध असल्यामुळें तो नेहमीं अशाच स्थितींत असतो कीं, त्यांत त्याला कार्यकारणभावाचें ज्ञान होतें, असा जेव्हां मानवजातीविषयीं आपण विचार करितों, तेव्हां आपणांला असें कळून येतें कीं, पूर्वस्थितीचें ज्ञान म्हणजे केवळ हल्लींच्या कार्यांवरून मागें घडलेल्या कारणांचा बोध होय. आणि भावीस्थितीचें ज्ञान ह्मणजे हल्लीं घडणाऱ्या कारणांवरून पुढें निष्पन्न होणाऱ्या कार्यांचा बोध होय. ” असो, ह्या सर्वांचें कारण ‘ धारणा ’ शक्ति हेंच आहे. ही शक्ति कशी वाढवावयाची आणि तेणेंकरून पूर्व जन्मांतील गोष्टींचें ज्ञान कसें होतें हें योग्यांनाच चांगलें ठाऊक असतें. ते असें म्हणतात कीं,—काल आणि देश आपल्या प्रस्तुतच्या मानसिक स्थितीशीं सापेक्षानेंच अस्तित्वांत असतात म्हणजे ते अपरिछिन्न व अनंत असून आपलें मन मात्र मर्यादित व परिच्छिन्न आहे. ही मर्यादा ओलांडून जर आपण पलीकडे गेलों तर आपल्या श्रेष्ठ मनाला वर्तमान-

कालच्या वस्तु जशा स्पष्ट होतात, त्याप्रमाणेंच भूतकाळीं काय झालें आणि भविष्यत्काळीं काय होणार याचें ज्ञान होऊं शकतें. **गौतम बुद्धाला** आपल्या पूर्वजन्मापैकीं अनेकांची आठवण होती हें प्रसिद्धच आहे. ज्यांना आपल्या मनाची ही कोरडी जिज्ञासा संतृप्त करून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं पूर्वजन्माची आठवण करण्याचा प्रयत्न योगमार्गांत सांगितल्याप्रमाणें करून आपल्या शक्तीचा व्यय पाहिजे तर खुशाल करावा. पण मला वाटतें आपण आपल्या शक्तीचा उपयोग आपल्या भावी स्थितीला चांगलें वळण लावण्याकडे आणि आपल्याला आहे त्यापेक्षां चांगली स्थिति प्राप्त करून घेण्याकडे जर केला तर फार हिताचें होईल. कारण पूर्वस्थितीची आठवण करून घेणें ह्मणजे वर्तमानस्थितीचा दुरुपयोग करून घेण्यास स्वतःस भाग पाडणेंच होय. पूर्वजन्मांत घडलेल्या दुष्कर्मांचीं फळें आतां आपणांला खात्रीनें भोगावीं लागणार, आणि थोड्याच अवधींत संकट, विपत्ति, यातना, वगैरे आपणांवर ओढवणार हें ज्याला कळलें आहे तो केवढा दुर्भागी समजला पाहिजे ! अशा मनुष्याचा जन्म इतक्या अस्वस्थतेंत आणि दुःखांत जातो कीं, त्याचे हातून पुढें कोणतेंच कार्य चांगल्या रीतीनें तडीस जात नाहीं; मजवर आतां विपत्ति कोणती ओढवणार याच विवंचनेंत तो सदैव गढलेला असतो. त्याला खाणें सुचत नाहीं. निद्रा देखील सुचत नाहीं. सारांश असला मनुष्य ह्मणजे अत्यंत दुःखीच ह्मणावयाचा. आपल्याला आपल्या पूर्वजन्माची आणि पूर्वकर्मांची स्मृति नाहीं हें खरोखर महद्भाग्यच समजलें पाहिजे. वेदान्तशास्त्रांत लिहिलें आहे कीं, पूर्वजन्माविषयीं विचार करण्यांत आपला अमूल्य वेळ दवडूं नये, उत्क्रांतीच्या ह्या नानाविध पायऱ्यांवरून हा कंटाळवाणा प्रवास करीत असतां मागें दृष्टि देऊं नका, दृष्टि सदैव समोर ह्मणजे प्रगतीकडे असूं द्या, आणि पारमार्थिक उन्नतीच्या अत्युच्च पदाप्रत पोहोंचण्याचा प्रयत्न करा; आणि नंतर तुह्मांला आपले पूर्व जन्म कोणकोणते हें ठाऊक व्हावेंसें वाटल्यास ते सर्व तुह्मांला आपोआप सुचतील. तुह्मांला त्या स्थितींत अज्ञात असें कांहींच राहणार नाहीं.

तुह्मांला ब्रह्मांडाचें ज्ञान त्यावेळीं होईल. जेव्हां सच्चिदानंदस्वरूप तुमच्या ठिकाणीं प्रकट होईल तेव्हां काल आणि देश ह्यांचा प्रत्यवाय नाहींसा होईल, व भूत आणि भविष्यत्कालाला शाश्वत वर्तमान कालाचें रूप प्राप्त होईल.नंतर श्रीमद्भगवद्गीतेंत श्रीकृष्ण परमात्म्यानें आपल्या अर्जुन भक्तास सांगितल्याप्रमाणेंच तुमचा तुह्मांलाच अनुभव येईल कीं,

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ॥
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ५ ॥

भगवद्गीता अ. ४.

म्हणजे अर्जुना आजपर्यंत माझे पुष्कळ जन्म होऊन गेले, तसे तुझेहि झाले आहेत, पण माझ्या जन्मांचें ज्ञान मला आहे, तुला मात्र तुझ्या जन्मांचें ज्ञान नाहीं.

ॐ तत्सत्

श्री.

'उत्क्रांति आणि पुनर्जन्म'

नंबर ९

अर्वाचीन शास्त्रानें जे आश्चर्यकारक शोध लाविले आहेत, तेणेंकरून ज्ञानमंदिराचीं नवीन नवीन द्वारें प्रत्यहीं खुलीं होत आहेत, आणि मानवी मनांची धांव क्रमशः विश्वाचे अन्तिम सत्याचे अधिकाधिक सन्निध येऊन ठेंपत आहे. शास्त्रानें प्रज्वलित केलेल्या ज्ञानदीपानें, गतकालाच्या मूढ विश्वासानें पवित्र ठरलेल्या आणि सत्यसंशोधकांच्या मार्गांत व्यत्यय ह्मणून असलेल्या अंधकाररूपी अनेक मतांचा आणि धर्मपंथांचा अगदीं नाश करून टाकिला आहे. हें विश्व एखाद्या अमानुष सामर्थ्याच्या प्रभावानें शून्यापासून—कांहीं नाहींपासून—निर्माण झालें ही कल्पना शास्त्रानें प्रथमतः अगदीं निराधार ठरविली आहे. शास्त्रानें आणखी असें निदर्शनास आणून दिलें आहे कीं, त्यावेळीं ह्या विश्वाला हल्लींचें रूप नव्हतें, अथवा केवळ कांहीं हजार वर्षांपूर्वीं तें एकाएकीं अस्तित्वांत आलें नाहीं, तर त्याला हल्लींचें रूप प्राप्त होण्यापूर्वीं नानाविध अवस्थांतून भ्रमण करण्यास युगानुयुगें लागलीं आहेत. ह्या अवस्थांपैकीं प्रत्येक अवस्थेचा तिच्या पाठीमागील अवस्थेशीं कार्यकारणानियमानें अगदीं प्रत्यक्ष संबंध होता. ह्या कार्यकारणभावाचे व्यापार सदैव ठराविक नियमानुसार चालत असतात. शास्त्रानुरोधें दृश्य विश्वचमत्कार हे उत्क्रांतिनियमाखालीं येतात ह्मणजे क्रमशः फेरबदल होऊन सापेक्ष अशा समत्वस्थितींतून सापेक्ष संमिश्र स्थितींत विकास पावण्यास ते पात्र असतात. अत्यंत मोठ्या सूर्यमालेपासून ते तहत अत्यंत लहानशा गवताच्या पातीपर्यंत विश्वांतील यच्चयावत् वस्तुजाताला ह्या जगदुत्क्रांतिपद्धतीद्वारा हल्लींचा आकार आणि रूप प्राप्त झालें आहे. ग्रहमालेंतील आपला पृथ्वीग्रह हाहि प्रथमतः वायुरूपावस्थेंत असणाऱ्या धूम्ररूप गोळ्यांतून (Nebulous Mass) क्रमशः उत्क्रमण पावला आहे

असें ह्मणतां येईल. सूर्य, चंद्र, नक्षत्रगण, उपग्रह आणि इतर ग्रह हे-हि जगदुत्क्रांतिपद्धतीच्या द्वारां अगणित विकार पावून अस्तित्वांत आले आहेत. ह्याच पद्धतीच्या द्वारां, वनस्पति, कीटक, मत्स्य, सर्प, पक्षी, प्राणि, मनुज आणि पृथ्वीतलावर वास करणारें यच्चयावत् सजीव द्रव्य ह्या सर्वांचे सूक्ष्मप्राण बीजापासून उत्क्रमण होऊन हल्लीचीं रूपें त्यांना प्राप्त झालीं आहेत. उत्क्रांति तत्त्व आपणांस असें सांगतें कीं, मानवीवर्ग हा एकाएकीं अस्तित्वांत आला नसून त्याचा कनिष्ठ कोटींतील प्राण्यांशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीतीनें संबंध पोहोंचतो. प्राणबीजाला मानवीरूप प्राप्त होण्यापूर्वीं भौतिक रूपाच्या नानाविध अवस्थांतून भ्रमण करावें लागलें होतें. शास्त्राच्या ज्या शाखेला 'गर्भशास्त्र' असें ह्मणतात. त्या शास्त्रावरून एवढी गोष्ट सिद्ध झाली आहे कीं, "मानवी वर्ग हा अखिल सृष्टीचा सार आहे." त्या शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, मानवी देह प्राप्त होण्याचे पूर्वीं प्राण्याला ८४ लक्ष योनींतून भ्रमण करावें लागतें. सृष्टीचे व्यापार सदैव सुसंगत आहेत. तिचे नियम एकसारखे आहेत. आणि जें पिंडीं (ब्रह्मांडाचें अत्यंत सूक्ष्मरूप Microcosm) तें ब्रह्मांडींहि (पिंडाचें अत्यंत विस्तृतरूप Macrocosm) आहे, एवढी गोष्ट ध्यानांत धरून जर सृष्टीचें पर्यालोचन केलें तर आपणांस असें आढळून येईल कीं, या विश्वांतील यच्चयावत् प्राणबीजाला मानवरूपानें प्रकट होण्यापूर्वीं गर्भावस्थेसारख्या अवस्थांतून भ्रमण केलेंच पाहिजे.

उत्क्रांतितत्त्वाचें विशदीकरण करितांना शास्त्रानें आपणांस असें सांगून ठेविलें आहे कीं, ज्यांच्या योगें उत्क्रांति होते अशा दोन प्रमुख शक्ति आहेत. प्रत्येक सृष्ट पदार्थ मग तो वनस्पतिकोटींतील असो वा प्राणिकोटींतील असो, आज जसा आहे तसाच कायम राहत नाहीं. त्याच्या रूपांत व स्थितींत नेहमीं बदल होत असतो. दुसरें, प्रत्येक पदार्थाचें जें हें अवस्थांतर होत असतें, त्यावर परिस्थितीचा परिणाम--मग तो त्या अवस्थांतरास अनुकूल असो वा प्रतिकूल असो-होत असतो. पहिली-अवस्थांतर करण्याची शक्ति अथवा प्रवृत्ति-त्या त्या पदा-

थींत असते, व दुसरी-त्या अवस्थांतरावर कांहींएक प्रकारचा परिणाम घडवून त्याला वळण देण्याची शक्ति परिस्थितींत असते. पहिल्या शक्तिवांचून कोणत्याहि प्रकारें उत्क्रांति होणें मुळीं शक्यच नाहीं. पण अवस्थांतर करणाऱ्या ह्या सहज प्रवृत्तीचें कारण मात्र शास्त्राला अद्याप अवगत झालें नाहीं, ‘ स्वाभाविक आवड निवड ’ ह्या दुसऱ्या प्रवृत्तीवरच अवलंबून असते. अवस्थांतर तरी जीवाच्या अनुकूल परिस्थितीला अनुरूप असें असलें पाहिजे. आणि ह्मणूनच प्राणबीज हें एक तर योग्य परिस्थितीची निवड करितें अथवा सभोंवतालची परिस्थिति प्रतिकूल असल्यास त्यांना योग्य असेंच भिन्नरूप तें धारण करितें. ह्या नैसर्गिक आवडनिवडणुकीच्या नियमांतील हेतु ह्मटला ह्मणजे जीवनार्थकलह हाच होय, व त्याचें महत्त्व कमी आहे असें नाहीं. एवंच उत्क्रांति ही तीन नियमांवर अवलंबून असतें. अवस्थांतर करण्याची प्रवृत्ति (Tendency To Vary) , नैसर्गिक आवड निवड (Natural Selection), आणि जीवनार्थ कलह (Struggle for existence). मानवी वर्गाच्या भौतिक, मानसिक, बुद्धिविषयक, नैतिक, आणि पारमार्थिक उत्क्रांतीचें विशदीकरण करण्याचा शास्त्रानें जो प्रयत्न केला आहे तो ह्यावरील तीन नियमांच्या द्वारा आहे. पण यच्चयावत् सजीव स्वरूपांच्या प्रत्येक अवस्थेंत वास करणाऱ्या ह्या अवस्थांतरजनक सहज प्रवृत्तीच्या कारणाचा जोंपर्यंत शास्त्राला शोध लागणार नाहीं, तोंपर्यंत उत्क्रांतितत्त्व हें बुद्धीला अगम्यच राहणार.

आपण बारकाईनें जर निरीक्षण केलें तर आपणांला असें दिसून येतें कीं, मानवी जीवात्म्याला दोन प्रकारच्या प्रकृति असतात, एक पशुप्रकृति व दुसरी उच्च ह्मणजे नैतिक अथवा अध्यात्मिक प्रवृत्ति. प्राण्याच्या सर्व प्रवृत्ति इंद्रियसुखोपभोग घेण्याची वासना, जीवात्म्यावरील प्रीति, मृत्यूचा भीति, आणि जीवनार्थकलह ह्यांचा पशुप्रकृतींत अंतर्भाव होतो. ह्यांपैकीं प्रत्येक गोष्ट नीच कोटींतील प्राण्यांच्या ठिकाणीं तसेंच मानवी प्राण्यांच्या ठिकाणीं आढळते. पण या दोन कोटींतील प्राण्यांच्या प्रवृत्ति, वासना वगैरेमध्यें जो विशेष दृष्टीस पडतो तो एक

प्रकारचा नसून पर्यायाचाच असतो. मूळच्या अगदीं अडाणी लोकांत ह्या पशुप्रकृतीचें व्यक्त स्वरूप अगदीं साधें आणि सहज असतें. पण सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेल्या राष्ट्रांतील लोकांची पशुप्रकृति साध्या आणि सरळ मार्गानें व्यक्त न होतां मोठ्या चतुराईनें आणि शिष्टपणें निदर्शनास येते. हीच प्रकृति सुधारलेल्या समाजांत नानाविध युक्त्या प्रयुक्त्यांच्या द्वारा आपला व्यापार करीत असते, आणि तिचे परिणामहि एकच असतात; पण ते जरा सभ्यरीतीनें प्रकट होत असतात. नीच कोटींतील प्राणि आणि रानटी स्थितींतील लोक ह्यांच्यामध्यें जो जीवनार्थकलह चालतो त्यांत जे कोणी शरीरानें मजबूत असतात ते टिकाव धरून जगतात, आणि शरीरानें दुर्बल जे असतात त्यांच्यावर मजबूत लोक आपलें वर्चस्व प्रस्थापित करितात. सुधारलेल्या जगांतहि हेंच कार्य घडून येतें. पण तें शारीरिक शक्तीच्या जोरावर नव्हे तर विद्या, सामप्रयोग, नीति, समरपाटव, आणि चातुर्य ह्यांच्या जोरावर घडतें. शारीरिक संपत्ति अधिक असूनहि ज्यांना शास्त्रांचा उपयोग कसा करावा ह्याचें ज्ञान नसतें अशा लोकांना जिंकण्याकरितां नानाप्रकारचीं संरक्षक आणि विघातक अशीं शस्त्रें तयार करण्यांत आलीं आहेत. रानटी लोकांत आणि नीच कोटींतील प्राण्यांचे ठिकाणीं पशुप्रकृतीचें जें साधें स्वरूप दिसून येतें तें उत्क्रांतीच्या सहज पद्धतीनें क्रमशः अधिकाधिक भानगडीचें झालें आहे; उदाहरणार्थ जें स्वरूप आपल्याला जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांत दिसून येतें तें मानवी पशुप्रकृतीचें सामर्थ्य मुख्यत्वेंकरून भौतिकअस्तित्वाकरितां झगडण्यांतच खर्चीं घालण्यांत येतें.

पण मानवी वर्गाचें ठिकाणीं याहून उच्चतर अशी दुसरी एक प्रकृति आहे तिचींहि कार्यें नानाविध मार्गानेंच प्रकट होतात. पण ते मार्ग मात्र श्रेष्ठ प्ररकारचे असतात. सत्यप्रीति, मनोविकारांवर पूर्ण ताबा, इंद्रियदमन, निष्कामस्वार्थत्याग, सर्वांभूतीं दया आणि कृपा, दुःखितांना मदत करण्याची सदिच्छा, क्षमा, परमात्म्याच्या ठिकाणीं श्रद्धा आणि भक्ति हीं सर्व त्या नैतिक आणि आध्यात्मिक प्रकृतीचीं व्यक्त रूपें हो-

त. हीं सर्व भौतिक अस्तित्वाकरितां झगडण्यानें पशुप्रकृतींतूनच उन्नतावस्थेप्रत पावलीं असें ह्मणतां येणार नाहीं. कारण जीवनार्थकलह हा जरी कनिष्ठ कोटींतील प्राण्यांच्या ठिकाणीं चालू आहे, तथापि हे वरील गुण त्यांच्या ठिकाणीं आढळत नाहींत. मानवी प्राण्यांची नैतिक आणि आध्यात्मिक प्रकृतिहि त्यांच्या पशुवत् प्रकृतीपासून क्रमशः उत्क्रमण पावली आहे असें ह्मणण्यास कांहींहि आधार नाहीं. त्यांच्या कारणाचें विशदीकरण करण्याचे रीतिसंबंधींच उत्क्रांतिवाद्यांमध्यें वाद आहे. कित्येक ह्मणतात कीं, हे श्रेष्ठतर गुण नीचगुणापासून उत्क्रमण पावले असून अवस्थांतर आणि नैसर्गिक आवडनिवड ह्यांच्या योगें उन्नतावस्थेप्रत येऊन पोहोंचले आहेत; आणि कांहींजण ह्मणतात कीं, ह्या सर्वांच्या मुळाशीं कांहीं तरी अन्य श्रेष्ठ शक्ति, नियम, अथवा कार्यकारी तत्त्व हें जरूर असतेंच.

प्रो. हक्स्ले ह्मणतो कीं,—“ मीं पूर्वीं प्रतिपादन केलेंच आहे कीं नीतिशास्त्रदृष्ट्या जें अत्युत्कृष्ट सदाचरण त्यांत ज्या प्रकारच्या वर्तनक्रमाचा अंतर्भाव होतो त्याचा, जगांतील जीवनार्थकलहांत शेवटीं यशप्राप्ति करून देणारा जो वर्तनक्रम त्याच्याशीं सर्वांशीं विरोध आहे. ह्मणजे जीवनार्थकलहांतील वर्तनक्रमांत ‘ निर्घृण स्वाभिमान ’ व्यक्त होतो, तर इकडे नीतियुक्त वर्तनक्रमांत ‘ आत्मसंयमन ’ अवश्यमेव पाळावें लागतें; तिकडे प्रतिस्पर्धी लोकांच्या हक्काची पायमल्ली होत असते, तर इकडे प्रत्येक व्यक्तिमात्राविषयीं केवळ आदरबुद्धिच ठेवून चालत नाहीं, तर बांधवांना साहाय्यहि करावें लागतें; नीतियुक्त आचरणाचा रोख, या जीवनकलहांत जगण्याचें सामर्थ्य ज्यांच्या अंगीं असेल त्यांच्यांतील बलवानांनीं तेवढें जगावें, बाकीच्यांचा नाश व्हावा, असा नसतो, तर सृष्ट पदार्थांत जगण्याचें सामर्थ्य उत्पन्न करून देण्याकडे असतो. ‘बळी तो कान पिळी’ या न्यायाचें नीतिशास्त्र निराकरण करतें. नीतियुक्त आचरणांत आणखी एक गोष्ट पाळावी लागते तीही कीं, नीतीच्या फायद्यांचा उपभोग घेण्यास तयार असलेल्या प्रत्येक मनुष्यानें, ज्यांनीं जीवापाड मेहनत करून तें नीतिशास्त्र रचून ठेविलें,

त्यांचें आपण ऋणी आहोंत, हें विसरतां कामा नये. आणि ज्या समाजपटावर आपणांला आपला जीवनव्यापार चालविण्याची परवानगी मिळाली आहे त्या पटाच्या तंतूंना आपल्या कोणत्याहि कृत्यानें धक्का पोहोंचणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. कायदे आणि नीतिवचनें ह्यांचा मुख्य हेतु, जगांतील ह्या जीवनार्थ धडपडीच्या पद्धतीचें नियमन करावें, आणि ज्या समाजाच्या संरक्षणानें आणि सामर्थ्यानें आपलें अस्तित्व जरी नाहीं तरी निदान आपलें आयुष्य रानटी स्थितींतील पशूंपेक्षां कांहीं अंशीं तरी चांगल्या रीतीनें जातें, त्या समाजाविषयीं आपलें कर्तव्यकर्म ओळखण्यास व्यक्तिमात्राला जागृत करणें, हा आहे. (Evolution and ethics p. p.81—82.)

प्रो० काल्डरवुड ह्मणतो कीं,– " मानवी ऐंद्रिय रचनेच्याच दृष्टीनें जर पाहिलें तर उत्क्रांतितत्त्वाला दुस्तर अशा अडचणी मुळींच नाहींत, पण विचारवान आत्मनियमन करणारा असा जो प्रत्यक्ष मानवी जीवात्मा त्याचें अस्तित्व मात्र उत्क्रांतितत्त्वानें स्थापित होणें अशक्य दिसतें." एवंच कांहीं नामांकित तत्त्ववेत्यांच्या दृष्टीनें मनुष्याची नैतिक आणि परमार्थिक प्रकृति ही त्याच्या पशुतुल्य प्रकृतीपासूनच उन्नतावस्थेप्रत आली आहे. हें विवरण अगदींच अपुरें आणि असमाधानकारक ठरतें. जीवनार्थकलहांतील नैसर्गिक आवडानिवडणूकीच्या उपपत्तीनें मानवी वर्गाच्या श्रेष्ठतर प्रकृतीचें कारण काय असावें हें सांगतां येत नाहीं. त्या उपपत्तीच्या योगें अनेक गोष्टींचें विवरण होतें, एवढ्यावरून ती सर्वांशीं पूर्ण आहे असें आपणांस ह्मणतां यावयाचें नाहीं. उलटपक्षीं एकच गोष्ट कां होईना, पण त्या उपपत्तीच्या योगें जर तिचें समाधान होत नाहीं, तर ती अपूर्णच आहे असें नाहीं कां सिद्ध होत? ज्या उपपत्तीच्या योगें मनुष्याच्या नैतिक आणि पारमार्थिक प्रकृतीच्या कारणाचें समाधानकारक रीतीनें विशदीकरण होत नाहीं ती उपपत्ति पूर्ण असें कधींहि ह्मणतां येणार नाहीं. ज्या विशदीकरणाच्या योगें पशुतुल्य, नैतिक आणि पारमार्थिक प्रकृतीच्या नानाविध प्रकटरूपांविषयीं अत्यंत समाधान होतें त्यालाच पूर्ण विशदीकरण असें ह्मण-

तां येईल. शिवाय अवस्थांतर उत्पन्न करणारी प्रवृत्तिच मनुष्याच्या नैतिक आणि पारमार्थिक प्रकृतींत उत्क्रमण पावली आहे, असें जरी गृहीत धरलें, तरी त्या प्रवृत्तीचे कारणाचा अथवा पशुवत् प्रकृतीचें नैतिक आणि आत्मिक प्रकृतींत रूपांतर कसें होतें याचाहि उलगडा आधुनिक शास्त्रानें होत नाहीं. ती अवस्थांतर करणारी प्रवृत्ति अमर्यादित आहे, अथवा एकाद्या ठराविक नियमानें ती मर्यादित आहे याबद्दल आधुनिक शास्त्र कांहींच सांगत नाहीं.

अध्यात्मवादी (Theologiaus) असें सांगतात कीं कोणत्या तरी जगद्व्यतिरिक्त अशा आत्मिक कर्तृत्व शक्तीच्या योगें पशुवत् प्रकृतींत आत्मिक प्रकृतीची भर पडली आहे, पण हें त्यांचें ह्मणणें शास्त्रसंमतहि नाहीं अथवा तें आपल्या बुद्धीला प्रमाणभूत असें पटत नाहीं.

आतां ह्या प्रश्नासंबंधीं वेदांताचें काय ह्मणणें आहे तें आपण पाहूं. वेदांताला उत्क्रांतितत्त्व संमत आहे, अवस्थांतर आणि स्वाभाविक आवडनिवड यांचे नियमहि कबूल आहेत. पण आधुनिक शास्त्रापेक्षां वेदांत शास्त्र हें एक पायरी पुढें असून त्यांत अवस्थांतर उत्पन्न करणाऱ्या प्रवृत्तीचे कारणाचा उलगडा केलेला आहे. वेदांतांत असें सांगितलें आहे कीं, जें प्रारंभींच नव्हतें तें अंतींहि असणार नाहीं. हा नियम उत्क्रांतिपद्धतीला आणि कार्यकारणभावाला सारखाच लागू आहे. आणि सृष्टीचें हें महत्सत्य जर आपणांला कबूल आहे, तर मानवी वर्गाची श्रेष्ठतर प्रकृति क्रमशः व्यक्तरूपाप्रत कशी येते ह्याचा उलगडा उत्क्रांतितत्त्वाचे साहाय्यानेंच करणें अवघड नाहीं. शास्त्रसंमत जो 'एकतत्त्ववाद' त्याचा रोंख ह्याच गोष्टीचा उलगडा करण्याकडे आहे.

आधुनिक शास्त्रज्ञांपैकीं एकतत्त्ववाद्यांनीं जें सत्य शोधून काढिलें आहे, तेंच सत्य भारतवर्षीय वेदांत शास्त्रज्ञांना कित्येक वर्षांपूर्वींच आढळलें होतें. आधुनिक काळचे प्रख्यात आंग्ल शास्त्रज्ञ जे. **आर्थर थाम्पसन** ह्मणतात कीं, "जग हें द्विधा नसून एक आहे ह्मणजे जगांत द्वैत नसून अद्वैत आहे. आत्मिक प्रवृत्तीचा ओघ हाच आदितत्त्व आहे, आणि जें प्रारंभींच नव्हतें तें अंतींहि असणार नाहीं." पण उत्क्रांतिवा-

ह्यांना हें तत्त्व संमत नाहीं. हें अधिक स्पष्टपणें आपण समजून घेऊं
या. ह्या वरील तत्त्वाचा अर्थ असा कीं उत्क्रांतीच्या प्रारंभीं जें बीजरूपा-
नें अस्तित्वांत होतें तेंच उत्क्रांतीच्या नानाविध अवस्थांतून आणि पा-
यऱ्यांवरून क्रमशः व्यक्तरूपास आलें आहे. एकच कवच असणारें अ-
त्यंत सूक्ष्म असें प्राणबीज अथवा ज्याला आपण लिंगदेह असें
म्हणतों, तें उत्क्रांतीच्या नानाविध अवस्थांतून भ्रमण केल्यानंतर शे-
वटीं मानवी प्राण्यासारख्या अत्युन्नत रूपानें व्यक्तदशेस आलें आहे,
हें जर आपणांला कबूल आहे तर व्यक्तदशेस आलेल्या यच्चयावत्
शक्ती लिंगदेहांत बीजरूपानें अस्तित्वांत होत्या हीहि गोष्ट आपणांला
कबूल करावी लागेल. कारण जें शेवटीं अस्तित्वांत असतें तें प्रारंभींहि
होतें, असा नियम आहे. पशुतुल्य नीच प्रकृति, श्रेष्ठतर प्रकृति, मन,
बुद्धि, आत्मा हीं सर्व प्राणबीजामध्यें अदृश्य रूपानें अस्तित्वांत अस-
तात हा सिद्धांत जर आपण कबूल केला नाहीं, तर असा एक प्रश्न स-
हजीं उद्भवतो कीं असत् हें सत् कसें होईल? पूर्वीं जें अस्तित्वांत नव्हतें
त्याला आतां अस्तित्व कोठून प्राप्त होणार? प्रत्येक प्राणबीजामध्यें सं-
भाव्यता आणि शक्यता अमर्याद असतात, असा वेदांतशास्त्राचा सि-
द्धान्त आहे. अदृश्यपणें वास करीत असणाऱ्या शक्तींच्या अंगीं दृश्य
होण्याची आणि पूर्णपणें विकास पावण्याची प्रवृत्ति असते. असा त्यांचा
प्रयत्न चालू असतांना, परिस्थितीला अनुरूप असे फेरबदल त्यांच्या-
मध्यें होत असतात. ह्मणजे त्या अनुकूल परिस्थिती प्राप्त करून घेतात,
किंवा तशी परिस्थिति प्राप्त होईपावेतों अदृश्य राहतात. ह्मणून बीजरू-
पानें अस्तित्वांत असणाऱ्या शक्ति व्यक्तदशेस येण्याकरितां जो प्रयत्न
करितात, त्याच्याच योगानें अवस्थांतर उत्पन्न होतें असें वेदांतशास्त्रा-
चें मत आहे. जेव्हां जीवाच्या आणि मनाच्या उत्क्रमणास प्रारंभ झा-
ला, तेव्हां प्राणबीजाच्या ठिकाणीं अदृश्यपणें असणाऱ्या क्रियाप्रति-
क्रियांच्या शक्यता खऱ्या ठरून, एकाअर्थीं त्या सर्व गोष्टी नव्या झा-
ल्या. सूक्ष्म प्राणबीजामध्यें केवढी प्रचंड शक्ति अदृश्यपणें वास करीत
असते. ह्याची कल्पना तें ह्या भौतिक जगांत स्थूलरूपानें व्यक्तदशेस

येईपर्यंत कोणालाहि करितां येणार नाहीं. वटवृक्ष ज्यानें कधीं जन्मांत पाहिला नाहीं, त्याला त्याचे बीजामध्यें केवढी प्रचंड शक्ति अदृश्यपणें वास करीत असते याची काय कल्पना होणार? जेव्हां मुलगा जन्मास येतो, तेव्हांच तो पुढें मोठा महात्मा अथवा अत्युत्कृष्ट कारागीर अथवा तत्त्ववेत्ता अथवा खुळा अथवा अत्यंत दुराचारी निपजेल हें आपणांस सांगतां येतें काय? जन्मलेल्या बालकाच्या भविष्यत् कालाचें त्याच्या मातापितरांना यत्किंचित्‌हि ज्ञान नसतें. तें मूल जसजसें वाढत जातें, तसतसें त्याच्या अंगच्या कांहीं अदृश्य शक्तींचा क्रमशः विकास होण्यास प्रारंभ होतो. ज्या शक्तींचें प्राबल्य सर्वांत अधिक असतें, त्या इतर शक्तींना दाबून ठेवून कांहीं कालपर्यंत त्यांचा विकास होऊं देत नाहींत. पण त्यांना जेव्हां अनुकूल परिस्थिति प्राप्त होते, तेव्हां त्याहि व्यक्तरूपानें प्रकट होतात. उदाहरणार्थ, एखाद्या द्रव्यामध्यें रासायनिक शक्ति हजारों वर्षेंपर्यंत कदाचित् अदृश्यावस्थेंत राहतील, पण प्रतिक्रिया करणाऱ्या दुसऱ्या शक्तींचा संसर्ग घडून जेव्हां त्यांतून त्या स्वतंत्रपणें बाहेर पडतात, तेव्हां त्या पुनः दृश्यरूपानें कांहींतरी परिणाम उत्पन्न करितात. तांबें आणि जस्त या उभय धातूंच्या ठिकाणीं विद्युत्प्रवाह हजारों वर्षेंपावेतों अदृश्यावस्थेंत होते, व त्या रुप्याच्या शेजारीं ठेविल्या असतां त्यावर त्यांचा कांहीं एक परिणाम घडत नव्हता. पण ह्या तिन्ही धातू कांहीं अवश्य लागणाऱ्या परिस्थितींत एकत्र केल्या तर 'रुपें' अगदीं जळून पार होतें. एखाद्या वृक्षाच्या वाळलेल्या बीजामध्यें त्यांतून वृक्ष निर्माण होण्याचें सामर्थ्य दोन अथवा तीन हजार वर्षेंपर्यंत सुद्धां अव्यक्तावस्थेंत कायम राहूं शकेल; पण त्याला अनुकूल परिस्थिति प्राप्त होतांच तें सामर्थ्य प्रकट होऊन त्यांतून वृक्ष वाढीस लागतो. प्राचीनकाळच्या वस्तूंचा महान शोधक जो **सर जी. वुइलकिन्सन्** ह्याला थिब्स येथें एका थडग्यांत रासायनिक क्रियेनें तोंड बंद करून ठेवलेल्या एका पात्रांत गव्हांचे कांहीं दाणे सांपडले. ते दाणे तेथें तीन हजार वर्षांपूर्वीं ठेवलेले असावेत. **पेटीग्र्यूनें** जेव्हां ते दाणे जमीनींत पेरिले, तेव्हां त्यांना कोंब फुटून त्यांचीं रोपें वाढलीं. एका इजि-

प्शिअन ममीच्या* हातांत कांहीं झाडांचे कंद सांपडले होते. ते निदान दोन हजार वर्षांपूर्वीचे असावेत. ते जेव्हां कुंड्यांतून लाविले तेव्हां त्यांना कोंब फुटून त्यांचें चांगलें जोमदार रोप तयार झालें. एवंच अदृश्य शक्तींना जेव्हां जेव्हां अनुकूल परिस्थिति प्राप्त होते, मग ती हजारों वर्षांचा कालावधि लोटल्यानंतर कां होईना, तेव्हां त्या शक्ति आपआपल्या गुणधर्मानुरूप व्यक्तदशेस येत असतात.

असो. ह्याप्रमाणेंच अदृश्यपणें वास करणाऱ्या मानसिक शक्तींचीहि उदाहरणें विपुल आहेत. ह्या मानसिक शक्ति कित्येक वर्षें आपल्या नियमित स्थितींत अदृश्य राहून, कांहीं अनियमित अवस्था, उदाहरणार्थ वेडानें प्राप्त होणारा त्वेष, वेडामुळें येणारी कायमची भयंकर स्थिति, तटस्थवायु, अमली पदार्थ अथवा औषधें यांच्या सेवनानें येणारी निद्रा इत्यादि प्राप्त झाल्या असतां त्यांचा विकास होऊन तेजोमय ज्ञानवत्ता प्रकट होण्याचा संभव असतो. आणि नियमित स्थितींत व्यक्त होणाऱ्या शक्तींचा लोप होऊन, त्या होत्या कीं नव्हत्या हें जाणण्यास साधन उरत नाहीं. साधारण नियमित स्थितींत एखाद्याचे ठिकाणीं वक्तृत्व, गायन, चित्रकला इत्यादिसंबंधीं बुद्धिसामर्थ्य आणि अनेक यांत्रिक कलेंतील असाधारण करामत हीं असतील असें ह्मणण्यास कांहींहि आधार सांपडत नाहीं, पण तींच वेडेपणाच्या स्थितींत पुष्कळ वेळ दृष्टोत्पत्तीस येतात. निद्राचाऱ्यांनीं (Somnambnlists) आपल्या गाढ निद्रावस्थेंत गणितशास्त्राचें अत्यंत बिकट सिद्धान्त सोडविले आहेत, आणि नानाप्रकारचीं कार्यें केलीं आहेत, व त्यांचें परिणाम पाहून आपल्या नियमित जागृतावस्थेंत त्यांचे तेच आश्चर्यचकित झाले आहेत. सारांश एवढी गोष्ट आपणांला कळून येते कीं, प्रत्येक व्यक्तिमात्राचें मन हें अनेक शक्ती, नानाविध संस्कार आणि कल्पना ह्यांचें भांडार आहे; ह्यांपैकीं कांहीं शक्ती, संस्कार आणि कल्पना आपल्या नियमित

---

* ईजिप्त देशांत मृतमाणसांचीं शरीरें कांहीं मालमसाला घालून जशींच्यातशीं ठेवण्याची चाल आहे. अशा प्रकारें जतन करून ठेवलेल्या शरीरास ममी असें ह्मणतात.

स्थितींत प्रकट होतात. व कांहीं अदृश्य राहतात. आपली हल्लींची मानसिक आणि शारीरिक स्थिति ही, ज्या कांहीं शक्ती आपल्या ठिकाणीं अदृश्यपणें अस्तित्वांत आहेत, त्यांचें प्रकटरूप होय, या पलीकडे दुसरें कांहीं नाहीं. जर नव्या शक्ती जागृत होऊन विकास पावूं लागल्या, तर आपलें सगळें स्वरूप बदलून नवें स्वरूप प्राप्त होईल. एका उपजातीपासून दुसरी उपजाति अशी जी उत्क्रांति होत आहे, तिच्या मुळाशीं तरी हेंच अदृश्य शक्तींचें प्रकटीकरण आहे. ख्रिस्ती शकाचें पूर्वी फार प्राचीनकाळीं, प्रख्यात भारतीय उत्क्रांतिवादी महामुनी पतञ्जली ह्यानें ह्या वरील कल्पनेचें वर्णन फारच थोड्या शब्दांत केलें आहे.* राजयोगाचें चतुर्थ पादांतील द्वितीय सूत्र काय आहे पहा. (स्वामी विवेकानंदकृत 'राजयोग' अथवा 'पातञ्जल योगसूत्रम्' कैवल्यपाद द्वितीय सूत्र)

'जात्यन्तरपरिणामः प्रकृत्या पुरात्'

याचा भावार्थ असा आहे कीं, जात्यन्तर होणें हा प्रकृतीच्या भर-

---

* ख्रिस्ताब्दाला सुरुवात होण्याच्या अगोदर कित्येक वर्षांपूर्वीं, भरतभूमींतील लोकांना उत्क्रांतितत्त्व अवगत झालें होतें ही गोष्ट वाचकांना ठाऊक असलीच पाहिजे. ख्रिस्ताब्दाच्या अगोदर सुमारें सातवे शतकांत, भारतिय उत्क्रांतिवाद्यांचा गुरु जो महामुनि **कपिल** ह्यानें तर्कशास्त्र आणि अध्यात्मविद्या यांच्या साहाय्यानें ह्या वरील तत्त्वाचें विशदीकरण प्रथमतः केलें होतें.

सर मोनिअर बुइल्यम्स हे आपल्या 'हिंदुधर्म आणि ब्राह्मणीधर्म' (Hinduism and Brahminism) नामक ग्रंथांत ह्मणतातः—"खरोखर कालगणनेचा विपर्यास करण्याची जर मला सवलत दिली, तर असें ह्मणावें लागतें कीं, **स्पायनोझा** जन्मास येण्याचे अगोदर दोन हजारांहूनहि अधिक वर्षांपूर्वीं हिंदुलोक स्पायनोझा मतानुयायी होते. डार्विनच्या अगोदर कित्येक शतकें पूर्वीं हिंदुलोकांमध्यें डार्विनचें मत प्रचलित होतें. आणि आजच्या शास्त्रज्ञांना उत्क्रांतितत्त्व मान्य होण्याच्या अगोदर, व 'उत्क्रांति' असा शब्द जगांतील कोणत्याहि भाषेंत अस्तित्वांत येण्याचे अगोदर कित्येक शतकांपूर्वीं हिंदुलोक उत्क्रांतिवादी होते." (पृ. १२ पहा).

प्रो० हक्स्ले म्हणतात कीं, "तारससचा **पॉल** जन्मास येण्याच्या अगोदर कित्येक युगें पूर्वीं भारतीय मुनींना उत्क्रांतितत्त्व अवगत होतें याविषयीं तिळमात्र संदेह नाहीं." (Science and Hebreeu tradition पृ. १५०).

तीचा—अतिशयत्वाचा—परिणाम होय. प्रकृतीचा पुरवठा बाहेरून न होतां अंतर्यामांतूनच होत असतो. जीवात्म्याला बाह्य जगतांतून ज्यास्त कांहींहि प्राप्त होत नाहीं. परंतु त्यांचा विकास योग्य रीतीनें प्रकट होण्याकरितां लागणाऱ्या परिस्थिति प्राप्त होण्यावर अवलंबून असतो. दुराचारी मनुष्य एकदम साधुवृत्तीचा झालेला आपल्या केव्हां केव्हां पाहण्यांत येतो. खुनी आणि चौर्यकर्म करणारे लोक साधु बनलेल्याचीहि उदाहरणें आहेत. ह्या लोकांत जी एकदम क्रांति होते, तिचें कारण एखादा धार्मिक असें सांगेल कीं, त्यांच्यावर परमेश्वरी अनुग्रह झाला ह्मणून त्यांच्या सर्व स्वभावांत बदल झाला. पण वेदान्त शास्त्र असें सांगतें कीं, नैतिक आणि आत्मिक सामर्थ्यें, जीं त्यांच्या ठिकाणीं अदृश्यपणें वास करीत होतीं तीं जागृत झालीं, आणि त्यांचें एकदम रूपांतर होणें हा त्या सामर्थ्यांचा परिणाम होय. अंगचीं गुप्त सामर्थ्यें केव्हां जागृत होतील, आणि त्यांचा विकास होण्यास केव्हां सुरुवात होईल हें कोणासहि सांगतां यावयाचें नाहीं. प्राणबीज अथवा सामान्यतः ज्याला जीवात्मा असें ह्मटलें आहे, त्यांच्या ठिकाणीं अमर्याद संभाव्यता असते. प्रत्येक प्राणबीज अथवा लिंगदेह आपल्या प्रकृतीरूपी ग्रंथाचें एका पाठीमागून एक पान उलटीत जणुं काय त्याचें अध्ययनच करीत आहे, असें ह्मणतां येईल. पहिल्यापासून शेवटपर्यंत सर्व पानें वाचून झालीं ह्मणजे अथवा हेंच अन्यशब्दांनीं बोलावयाचें झाल्यास, उत्क्रांतीच्या सर्वावस्थांतून परिभ्रमण झालें ह्मणजे, पूर्ण ज्ञान प्राप्त होऊन जीवाचा मार्ग संपतो. आपण आपल्या नीचतर प्रकृतीरूपी ग्रंथाचें एक एक पृष्ठ उलटित उलटित तो समग्र वाचून टाकिला आहे; हेंच निराळ्या शब्दांनीं लिहावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, अत्यंत सूक्ष्म जंतूपासून ते प्रस्तुतच्या मानवी जन्मापर्यंत प्राणिकोटींतील प्रत्येक अवस्थांतून परिभ्रमण आपण केलें आहे; व आतां आपण अशा पृष्ठांकडे वळलों आहों कीं, ज्यांत नैतिक आणि आत्मिक नियमांचा ऊहापोह केला आहे. एकाद्यास वाचलेलें पृष्ठ फिरून वाचावयाचें असल्यास तो तें वाचील. जसें एकादा ग्रंथ वाचतांना त्यांतील एकाद्या पृष्ठांत अथवा

भागांत जेव्हां एखाद्याचें चित्त विशेष गढून जातें, तेव्हां तो तें पृष्ठ अथवा तो भाग पुनः पुनः वाचतो आणि मनाचें पूर्णपणें समाधान होईपर्यंत दुसऱ्या पानाकडे अथवा भागाकडे तो ढुंकूनहि पाहत नाहीं. तद्वतच जीवितरूपी ग्रंथाचें अध्ययन करीत असतां, जीवात्म्याला एकादी विशिष्ट अवस्था जर प्रिय वाटली तर मनाचें पूर्ण समाधान होईपर्यंत त्या अवस्थेला तो चिकटून राहील. आणि नंतर ती अवस्था टाकून दुसरी अवस्था धारण करील, व दुसऱ्या पानांचें अध्ययन सुरू करील. एकाद्याचें वाचन फारच सावकाश होईल आणि दुसऱ्याचें अति सत्वर होईल; पण वाचन सावकाश होवो अथवा लवकर होवो; आपणांपैकीं प्रत्येकाला प्रकृतीच्या ग्रंथाचें समग्र समालोचन केलेंच पाहिजे. व तो आजना उद्यां पूर्णतेप्रत जाऊन पोहोंचणारच.

वेदांत मतानुरोधें उत्क्रांतीचें पर्यवसान आणि तिचा उद्देश पूर्णतेची प्राप्ति हाच होय. प्राणिकोटीची शारीरिक उत्क्रांति मानवी रूपानें पूर्णतेस पावली आहे. हल्लींच्या स्थितींत या जगतीतलावर मानवी रूपाहून उच्चतर रूप अन्य कोणतेंहि असूं शकणार नाहीं. मानवीरूप हें प्राणाच्या रूपाची पूर्णावस्था आहे. यावरून आपणांला असें अनुमान करितां येतें कीं, उत्क्रांतिनियमाचा प्रवाह पूर्णतेला नेऊन पोहोंचविणाऱ्या दिशेनेंच वाहत आहे. पूर्णता प्राप्त झाली, ह्मणजे करावयाचें असें कांहींच उरत नाहीं; सर्व कर्मांची परिसमाप्ति होते. सृष्टींत मानवी देहांतून अन्य एखादें श्रेष्ठतर रूप उत्क्रमण पावलें आहे असें आपल्या नजरेस पडतें काय ? मुळींच नाहीं. तेव्हां शारीरिक उत्क्रांतीचा हेतु प्राणिरूपाला पूर्णावस्था प्राप्त करून देणें हाच आहे असें ह्मणणें सयुक्तिक होणार नाहीं काय? तसेंच ज्या अर्थीं सृष्टिनियमाचा उद्देश आणि त्यांची पद्धतहि अखिल विश्वांत एकच आहे, त्या अर्थीं मानसिक, नैतिक आणि आत्मिक उत्क्रांतीचा हेतु मानसिक, नैतिक, आणि आत्मिक पूर्णता प्राप्त झाली ह्मणजेच परिपूर्ण होईल. मानसिक पूर्णता ह्मणजे बुद्धीचा पूर्ण विकास होय. आणि जेव्हां वस्तूंचें खरें स्वरूप आपणाला कळेल, अवस्तूवर वस्त्वारोप आपण करणार नाहीं, द्रव्याला आत्मा व

अशाश्वत वस्तूला शाश्वत असें ह्मणणार नाहीं, तेव्हांच आपले बुद्धीचा पूर्ण विकास झाला असें समजावें. अहंकाराचा (Selfishness) समूल उच्छेद याचेंच नांव नैतिक पूर्णता व आत्म्याचें खरें स्वरूप जें अमर, मुक्त, दिव्य, आणि वैश्विक सूत्रात्म्याशीं समरस असें आहे त्याचें प्रकटीकरण हीच आत्मिक पूर्णावस्था. जेव्हां आत्म्याचें प्रकटीकरण पूर्णपणें होतें तेव्हांच उत्क्रांतीच्या हेतूची परमावधी होते. प्रकृतीचा ओघ आपल्या अंगच्या सर्व सामर्थ्यांचें पूर्ण प्रकटीकरण करण्याकडे आहे. कांहीं शक्ती जेव्हां प्रबल असतात, तेव्हां त्यांचा विकास अगोदर होतो. आणि बाकीच्या तशाच गुप्त–निद्रित–राहतात. उत्क्रांतिपद्धतीप्रमाणेंच जेव्हां नीच प्रकृति पूर्णपणें विकसित असते, तेव्हां नैतिक आणि आत्मिक प्रकृति अदृश्य राहते. आणि नैतिक आणि आत्मिक प्रकृतींचा जेव्हां पूर्ण विकास झालेला असतो, तेव्हां नीच प्रकृतिही दबलेली अथवा गुप्त असते. सारांश नीच कोटींतील पशूंच्या ठिकाणीं, अथवा जे आपला जीवनव्यापार पशूप्रमाणें चालवित आहेत अशा मनुष्यांच्या ठिकाणीं नैतिक आणि आत्मिक प्रकृतींचें आविष्करण आपल्या नजरेस पडत नाहीं, त्याचें तरी कारण हेंच होय. शिवाय ज्याच्या ठिकाणीं अशा प्रकारचें हें नैतिक व आत्मिक प्रकृतीचें प्रकटीकरण होणें शक्य आहे, असा एखादा कोणी प्राणी जर असेल, तर तो मनुष्य हाच एकटा आहे.

जेव्हां जीवात्मा आपल्या आत्मिक प्रकृतीचें अध्ययन सुरू करितो, तेव्हां त्याच्या नीच प्रकृतीला क्रमशः खग्रास ग्रहण लागतें. जेव्हां श्रेष्ठतर प्रकृति प्रबल असते, तेव्हां नीच प्रकृतीचा अगदीं अपकर्ष होतो; तिच्या शक्तीचें श्रेष्ठतर प्रकृतींत रूपांतर होऊन ती समूल नाहींशी होते, व पुनः कधीं उदयास येत नाहीं. व नंतर आत्मा हा नीच प्रकृतीपासून अगदीं स्वतंत्र अथवा अलिप्त होतो. नीचप्रकृतीप्रमाणें श्रेष्ठ प्रकृतींतहि अनेक अवस्था आहेत. ह्यांपैकीं प्रत्येक अवस्थेंत जावत्कालपर्यंत जीवात्मा राहतो, तावत्कालपर्यंत ती त्याला बद्ध स्थितींत ठेवते. जसजशी त्याला श्रेष्ठतर पायरी प्राप्त होत जाते, तसतशा खालच्या अवस्था नाहींशा होऊन तेणेंकरून प्राप्त झालेली बद्धताहि संपते. पण

आत्मिक प्रकृतीच्या सर्व अवस्थांतून परिभ्रमण करीत करीत अखेरच्या पूर्णस्थितीप्रत येऊन पोहोंचतांक्षणींच मनुष्याला आपल्या अमर आणि दिव्य अशा खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार होतो, आणि तेव्हांच त्याचें खरें व्यक्तित्व प्रकट होतें. पण खऱ्या ज्ञानाच्या अभावामुळें, अनुक्रमानें प्राप्त झालेल्या प्रत्येक अवस्थेशीं आपलें तादात्म्य झालें आहे असें तो मानीत होता व प्रत्येक अवस्थेंत प्रकट झालेल्या सामर्थ्याशीं आपलें व्यक्तित्व अभेदरूपानें होतें, असें त्याला वाटत होतें. आणि ह्यामुळेंच त्याचा असा मिथ्या समज होतो कीं, प्रत्येक अवस्थेंतील फेरबदलांनीं आपण विकृत होतों. पण पूर्णस्थिति प्राप्त झाल्यावर त्याच्या असें प्रत्यास येतें कीं, आपलें खरें व्यक्तित्व हें नेहमीं अविकृतच राहिलें आहे; तसेंच व्यक्तित्वाला मर्यादावलित करणारे अनुबंध जरी भिन्न भिन्न असले, तरी आपलें खरें व्यक्तित्व हें नेहमीं एकाच मार्गानें प्रकाशित होतें. ज्याप्रमाणें दीपप्रकाश निरनिराळ्या रंगाच्या भिंगांतून पडला असतां निरनिराळ्या रंगाचा दिसतो, तद्वतच खरा जीव हा जेव्हां पशु कोटींतील अथवा मानवी कोटींतील सूक्ष्म शरीराच्या स्वरूपांतून भ्रमण करितो, तेव्हां त्याचा प्रकाश पशूच्या अथवा मनुष्याच्या रूपानें दृष्टीस पडतो. मनुष्याच्या सूक्ष्म शरीराला, त्याची नैतिक आणि आत्मिक उन्नति झाली ह्मणजे, पशूचें स्वरूप जाऊन दिव्य स्वरूप प्राप्त होतें. आणि ज्याअर्थीं ही क्रमशः होणारी उन्नति एकाच जन्मांत प्राप्त होईल अशी आशा करण्यास आपणाजवळ मुळींच साधन नाहीं, त्याअर्थीं पुनर्जन्माचें तत्त्व, जें आपणांस प्राणबीजाची क्रमशः उत्क्रांति होते अथवा जीवात्मा हा लक्षावधि योनींतून जन्म घेऊन नानाविध रूपें धारण करितो, असें शिकवीत आहे, तें मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं. नाहींपेक्षां उत्क्रांतितत्त्व अपूर्ण आणि हेतुविरहित असेंच राहील. सूक्ष्म शरीराची स्थूल रूपानें क्रमशः पण अखंड उत्क्रांति होते असें पुनर्जन्मतत्त्वाचें मत आहे, आणि हाच पुनर्जन्म आणि उत्क्रांतितत्त्व ह्यांच्यांतील विशेष आहे. स्थूलरूप दृष्टीस पडेल, अथवा तें नाहींसेंहि होईल, पण सूक्ष्म शरीर स्थूल शरीराचा नाश झाल्यावरहि अस्तित्वांत असतेंच, आणि तें अन्य कोणत्या तरी रूपानें फिरून प्रकट होतें.

पुनर्जन्मतत्त्वाचें पूर्ण ज्ञान झालें, ह्मणजे असें दिसून येईल कीं, तें उत्क्रांतितत्त्वाची न्यूनता भरून काढणारी पुरवणीच होय. आणि ह्या अत्यंत महत्त्वाच्या पुरवणीशिवाय उत्क्रांतितत्त्व कधींही पूर्ण होणार नाहीं. उत्क्रांतितत्त्व हें जीवनव्यवहाराचें विशदीकरण करतें; आणि पुनर्जन्मतत्त्व हें जीवनहेतूचें विशदीकरण करतें. अतएव प्रत्येक बाबतींत समाधानकारक स्पष्टीकरण होण्यास दोघांनाही एकाच मार्गानें गेलें पाहिजे.

जेम्स फ्रीमन क्लार्क यांचें असें ह्मणणें आहे कीं, "मानवी वर्गाला कनिष्ठ रूपांतून भ्रमण करीत करीत प्रस्तूतची उन्नतावस्था प्राप्त झाली आहे, असें आधुनिक शास्त्राचें सर्वमान्य मत आहे. ज्याला उत्क्रांतितत्त्व असें ह्मणतात तेंहि आपणांला असेंच सांगतें कीं, अत्यंत कनिष्ठ प्रकारच्या प्राण्याच्या ऐंद्रिय रचनेपासून क्रमशः वरची पायरी प्राप्त होत होत पुष्कळ कालावधीनें हल्लींची अवस्था आपणांला प्राप्त झाली आहे. डार्विनच्या उपपत्तींत केवळ शारीरिक उत्क्रांतीचा उहापोह केलेला असून, जीवात्म्याच्या उत्क्रांतीचा मुळीं देखील विचार केलेला नाहीं हें खरें आहे. पण मला वाटतें कीं, दोन्ही गोष्टींच्या विचारांचें जर संमेलन झालें तर 'सृष्टीची स्वाभाविक आवडनिवड (Natural Selection), आणि सर्वोत्तमांचें अति जीवन' (Surviral of the fittest = बुद्धिर्यस्य बलं तस्य या न्यायानें ज्यांचें शारीर सामर्थ्य सर्वांहून श्रेष्ठ त्यांचें टिकाव धरून जगणें) ह्या उपपत्तींचें यथासांग विशदीकरण होण्यास ज्या अनेक अडचणी अद्याप आहेत त्या दूर होतील. जर आपण उत्क्रांतिवादावर भरंवसा ठेवितों, तर नवीन नवीन उपजातींच्या विस्ताराचे बाबतींत प्रत्यक्ष जीवात्म्याचें साहाय्य घेणें जरूर आहे. एवंच भौतिक शास्त्र आणि तत्त्वविद्या यांचें साहचर्य होईल. आणि काव्यदेवताहि आपल्या वरदहस्ताचें साहाय्य देण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं." (Ten great religions पृष्ठ १९०). शारीरिक उत्क्रांति ही जीवात्म्याच्या उत्क्रांतीवरच अवलंबून असते. ह्या दोघांचा जेव्हां एकत्र विचार होतो, तेव्हांच विशदीकरण पूर्ण होतें.

उत्क्रांतितत्त्वाच्या पूर्णतेकरितां पुनर्जन्मतत्त्वाची तर्कशास्त्रदृष्ट्या अवश्यकता आहे. अनेक स्थूल रूपांच्या द्वारा जीवात्म्याची अखंड उत्क्रांति होते ही गोष्ट जर आपण कबूल केली, तर पुनर्जन्मतत्त्व निमुटपणेंच ग्राह्य केल्यासारखें होईल. नानाविध व्यक्त रूपें धारण करितांना जीवात्म्याचें व्यक्तित्व नष्ट होत नाहीं. अणूला एक प्रकारचा आपलेपणा अथवा व्यक्तित्व असतें, असें गृहीत धरण्यास जर हरकत नसेल, तर ज्याप्रमाणें खनिज, वनस्पति आणि प्राणिकोटींतून भ्रमण करूनहि अणूचें व्यक्तित्व नष्ट होत नाहीं, तद्वतच जीवात्मा उत्क्रांतीच्या नानाविध अवस्थांतून जरी भ्रमण करितो, तरी त्याचें व्यक्तित्व नेहमीं कायम असतें.

अतएव श्रीमद्भगवद्गीतेंत म्हटलें आहे कीं:--

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥

ह्मणजे, देह असणाऱ्या आत्म्याला ह्या प्रकृतदेहामध्येंच ज्याप्रमाणें कौमार्य, यौवन आणि जरा ह्या अवस्था अनुक्रमानें प्राप्त होतात, आणि प्रत्येक अवस्थेंत मिळविलेले संस्कार, उठलेले संकल्पविकल्प व आलेले अनुभव ह्या सर्वांचें गांठोडें दुसऱ्या अवस्थेंत जातांना आत्मा आपल्याबरोबर नेतो, आणि उचितसमयीं तो तें गांठोडें फिरून सोडतो, तद्वतच मनुष्याचा देहपात झाला असतां

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥

या भगवदुक्तीप्रमाणें जीवात्मा जीर्णदेह टाकून देऊन नवीन देह धारण करितो, आणि त्याबरोबरच ज्या ठिकाणीं पूर्वजन्मांतील सर्व अनुभवादि संस्कार संचित असतात असें जें सूक्ष्म शरीर तें घेऊन जातो. एवढें ज्ञान झालें ह्मणजे विवेकी पुरुष क्षणभंगुर देहाच्या नाशाची यत्किंचितहि भीति बाळगीत नाहीं. मृत्यु ह्मणजे केवळ देहांतर करणें

होय. हें ते जाणून असतात. आणि ह्मणूनच एकाद्याला आपल्या श्रेष्ठतर प्रकृतीच्या योगें नीचतर प्रकृतीला एकाच जन्मांत जर वश करून घेतां आलें नाहीं, तर पूर्वजन्मीं जेवढी उन्नति झाली असेल तेथूनच अन्य-जन्मीं फिरून प्रयत्न करण्याला सुरुवात करितो; पुनः प्रारंभापासून तो सुरुवात करणार नाहीं. एवंच आपणांला असें कळून येईल कीं, पुनर्जन्म-तत्त्व हें उत्क्रांतितत्त्वाचा तर्कशास्त्रदृष्ट्या परिणाम अथवा त्याची परं-पराच होय. पुनर्जन्मतत्त्वानेंच ती उपपत्ति पूर्ण होते व मनुष्याच्या नैतिक आणि आत्मिक प्रकृतीच्या कारणाचें यथासांग विशदीकरण होतें.

। ॐ तत्सत् ।

Requires a great many more illustrations.

' मृतोत्थापन ' आणि ' पुनर्जन्म '
ह्यांपैकीं शास्त्रसंमत कोणतें ?

नंबर १०.

मृतोत्थापनाची कल्पना प्रथम कोठें उदय पावली आणि पुढें इतर राष्ट्रांनीं तिचा अंगीकार कसा केला, हें समजणें ऐतिहासिक दृष्ट्या मोठें मनोरंजक आहे. मोझेस आणि इतर लेखकांचें जुन्या करारशास्त्रांतील लेखाचें जर आपण काळजीपूर्वक अवलोकन केलें तर आपल्या नजेरस असें येतें कीं, प्राचीन इझराल्टीस लोक हे ख्रिस्ती लोकांनीं मानिलले स्वर्ग अथवा नरक, मरणोत्तर प्राप्त होणारें बक्षिस (अनुग्रह) अथवा दंड (निग्रह) यांवर मुळींच विश्वास ठेवित नव्हते. मनुष्याच्या देहपातानंतर आत्म्याच्या अस्तित्वाविषयीं त्यांना एखादी पूर्वकल्पना होती किंवा नव्हती याचीच शंका आहे.मनुष्य मेला ह्मणजे पुढें कोणती स्थिति प्राप्त होते याची निश्चित कल्पनाच मुळीं त्यांना नव्हती. मनुष्य मेला ह्मणजे त्याचें शरीर अथवा आत्मा पुनः सजीव होतो असें ते मानीत नव्हते.जॉब हा मरणानें आपल्या मानसिक यातनांचा अंत होईल या विचारानें मृत्यूची मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात होता. त्यांच्या Psalms मध्यें काय सांगितलें आहे पहा. " हे परमेश्वरा तूं आपले अद्भुत चमत्कार मेलेल्या मनुष्यास दाखविशील काय आणि मेलेला मनुष्य पुनः उठून तुझें स्तवन तरी करील काय ? (Ps. LXXXVIII. 10.) हे परमेश्वरा मृत्यूच्या स्थितींत तुझी आठवण कशी होणार ? व थडग्यांत तुझे आभार कोणी मानावेत ? " (Ps. VI. 5) तसेंच (Ps. cxlvi.4.) या स्तोत्रांत मनुष्याच्या मुलाविषयीं आणि राजपुत्राविषयीं पुढीलप्रमाणें उद्गार आहेत. " त्यांचा प्राण मात्र पुढें निघून जातो, पण तो फिरून भूतलावर परत येतो; कारण ज्या दिवशीं विचारलहरी उदय पावतात, त्याच दिवशीं

त्या विलयास जातात." "प्रभूंचें स्तवन मेलेला मनुष्य अथवाथडग्यांत निवांत स्थलीं राहणाराहि करीत नाहीं." (Ps. Cxv. 17.)

सालोमन मोठ्या धाष्ट्यानें ह्मणत असे कीं, "सर्व वस्तु सर्वांना सारख्या प्राप्त होतात. सदाचारी असो अथवा दुराचारी असो, दोघांनाहि अंतीं फल एकच. * * * जसा सदाचारी, तसाच पापी, दोघांनाहि गति एकच. (Eccl. IX. 2.) आपल्याला इष्ट त्या मार्गाचा खुशाल अवलंब करावा, आपली भाकरी आनंदानें खावी, आणि प्रफुल्लित अंतःकरणानें मद्यपान करावें. * * * आपल्या कुटुंबासह आपली जीवनयात्रा आनंदानें कंठावी.. * * * कारण ज्या स्मशानभूमीकडे आपण जात आहों, तेथें कोणत्याहि प्रकारचें काम नाहीं, युक्त्या नाहींत, ज्ञान नाहीं, शहाणपण नाहीं, कांहीं नाहीं.' (Eccl. IX.7, 9, 10.) मेलेल्यांना कसलेंहि ज्ञान होत नाहीं, अथवा त्यांना एखादें बक्षीस मिळेल हीहि वार्ता काढावयाला नको.कारण त्यांची स्मृतिच नष्ट झालेली असते." तो आणखी ह्मणतो कीं, जें मानवपुत्राच्या नशिबीं तेंच पश्वादिकांच्या नशिबीं; दोघांनाहि अंत सारखाच, मरण हें जसें एकाला लागलेलें आहे, तसें तें दुसऱ्यालाहि आहेच; सर्वांना प्राण हा एकच आहे, आणि ह्मणून मनुष्य हा पशूहून श्रेष्ठ नाहीं." सर्वांना एकाच ठिकाणीं जावयाचें आहे; सर्व पृथ्वीतत्त्वापासून उत्पन्न झाले आहेत,आणि सर्वांना परत पृथ्वीतत्त्वालाच जाऊन मिळावयाचें आहे." "मनुष्यांचा आत्मा वर स्वर्गांत जातो आणि पशूंचा आत्मा खालीं पृथ्वीला जाऊन मिळतो, हें कोणीं पाहिलें आहे (Eccl III 19 2.) सारांश बॅबिलोनच्या मानेवर पारतंत्र्याचें जूं बसण्यापूर्वीं, इझरॉलिटिज हे अनुग्रह अथवा निग्रह, स्वर्ग अथवा नरक, आणि आत्म्याचें पुनरुत्थापन ह्या गोष्टी मुळीं खऱ्या मानीत नव्हते, हें ज्यावरून स्पष्ट दिसून येतें अशीं अवतरणें विपुल आहेत. कित्येक असें म्हणतात कीं, मृतांचे आत्मे एका खळगींत जाऊन पडत आणि तेथून ते फिरून केव्हांहि उठले नाहींत. असें इझरालटीज मानीत होते. पण ख्रिस्ती शकापूर्वीं ५३६ वे वर्षीं, जेव्हां पर्शिअन

लोकांनीं प्राचीन ज्यू लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें, तेव्हां त्यांचा अशा राष्ट्राशीं संसर्ग घडला कीं, जेथें लोकांचा असा ठाम ग्रह झालेला होता कीं, ईश्वर एक आहे. स्वर्ग आणि नरक आहेत. मृतांचें पुनरुत्थापन होतें, मरणोत्तर बक्षीस आणि दंड हीं प्राप्त होतात, आणि कृतकर्मांचा झाडा देण्याचा एक अखेरचा दिवस आहे. बॅबिलोन ज्या वेळीं पर्शियाचे हस्तगत झालें, त्या वेळेपासून ज्यू लोकांच्या पारतंत्र्याला आरंभ झाला. व तें पारतंत्र्य ख्रिस्ती शकापूर्वी ५३६ पासून ३३३ पर्यंत टिकलें. या अवधींत पर्शिअन धर्माचा ज्यू लोकांच्या मनांवर बराच परिणाम झाला होता. त्यांनीं आपली मूर्तिपूजा टाकून दिली, आणि हळुहळू त्यांच्या सामाजिक व्यवस्थेला उन्नत स्वरूप प्राप्त होऊन, त्यांच्यांत स्वतंत्र विचार बराच वाढला. त्याच सुमारास ज्यू लोकांत एक **फारिसी** लोकांचा व दुसरा **सदुसी** लोकांचा असे दोन पक्ष झाले होते. पार्शांच्या धार्मिक कल्पनांचा ज्यांनीं अंगीकार केला होता ते **फारिसीज** असें समजलें जात होतें. (**फारिशी हा शब्द** पारसी या शब्दाचें हिब्रू रूप होतें असें कित्येकांचें मत आहे.) आणि ज्यू लोकांचेच विचार (Ideas) आचार (Ceremonies) क्रियासंस्कार (Ritels) आणि धर्मपंथ हे ज्यांनीं कडकडीतपणें पाळिले त्यांना **सदुसी** असें म्हणण्यांत येत होतें. परस्परांच्या धार्मिक मतांत अत्यंत विरोध होता. **फारिसी** हे देवदूत आणि भूतें खरीं मानीत होते. मेलेला मनुष्य पुनः उठतो, अशी त्यांची समजूत होती; भविष्यत्कालीं प्राप्त होणारा अनुग्रह आणि निग्रह, आणि ईश्वरी पूर्व व्यवस्थेवर देखील ते भरंवसा ठेवीत होते. **सदुसी** लोकांनीं प्राचीन ज्यू धर्माच्या मर्यादेचें उल्लंघन केलें नव्हतें. ते धर्मपरायण राहून आहे हीच स्थिति बरी असें समाधान मानीत होते. ते नव्यांचा द्वेष करीत होते. देवदूत आणि भूतें, मृतोत्थापन, मरणोत्तर प्राप्त होणारें बक्षीस आणि दंड ही कल्पना, ह्या सर्व गोष्टी ते खोट्या मानीत होते. Matt xxii २३ यांत काय म्हटलें आहे पहा. " त्याच दिवशीं सदुसी लोक त्यांचेकडे आले. मृतांचें पुनरुत्थापन

होत नाहीं, असें ते ह्मणत. " सदुसी लोकसंख्या फारिसी लोकसंख्येहून पुष्कळ कमी होती. फारिसी लोक हे हळू हळू बरेच सत्ताधीश बनले, आणि जीजसच्या मरणानंतर मृतोत्थापन, मृत्यूनंतर प्राप्त होणारें बक्षीस आणि दंड, देवदूत व भूतें, ह्याविषयींचीं त्यांचीं मतें हींच ह्या नूतन ख्रिस्तीपंथांचीं प्रधान तत्त्वें होऊन बसलीं.

सारांश, आपल्याला एवढें कळून येईल कीं, मृतोत्थापनाची कल्पना प्रथमतः पर्शियांत उदय पावली, आणि नंतर तिला नव्या करारशास्त्रांत अग्रस्थान प्राप्त झालें व तेव्हांपासून पाश्चात्य देशांतील बहुतेक ख्रिस्तभक्तानुयायी तिचा अंगीकार करीत आले आहेत. झोरोआस्ट्रिअन्स असें मानीत होते कीं, मृत मनुष्याचा आत्मा तीन रात्रींपर्यंत त्याचे शरीराभोंवतीं घिरट्या घालीत असून चवथ्या दिवशीं अरुणोदय झाल्यानंतर परलोकीं गमन करितो. नंतर सदाचारी असेल त्याला स्वर्ग, आणि दुराचारी असेल त्याला नरककुंड प्राप्त होतें. त्या नरककुंडांत दुराचारी मनुष्याला जगाचा उद्धार होईतोंपावेतों, ह्मणजे पापपुण्याची झडती देण्याचा अखेरचा दिवस (Judgment day) येईपर्यंत राहतो. जगदुद्धारानंतर जेव्हां अहिमन अथवा सैतान मारिला जातो, तेव्हां दुष्ट लोकांचे आत्मे पावन होऊन त्यांना नित्य उत्कर्ष प्राप्त होतो. * त्यांचें पुनरुत्थापन कसें होईल, असा एक प्रश्न विचारण्यांत आला होता. त्यावर अहुरमजदा ह्यानें असें उत्तर दिलें कीं, पुनरुत्थापनाची तयारी आणि उत्पत्ति ह्या गोष्टी ह्मणजे लोकोत्तर कृती अथवा अशक्य गोष्टी (Miracle) घडवून आणण्याचें सामर्थ्य अथवा प्रौढी दाखविण्याचें साधन होय. दीर्घ प्रयत्नी विधात्याचीं रहस्यें आणि कर्में हीं अत्यंत गहन असतात. +

झोरोस्ट्रिअनस् पुनरुत्थापनावर विश्वास ठेवीत होते. पण शरीराचें पुनरुत्थापन होत नसून आत्म्याचें पुनरुत्थापन होतें असें ते मानी-

---

*" Saered Books of the East " Vol Xvii P. P. 27. 34.46.

+ ——Do——Do——Do——P. 80.

त होते. व पुनरुत्थापन ह्मणजे एक अद्भुत क्रिया होय असें ते ह्मणत. तसेंच येशुख्रिस्ताचें पुनरुत्थापन हेंहि अद्भुत होतें. पुनरुत्थापन होतें तें शरीराचें अथवा आत्म्याचें होतें ? कोणत्या प्रकारच्या पुनरुत्थापनावर आपला विश्वास होता, हें येशुख्रिस्तानें केंव्हांहि स्पष्ट सांगितलें नाहीं. तथापि गॉस्पेल्सच्या लेखकांच्या निरूपणावरून येवढी गोष्ट स्पष्ट कळून येते कीं, येशुख्रिस्ताच्या शरीराचें पुनरुत्थापन होऊन त्याचें भौतिक रूपच पुनः दृष्टीस पडलें, अशी त्याच्या शिष्यमंडळाची समजूत झाली. झोरोॲस्ट्रियन लोकांच्या मताप्रमाणें, यांचेंहि पुनरुत्थापन तीन दिवसांनंतरच होतें. येशूख्रिस्ताचें अद्भुत आणि आश्चर्ययुक्त दर्शन त्याच्या शिष्यगणाला घडलें, ही गोष्ट प्रेषितपॉल ह्यानें मोठ्या उत्साहानें प्रकाशित केली होती. त्यानें कोरिनथियन्सना केलेल्या आपल्या उपदेशांत मोठ्या आवेशानें असें प्रतिपादन केलें आहे कीं, अखिल ख्रिस्ती धर्माला येशूच्या अद्भुत पुनरुत्थापनाचा आणि दर्शनाचाच आश्रय आहे. देहपात होऊन फिरून उठणाऱ्या मनुष्याचें सूक्ष्म शरीर (Spiritual body) हें त्याच्या मांसरुधिरयुक्त जड शरीराहून भिन्न असतें, असें जरी प्रेषित पॉल ह्यानें म्हटलें आहे, (I Cor. XV.) तथापि ह्या महत्त्वाच्या विषयाची सामान्यतः उपेक्षाच झाली आहे, आणि अनेक ख्रिस्ती धर्मपंथांपैकीं कांहींच्या ठिकाणीं जी श्रद्धा आज आपल्या नजरेस पडत आहे, ती त्या उपेक्षेचाच परिणाम होय. ती श्रद्धा ह्मणजे अशी कीं, देवदूतांचें निमंत्रण झाल्यावर मृताचें शरीर थडग्यांतून उठेल, आणि सर्वशक्तिमान प्रभूच्या सामर्थ्यानें त्याचीं धुळीस मिळालेलीं हाडें आणि मांस हीं पुनः एकत्र होतील. पॉल आणखी असें म्हणतो कीं, “ आतां येशुख्रिस्त हा मेलेल्या मनुष्यांतून पुनः सजीव झाला आहे, आणि मेलेल्यांतून पुनः उठलेला असा हाच पहिला आहे. (I cor. xv, 20) त्यानें लोकांना असा उपदेश केला आहे कीं, मेलेला मनुष्यांतून पुनः सजीव झालेला असा ख्रिस्त हाच पहिला आहे, आणि जे

त्याच्यावर श्रद्धा ठेवतील तेहि त्याच्याप्रमाणें मरणानंतर फिरून उठतील, आणि जे अश्रद्धेनें चालतील ते मात्र उठणार नाहींत.

पार्शी लोक अद्भुत मृतोत्थापनावर भरंवसा ठेवित होते, ही गोष्ट वर कळून चुकलीच आहे. तीच अद्‌भुत क्रिया जीजसचे बाबतींत अधिक निश्चित झाली. आणि पुढें ख्रिस्ती लोकांतील श्रद्धेची इमारत ह्याच अद्भुत गोष्टीच्या पायावर रचली गेली. पार्शी आणि ख्रिस्तानुयायी हे उभयतांहि मृतोत्थापन म्हणजे सार्वत्रिक नियम आहे असें मानीत नव्हते, तर केवळ कांहीं अलौकिक सामर्थ्याच्या योगें घडून आलेली एक अशक्य गोष्ट (Miracle) होय असें मानीत. अशा प्रकारच्या अद्भुत गोष्टीला शास्त्रीय आधार त्यांनीं मुळींच दिला नाहीं. पण आधुनिक शास्त्राला मात्र अद्भुत गोष्टी संमत नाहींत. तें असें सांगत आहेत कीं, हें विश्वचक्र प्राचीन तत्त्ववेत्ते मानीत होते त्याप्रमाणें अशक्य गोष्टींनें चाललें नसून, तें सदैव सुसंगत आणि सार्वत्रिक अशा निश्चित नियमांनींच भ्रमण करीत आहे. जे नियम कोठेंहि गेलें तरी एकच आढळतात अशा नियमांना अपवाद ह्मणून असूं शकत नाहीं. जर मृतोत्थापन हाहि त्या नियमांपैकींच एक असेल, तर तो जीजसच्या जन्मापूर्वींहि अस्तित्वांत असला पाहिजे. आणि असें जर आहे तर पॉलनें म्हटल्याप्रमाणें जीजसचें मृतोत्थापन पहिल्यानें झालें असें कसें म्हणतां येईल? बरें उलट रीतीनें जरी विचार केला, तरी मेलेल्यांतून उठलेला असा जीजस हा जर आद्यपुरुष होता, तर मृतोत्थापनाला सार्वत्रिक असें विशेषण लावतांच यावयाचें नाहीं. ज्याला सार्वत्रिक नियमांचा आधार नाहीं अशा कोणत्याहि गोष्टीवर शास्त्रज्ञ भरंवसा ठेवणार नाहींत. स्याद्वादी आणि भौतिक अथवा अनात्मवादी जे आहेत त्यांच्यापैकीं कांहींची मजल तर एथपर्यंत गेली आहे कीं, ते म्हणतात जीजस हा क्रॉसवर मेलाच नाहीं; तर अरिमाथियाच्या जोसेफनें जेव्हां त्याला क्रूसावरून खालीं काढिलें, तेव्हां त्याचे चैतन्याचा निरोध झाला होता असें आढळून आलें. जेव्हां जोसेफ

ह्यानें पायलेटकडे जाऊन जीजसला शरीर द्या अशी त्याची प्रार्थना केली, तेव्हां तो मेला आहे किंवा नाहीं याविषयीं त्याला फार संशय वाटला. (Mark XV. 44) कारण त्याला क्रूसावर चढवून कायते सहा तासच झाले होते. अर्वाचीन प्राणिगुणधर्मशास्त्रज्ञांपैकीं कांहींचें असें मत आहे कीं, नियत प्रकृतीचीं व सशक्त मनुष्यें क्रूसावर चढविलीं असतां तेथें तीं बरेच दिवसपर्यंत जिवंत राहू शकतात. हीं नास्तिक अज्ञेयवादी आणि संशयी स्याद्वादी मंडळी असें ह्मणतात कीं जीजसचें शरीर त्या निवांत दगडी गर्तेत कांहीं तासांनंतर फिरून सजीव झालें आणि तो गर्तेतून बाहेर पडून गॅलीलीला जाऊन आपल्या शिष्य मंडळीला दर्शन दिलें.* खरी गोष्ट कांहींही असो, (कारण खरोखर गोष्ट कशी घडली, हें आतां कोणालाहि अगदीं नक्की सांगतां येणें अशक्य आहे.) एवढें मात्र उघड आहे कीं, एखाद्या गोष्टीला अमुक अमुक आधार आहे एवढ्यावरूनच ती गृहीत धरण्यास शास्त्रज्ञ तयार नाहींत. अमुक अमुक पुस्तकांत एखाद्या गोष्टीचा उल्लेख केला आहे, एवढ्याच कारणावरून ती खरी आहे असें ते मुळींच मानीत नाहींत, सृष्टींतील प्रत्येक दृश्य चमत्काराला (प्रत्ययजनक) अत्यंत समाधानकारक पुरावा आणि त्याचें न्याय्य विशदीकरण त्यांना हवें आहे. अद्भुत गोष्टींना कोणते सार्वत्रिक नियम लागू आहेत हें पाहण्याकरितां त्यांचा अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें विचार करणें त्यांना जरूर वाटतें. अशा प्रकारचे कोणतेहि नियम येथें लागू पडत नाहींत, हें जर त्यांना दिसून आलें तर जी गोष्ट अद्भुत अथवा अलौकिक सामर्थ्यघटित अशी मानिली आहे तिचा ते खात्रीनें प्रतिकार करतील.

मृतांच्या अद्भुत पुनरुत्थापनाच्या उपपत्तीशीं, जीवात्म्याला जन्मास येण्यापूर्वीं अस्तित्व नसतें, ह्या समजुतीचाहि अगदीं निकटसंबंध

*Vide " Science and chriation tradltion " By Profe Huxley pp 279-280

आहे. ह्या उपपत्तीचें स्पष्टीकरण करणाऱ्यांचें असें मत आहे कीं, जीवात्मा जन्मास येण्याचे वेळीं, शून्यापासून निर्माण झाला असल्यामुळें नव्यानेंच अस्तित्वांत येतो. पण शास्त्र आपणांस असें सांगत आहे कीं एकाद्या वस्तूची शून्यापासून आकस्मिक आणि उत्पत्ति समूळ नाश ह्या दोन्ही गोष्टी असंभवनीय आहेत. द्रव्य आणि शक्ति हीं अविनाशी आहेत; शास्त्रानें आपणांस उत्क्रांतीचा उलगडा करून दाखविला आहे, उत्पत्ति कशी होते हें तें सांगत नाहीं. तसेंच सृष्टचमत्कारांच्या फेरबदलांच्या मुळाशीं एकाद्या दैवी प्राण्याचें साहाय्य आहे ही गोष्ट शास्त्राला संमत नाहीं. मृतोत्थापनाच्या कल्पनेला अर्वाचीन शास्त्राचे हे वरील सर्व अन्तिम सिद्धान्त अगदीं अनभिज्ञ आहेत, अर्थात् तीं त्या सर्वांचा अगदीं निषेध करितें. उलटपक्षीं पुनर्जन्माचे तत्त्वाला अर्वाचीन शास्त्रानें शोधून काढिलेलीं सृष्टींतील सर्व सत्यें आणि नियम हीं मान्य आहेत व तें सृष्टिनियमापासून युक्तीला आणि तर्कशास्त्राला संमत असे सिद्धान्त काढून दाखवित आहे. पुनर्जन्मतत्त्वाचा पाया उत्क्रांतितत्त्वावर रचिलेला आहे, जीवात्म्याचें जें प्राणबीज असतें, त्याची एकसारखी उत्क्रांति होत असते, व ज्या शक्ति बीजरूपानें अस्तित्वांत असून अदृश्य असतात, त्यांचें प्रकटीकरण क्रमशः होतें, असा पुनर्जन्मकल्पनेचा तथ्यांश आहे. शिवाय पुनर्जन्मतत्त्वाची इमारत कार्यकारणनियमाच्या पायावर उभारलेली आहे. तें आपणांस असें सांगतें कीं, कारण हें कार्याचे बाहेर नसून कार्यांतच अंतर्लीन असतें. कारण हें कार्याची बीजरूपावस्था अथवा अव्यक्त स्थिति आहे व कार्य हें कारणाचें प्रकटरूप आहे. ह्या विश्वतत्त्वसागरांत अमर्याद शक्तीचा एक प्रवाह अव्याहतपणें वाहत असून तोच लहरींच्या अगणित रूपांनीं भासमान होत असतो. लाटांचा एक समूह हाच दुसऱ्या समूहाला कारण असतो, असें आपण म्हणतों. पण वस्तुतः जें कारण असतें, तीच भावी कार्याची बीजरूपावस्था, आणि पूर्वीं बीजरूपानें अस्तित्वांत असणाऱ्या कारणाची प्रकट रूपावस्था असते. मुळाशीं आधारभूत असणारा प्रवाह सर्वत्र एक आणि सारखाच आहे. जीवात्मा हा

एकाएकींच अस्तित्वांत आला आहे, अथवा तो जन्मास आला त्या वेळीं प्रथमतःच निर्माण झाला, ही कल्पना पुनर्जन्मतत्त्वाला मान्य नाहीं. पुनर्जन्मतत्त्वाचें असें मत आहे कीं, जीवात्म्याचें अस्तित्व अनादिगत कालापासून कायम असून अनंत कालपर्यंत तें कायम राहणार. जीवात्म्याला कृतकर्मानुसार सुखदुःखादि भोग प्राप्त होत असतात. सर्व प्रकारचीं सुखदुःखें हीं केवळ आपल्या कर्मांच्या प्रतिक्रिया होत. आपल्या हातून घडणारीं कर्में हीं कारणें असून प्रतिक्रिया ह्या त्या कारणांचे परिणाम होत. आपला प्रकृतजन्म हा आपल्या पूर्वजन्मांत केलेल्या कर्मांचें फल आहे. आणि ह्या जन्मीं घडणाऱ्या कर्मांचें फल पुढचा जन्म होईल. प्रस्तुत आपण जीं जीं कर्में करीत आहोंत, त्यांचा नाश कधींही होणार नाहीं. एका आयुष्यांतील विचारशक्ति मृत्यूनंतर एकदम नष्ट होतील असें तुम्हांला वाटतें काय ? छे मुळींच नाहीं. त्या शक्ति प्राणबीजामध्यें अदृश्यरूपानें सुरक्षित कायम राहतील, आणि योग्य परिस्थिति प्राप्त होतांच पुनः प्रकट होतील. प्रत्येक जीवात्मा हा विचारशक्तीचा केवळ केंद्र आहे, या पलीकडे दुसरें कांहीं नाहीं. ह्या केंद्रालाच संस्कृतांत जीवात्म्याचें सूक्ष्म शरीर असें म्हटलें आहे. सूक्ष्म प्राणबीज अथवा अन्य शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे विचारशक्तींचें अदृश्य केंद्रस्थान हें ज्या अदृश्य शक्ति विकासित होण्यास अगदीं तयार असतात, त्यांच्या प्रकटीकरणार्थ भौतिक अथवा जडदेहरूपी साधन तयार करितें. व प्राणबीजाच्या अदृश्य रूपामध्यें ज्या शक्ति संपुटित असतात, त्या सर्व पूर्णपणें व्यक्तदशेस येईपर्यंत ही पद्धत अशीच चालू राहते. ज्या अर्थी पुनर्जन्मतत्त्वाचें सर्व भौतिक नियमांशीं ऐक्य आहे, त्या अर्थी त्याला भौतिक आणि नैतिक शास्त्रांच्या नियमांचाहि आधार आहे, असें म्हणतां येईल. ज्याप्रमाणें बाह्य सृष्टींतील (Objective Plane) दृश्य विश्व चमत्कारांना क्रिया प्रतिक्रियेचें नियम लागू आहेत, तद्वतच ज्ञानवत्तेच्या अंतरसृष्टींत (Subjective Plane) जर मानसिक कर्म अथवा विचार चांगला असेल तर त्याची प्रतिक्रियाहि चांगली घडेल आणि मानसिक कर्मच

जर पापमूलक असेल तर प्रतिक्रियाहि वाईटच निपजेल. कारण प्रत्येक क्रिया आपल्यासारखीच प्रतिक्रिया निर्माण करीत असते. जेणेंकरून आपणांला सुख प्राप्त होतें, आल्हादजनक मनोविकार उचंबळतात, आणि चित्तशांति होते, ती चांगली प्रतिक्रिया होय. आणि हाल, दुःखजनक मनोविकार, दुःखापन्नस्थिति हीं वाईट प्रतिक्रियेचीं फलें होत. एवंच पुनर्जन्मच आपणांकरवीं कर्में वडवून आणतो, आणि कर्मपरिपाकाहि तोच आपणांला भोगावयाला लावितो. वस्तुतः आपल्या वासना, प्रवृत्ति आणि कर्में यांना अनुरूप असेंच वळण आपण आपल्या प्रकृतीला देत असतों.

सामान्यतः प्रचलित असलेल्या पुनरुत्थापनाच्या कल्पनेवरून एक मनुष्य पापप्रकृतीचा आणि दुसरा सदाचारी असा कां निपजावा याचें विशदीकरण होत नाहीं. पुनरुत्थापनाची कल्पना खरी आहे असें मानिलें तर ल्यूथरच्या ह्मणण्याप्रमाणेंच " मनुष्य हा भारवाहक पशु असून त्याचा स्वार त्याला ज्या दिशेनें नेईल त्याच दिशेनें तो चालतो. कधीं कधीं त्याचा चालक परमेश्वर असतो तर कधीं कधीं सैतान हा असतो, " असें म्हणण्यांत आपणांस समाधान मानावें लागेल. पण परमेश्वरानें आपल्या स्वयंनिर्मित प्राण्यावर सैतानाला आपलें वर्चस्व कां गाजवावयास लावावें हें मात्र कोणाला सांगतां येत नाहीं. जीं पापें मनुष्याला सैतान हा जबरीनें करावयास लावितो, त्यांचीं फलें मनुष्यानें नित्य भोगिलींच पाहिजेत. शिवाय ह्या पुनरुत्थापनाच्या कल्पनेनें " प्रारब्धवाद " आणि जीवात्म्याला एक तर स्वर्गप्राप्ति अथवा नरकप्राप्ति होणार हें पूर्वींच ठरलेलें असतें असें गृहीत मानिलें आहे. एक पापात्मक आणि दुसरा पापरहित असा जन्मास कां येतो याचें विशदीकरण करण्याकरितां सेंट आगस्टाइन ह्यानें प्रारब्धवाद (Doctrine of Predistination.) आणि ईश्वरी अनुग्रह (Grace) ह्या दोन कल्पना प्रथमतः प्रचालित केल्या. ह्या कल्पनेप्रमाणें जर पाहिलें, तर दयाघन परमेश्वर एकाद्यावर त्याचे जन्माचे वेळीं अनग्रह करितो आणि नंतर तो हा भवसागर तरून जा-

ण्यास योग्य होऊन जन्मास येतो. पण मानवजातीचा बराच समुदाय पापात्मक निपजत असून नरककुंड त्याच्या नशीबाला लागलें आहे. परमेश्वराचा अनुग्रह प्राप्त होणें, आणि हा भवसागर तरून जाणें हें फारच थोड्यांच्या नशिबीं असतें. शिवाय पुनरुत्थापनतत्त्व आपणांला असें सांगतें कीं, परमेश्वर मनुष्यवर्गाची उत्पत्ति शून्यापासून करितो, व त्यानें कांहीं विवक्षित कृत्यें करूं नये असा नियम घालून देतो. पण त्याबरोबर आपल्या अनुज्ञा पाळण्याचें सामर्थ्य मात्र परमेश्वर त्याला देत नाहीं. शेवटीं त्याच्या दौर्बल्यामुळें परमेश्वर त्याला नित्य यातना भोगावयास लावितो. शरीर आणि आत्मा हीं वेगळीं होणें शक्य नाहींत. कारण आत्मा हा शरीरापासून वेगळा झाला तर त्यानें ज्या यातना भोगाव्या ह्मणून ईश्वरी संकेत असतो, त्या यातनांतून तो सुटेल; ज्या यातना त्यानें भोगिल्याच पाहिजेत असा ईश्वरी संकेत असतो, त्यांपासून त्याची सुटका कशी होईल. येणेंप्रमाणें सेंट आगस्टाइनच्या प्रारब्धवादयोग आणि ईश्वरी कृपेविषयींच्या कल्पनेनें आपल्या शंकेचें समाधान होणें तर दूरच, पण उलटें ज्यांचा ज्यांचा त्या कल्पनेवर विश्वास असेल, त्या सर्वांना ईश्वर भयंकर व जुलमी आहे असें वाटून त्याची भीतिच वाटली पाहिजे. पण पुनर्जन्मतत्त्वाची गोष्ट अशी नाहीं. तें आह्मांस असें शिकवितें कीं, जीवात्म्याला पूर्ण स्थिति प्राप्त होईपर्यंत त्यांची कनिष्ठतर स्थितीपासून उच्चतर स्थितीप्रत क्रमशः उन्नति होत असते, आणखी असें कीं, प्रत्येक जीवात्मा **जीजस** अथवा **बुद्ध** अथवा **द्यौष्पितर** ह्याप्रमाणें पूर्णतेला पोंहोचेल, आणि ह्या जन्मीं ह्मणा अगर अन्य कोणत्या तरी जन्मीं आपलें दिव्य तेज प्रकट करीलच. आपल्या अंगच्या सामर्थ्यांचा पूर्ण विकास होण्यास एका जन्माचा अवधी ‘ आयुःकल्लोललोलं ’ या न्यायानें पाहतां फारच थोडा आहे. एकाद्या खुळ्याला महापंडित अथवा तत्ववेत्ता बनविण्याचा प्रयत्न करण्याचें जर तुह्मीं मनांत आणलें तर त्याच्या साऱ्या जन्मांत तरी तुमचा प्रयत्न फलद्रूप होईल काय ? मुळींच नाहीं. आणि तो तुमच्या इच्छेप्रमाणें तयार झाला नाहीं म्हणून

तुह्मी त्याला शासन कराल काय ? किंचिदपि सारासारविचारशक्ति अथवा तारतम्यज्ञान ज्या मनुष्याचे अंगीं आहे त्याचे हातून एवढा अविचार होणें शक्य आहे काय ? तद्वतच एखाद्याला एकाच आयुष्यांत पूर्ण स्थितीला जातां आलें नाहीं, म्हणून परमेश्वरानें जर त्याला शासन केलें तर तुह्मांला काय बरें वाटेल. सदसद् गोष्टीची निवड करण्याची स्वतंत्र इच्छा परमेश्वरानें आम्हांस दिली असून, आमच्या निवडणुकीबद्दल आम्हीच जबाबदार आहोंत ह्या म्हणण्यांत कांहींहि अर्थ नाहीं, तें अगदीं पोंचट प्रमेय आहे. वाईट गोष्टीची निवड जर आम्हीं केली तर त्याबद्दल आम्हांला शासन झालेंच पाहिजे. असलें प्रमेय जे लोकापुढें आणतात, त्यांच्या हें ध्यानांत येत नाहीं कीं, परमेश्वरानें एकसमयावच्छेदेंकरूनच आपल्या प्राण्यांना भ्रष्ट करण्याकरितां आपल्या सामर्थ्यवान सैतानालाहि अनियंत्रित सोडिलें आहे.

असो. एथें एका जुन्या गोष्टीची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. ती अशी कीं, एकदां एका ठिकाणीं एका जुलमी राजानें आपल्या एका कैद्याला सोडून दिलें, आणि त्याला ह्मणाला 'अरे दुष्टा ! मी तुला कैदेंतून मुक्त करितों. तुला वाटेल तेथें तूं जा. पण एक अट अशी आहे कीं, जर तूं एखाद्या रानटी क्रूर पशूच्या तावडींत सांपडलास, तर तुला पुनः अंधारकोठडींत कोंडून ठेवण्यांत येईल. आणि त्या हालांतून तुझी पुनः सुटका होणार नाहीं.' असें सांगून त्याला मोकळें तर सोडलें. पण त्याचवेळीं इकडे एका बुभुक्षित लांडग्याला त्या मनुष्यावर तुटून पडण्याकरितां मोकळा सोडून देण्याचा आपल्या नोकरांना हुकूम केला. त्या बिचाऱ्या कैद्याची काय वाट झाली असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. हिला दया कोण ह्मणेल.

पुनर्जन्मतत्त्वाचें असें मत आहे कीं, प्रत्येक जीवात्मा बीजरूपानें पूर्णच असतो. तो आपल्या आंगचीं सामर्थ्यें क्रमशः विकसित करून उपक्रांति पद्धतिद्वारा त्यांना तो प्रकट करीत असतो. त्या पद्धतीच्या प्रत्येक पायरीशीं त्याला नाना प्रकारचे अनुभव मिळत असतात. हे अनुभव कांहीं कालपर्यंतच टिकतात. आणि ह्मणून आमच्या स-

त्कृत्यांबद्दल अथवा दुष्कृत्यांबद्दल परमेश्वरहि जबावदार नाहीं, अथवा सैतानाहि जबाबदार नाहीं. सत्कर्में आणि दुष्कर्में हीं सागरावरील लहरींच्या व्यसनोदया (भरती आणि ओहटी) प्रमाणें आहेत. कोणतीहि लाट सागरांत अन्यत्र कोठें तरी रिक्तता केल्याशिवाय उचंबळत नाहीं. ह्याचप्रमाणें ह्या अनंत तत्त्वसागरावर असंख्यात लाटा अखंड उचंबळत असतात. प्रत्येक लाटेच्या उदयाला सद् अशी संज्ञा दिली आहे आणि तिच्याच पलीकडे असणाऱ्या व्यसनाला असद् असें ह्मटलें आहे. प्रत्येक जीवात्म्याचा ओघ अन्तिम इष्ट स्थानाप्रत जाणाऱ्या दिशेनेंच अखंड वाहत आहे. हें अन्तिम इष्टस्थान ह्मणजे पूर्णानंदस्थिति. त्या इष्ट स्थानाप्रत जाऊन पोंहचण्यास किती कालावधि लागेल हें कोणाला सांगतां येईल ? एखाद्याला ह्याच जन्मांत पूर्णस्थितीला जर जातां येईल, तर त्याला जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत पुनः पडण्याचें कांहींच कारण उरणार नाहीं. पण ह्या जन्मीं जर पूर्णता प्राप्त झाली नाहीं, तर देहांतर करून आपली प्रगती त्याला तशीच चालू ठेवावी लागेल. पुष्कळांची अशी समजूत आहे कीं, मनुष्य हा पुढल्या जन्मीं आपल्या प्रगतीला पुनः पहिल्यापासूनच सुरवात करितो. पण पुनर्जन्मतत्त्वाला हें ह्मणणें संमत नसून तें आपणांस असें सांगतें कीं, ह्या जन्मीं प्रगतीची मजल जेथपर्यंत गेली असेल, तेथूनच पुढें अन्य जन्मीं जीवात्मा आपल्या प्रगतीला सुरवात करितो. व अशा रीतीनें तो आपल्या प्रगतीचा ओघ अव्याहत चालू ठेवतो. मृत्यूनंतर आम्ही फिरून पशुजन्माला जातों. असें पुनर्जन्मतत्त्व आम्हांला सांगत नाहीं, तर आम्हांला देहांतर जें प्राप्त होतें, तें आमच्या वासना, संस्कार आणि सामर्थ्यें यांना अनुरूप असेंच होतें. जर एखाद्याला ह्या जगतांत अथवा दुसऱ्या एखाद्या जगतांत फिरून जन्मास येण्याची वासना नसेल, एकाद्या विशिष्ट भोग्य वस्तूचा उपभोग घेण्याची लालसा उरली नसेल, व त्याच्या अहंकाराचा समूळ उच्छेद जर झाला असेल, तर त्याला पुनर्जन्म घ्यावा लागणार नाहीं. पुनर्जन्माची कल्पना तर्कशास्त्रसंमत आणि समाधानकारक अशी आहे. पण मृतोत्थाप-

नाच्या कल्पनेला शास्त्रीय सत्यांचाहि आधार नाहीं, अथवा त्याच्यायोगें जन्ममृत्यूच्या कारणाचें तर्कशास्त्रदृष्ट्या विशदीकरणाहि होत नाहीं. पुनर्जन्मतत्त्वानें जीविताच्या सर्व कोड्यांचा उलगडा होतो, आणि मनुष्याच्या मनांत उद्भवणारे सर्व प्रकारचे प्रश्न आणि शंका ह्यांचें शास्त्रीय रीतीनें समाधान होतें.

" संपत्तीच्या आणि कीर्तीच्या आभासांनीं मोहित झालेल्या विवेकशून्य अज्ञ पुरुषाला पुनर्जन्मतत्त्वाचें ज्ञान सहजरीत्या कसें होणार ? मृत्यूबरोबर प्रत्येक गोष्टीचा अंत होतो, ही त्याची कल्पना आणि ह्यामुळेंच तो ' पुनरपि जननं, पुनरपि मरणं ' ह्याच्या चक्रांत वारंवार गटांगळ्या खात राहतो. "

। ॐ तत्सत् ।

Incomplete

उपसंहार.

वेदांत ह्मणजे काय?

पुष्कळ लोकांची अशी भ्रांतिमूलक समजूत आहे कीं, वेदांत-मीमांसा ह्मणजे आर्यांचे पवित्र धर्मग्रंथ जे वेद त्यांचीच केवळ मीमांसा होय; पण प्रस्तुत स्थलीं 'वेद' संज्ञा ही एखाद्या ग्रंथाचा नामनिर्देश करण्यासाठीं योजिलेली नाहीं. येथें 'वेद' शब्दाचा अर्थ 'ज्ञान' आणि 'अन्त' ह्मणजे 'शेवट' असा आहे. अतएव 'वेदांत' याचा शब्दशः अर्थ 'ज्ञानाचा अंत अथवा परिसमाप्ति' असा ध्वनित होतो. हा अंत कोणता, त्याची प्राप्ति कशी होते, यांचें ज्या शास्त्रांत विशदीकरण केलें आहे त्याला वेदांतमीमांसा अथवा शास्त्र असें ह्मणतात. विश्वाचें अन्तिम सत्याशीं जीवात्म्याचें तादात्म्य होणें व त्याची प्रतीति येणें ह्या गोष्टींतच यच्च यावत् सापेक्ष ज्ञानाची परिसमाप्ति होते. हें अन्तिम सत्य ह्मणजे वैश्विक सूत्रात्मा होय. हा सूत्रात्मा अथवा विश्वाचे अन्तिम सत्य ज्ञानाचा अमर्याद समुद्र आहे.

'यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति'

या न्यायानें सापेक्ष ज्ञानरूपी नद्यांचा ओघ, चमत्कारपरिपूर्ण विश्वांतील नानाविध अवस्थांमधून वाहत वाहत शेवटीं 'सच्चिदानंदप्रेमस्वरूपी' अमर्याद महासागराला जाऊन मिळतो.

ह्या एकरूपतेची प्रतीति आणून देणें हा यच्च यावत् खऱ्या धर्माचा हेतु असला पाहिजे. पण जगाच्या धर्मसंबंधीं इतिहासाचें अवलोकन केलें असतां असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं, भरतभूमींतील प्राचीन आर्यांच्या महर्षींना ज्याप्रमाणें ह्या तत्वाची पूर्णपणें ओळख झाली होती, व त्यांनीं जसा ह्या तत्वांचा लोकांना मोठ्या जोरानें उपदेश केला होता, तसा

प्रकार आजवर इतर कोणत्याहि राष्ट्रांत केव्हांहि घडून आलेला नाहीं. ‘सत्य हें एक असून तें प्राप्त करून घेण्याचे मार्ग मात्र अनेक आहेत.’ ही उदात्त कल्पना आज जवळ जवळ पांच हजार वर्षें होत आलीं आमच्या या आर्यमातेनें आपल्या हृदयाशीं अगदीं घट्ट धरून ठेविली आहे. आज उपलब्ध असलेल्या सर्व धर्मग्रंथामध्यें अत्यंत प्राचीन असा जो ‘ऋग्वेद’ त्यांत पुढील वचन आहे.

‘ एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ।’

सत् हें एक असून लोकांनीं मात्र त्याला अनेक नांवें दिलीं आहेत. ज्यू धर्माचे लोक ह्याला ‘ज्युव्होवा’ असें ह्मणतात. ख्रिस्ती धर्मांत ह्याला ‘द्यौष्पितर’ असें ह्मटलें आहे. मुसलमान लोक ‘अल्ला’ ह्या भावानें, आणि बौद्धधर्मी लोक ‘बुद्ध’ असें मानून त्याला भजतात. जैन पंथांतील लोकांचें ‘जिन’ हेंच सत् असून हिंदु लोक त्याला ‘ब्रह्म’ असें ह्मणतात.

Father in heaven

वेदांतशास्त्राची सर्व इमारत ह्या वरील मूलसत्याच्या पायावरच रचलेली आहे, आणि आनुषंगिक धर्मांतील विचारवंत लोकहि हें सत्य कबूल करूं लागले आहेत. कारण ब्रह्माला अनेक नांवें असून तें ‘एकमेवाद्वितीयं’ असें आहे. ह्या तत्वाचें प्रतिपादन जगांतील इतर कोणत्याही धर्मापेक्षां अथवा तत्वविद्येपेक्षां वेदान्तशास्त्रानेंच अधिक जोरानें केलें आहे. आणि शिवाय द्वैत, विशिष्टाद्वैत आणि अद्वैत ह्या धर्मपंथांच्या ज्या नानाविध शाखा आहेत, त्या सर्वांना वेदान्तशास्त्रांत जसा भक्कम आधार सांपडतो, तसा इतर कोणत्याहि शास्त्रांत सांपडत नाहीं. वेदान्तानें खरोखर वैश्विक धर्म स्थापन केला आहे असें ह्मणतां येईल. वेदान्तांत जगांतील सर्व विशिष्ट धर्मांचा समावेश होतो.

ह्या सत्याला अद्वितीय आणि वैश्विक असें जें लक्षण प्राप्त झालें आहे, त्याला आणखी एक सबळ कारण असें आहे कीं, त्याची इमारत एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या आधारावर रचलेली नाहीं. ज्या एखाद्या धर्माला

अथवा तत्वविद्येला कांहीं विशिष्ट व्यक्तीचा आधार असतो, त्या धर्माकडून अथवा तत्वविद्येकडून वैश्विक धर्माच्या गरजा कधींही परिपूर्ण होत नाहींत. एखादा धर्म अथवा तत्वविद्या अखिल विश्वाला लागू करावयाची झाल्यास, पहिली अवश्य गोष्ट ह्मटली ह्मणजे तो धर्म अथवा ती तत्वविद्या निवळ अकर्तृक असली पाहिजे. जावत्कालपर्यंत एखाद्या धर्माला संस्थापक आहे असें मानण्यांत येईल, तावत्कालपर्यंत तो धर्म संस्थापकाच्या पृथक्त्वानें मर्यादितच राहणार. आणि त्याला वैश्विक धर्म कधींही ह्मणतां येणार नाहीं. हाच प्रकार ख्रिस्ती धर्म, यावनी धर्म, बौद्ध धर्म, इत्यादि विशिष्ट धर्मांत आपणाला आढळतो. ह्यापैकीं प्रत्येक धर्माचे अनुयायी, तत्वांना विसरून संस्थापक व्यक्तीवरच आसक्ति ठेवतात, आणि ते इतर धर्म मान्य करीत नाहींत. ह्याचा परिणाम मतभेद, तंटे आणि छल हा होतो. ह्याचीं उदाहरणें धर्मसंबंधीं इतिहासांत विपुल आहेत.

वेदान्तशास्त्रांत अनेक पंथ आहेत. द्वैत पंथांत, द्वैत अथवा अद्वैत अशा सर्व धर्मपंथांतील, उदाहरणार्थ झोरो आस्टियन धर्म, ज्यू लोकांचा धर्म, ख्रिस्ती धर्म आणि ज्यांत सगुण (मूर्त) परमेश्वराची अथवा एखाद्या देवतेची भक्ति विशेषेंकरून सांगितलेली आहे अशा सर्व धर्मांतील मूलतत्वांचा अंतर्भाव होतो.

परमेश्वर हा आपल्या हृदयांत असून विश्वव्यापी आहे, असें ज्या ज्या धर्मांत सांगितलेलें आहे, अशा सर्व धर्ममतांचा विशिष्टाद्वैत पंथांत समावेश होतो. ‘परमेश्वर जसा आपल्या हृदयांत वास करीत आहे, तसाच तो अखिल विश्वांतहि आहे.’ ‘परमेश्वरी स्वरूपांत आपण राहतों, व्यापार करतों व आपल्या आस्तित्वाचें कारण तोच आहे.’ तो आत्म्यांचा आत्मा आहे.’ ‘अति विशाल आणि संपूर्ण अशा एक वस्तूचे आपण अंश आहोंत.’ ‘नित्यानंद परमेश्वराचे आपण पुत्र आहोंत.’ इत्यादि सर्व प्रकारच्या कल्पनांचा विशिष्टाद्वैत मतांत अंतर्भाव होतो. पण वेदान्तशास्त्राचा जो ‘अद्वैत’ ह्मणून एक पंथ आहे, तो ह्या सर्वां-

हून अत्यंत श्रेष्ठ आहे. आत्मीय एकरूपतेचें महत्व कळण्याचें सामर्थ्य फार थोड्या तत्त्ववेत्यांना असतें. अथापि ह्या अद्वैतरसांतच, आधुनिकशास्त्र, तत्वज्ञान आणि मानसशास्त्र ह्यांच्या अत्यंत गहन सिद्धांतांचा उलगडा होतो. यच्चयावत् धर्मांचें इष्ट स्थल अथवा त्यांची इतिकर्तव्यता हीच अद्वैतप्रतीति आहे. 'मी आणि माझा पिता उभयतां एकच आहोंत.' ह्या ह्मणण्याचें स्पष्टीकरण अद्वैत मतावांचून अन्यत्र कोठेंही सांपडावयाचें नाहीं. वेदांतांत धर्महि आहे आणि तत्वज्ञानहि आहे. ग्रीस आणि जर्मनीमध्यें तत्वविद्येच्या अनेक शाखा आहेत हें खरें आहे; पण त्यांच्यापैकीं एकाचीही मनुष्याच्या धर्मकल्पनेशीं एकवाक्यता झालेली नाहीं. अथवा जीवात्म्याचें परमात्म्याशीं ऐक्य अथवा आत्मसाक्षात्कार होण्याचा आणि अज्ञान, अहंकार व इतर सर्व प्रकारची अपूर्णता ह्यांच्या बंधनांतून मुक्त होण्याचा अत्यंत सयुक्तिक मार्ग जसा आर्यांच्या वेदान्तशास्त्रानें दाखविलेला आहे, त्याप्रमाणें वरील शाखांपैकीं एकाहि शाखेंत दाखविला नाहीं. जी गोष्ट आपल्या विवेकशक्तीस प्रमाणभूत पटत नाहीं अथवा भौतिकशास्त्र, तत्वज्ञान आणि तर्कशास्त्र ह्यांच्या नियमांशीं जिची एकवाक्यता होत नाहीं अशी गोष्ट एकाद्यानें खरी मानावी, असें वेदांतशास्त्र आपणांस सांगत नाहीं. पण येथें एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हिंदुस्थानांतील धर्म हा भौतिकशास्त्र, तर्कशास्त्र अथवा तत्वज्ञान ह्यांच्यापासून विलग्न कधींच झालेला नाहीं. धर्माची आणि त्या शास्त्रांची सांगडच आहे. आणि वेदांतशास्त्र जरी प्राचीन आहे, तरी साहजिकपणेंच त्याची आणि आधुनिक शास्त्राच्या अंतिम सिद्धांतांची पूर्ण एकवाक्यता आहे. वेदांतशास्त्रांत उत्क्रांतितत्वाचें विवेचन केलें आहे आणि इतकें अजूनही यापुढें जे जे सत्य सिद्धांत प्रकट होतील, त्या सर्वांना वेदांतशास्त्राचे पोटांत जागा आहेच.

वेदांतशास्त्राचें दुसरें एक उत्कृष्ट लक्षण असें आहे कीं, प्रत्येक धर्माचें जें अंतिम इष्टस्थल त्या स्थलाप्रत जाऊन पोंहचण्यास सर्वांना एकच सरधोट मार्ग घालून दिलेला नाहीं. उलटपक्षीं नानाविध

लोकांच्या भिन्न भिन्न प्रवृत्ती असतात ही गोष्ट पूर्णपणें जाणून, प्रत्येकाच्या प्रवृत्तीला अनुरूप असाच मार्ग त्यांत दाखविलेला आहे. वेदांतशास्त्रांत मनुष्याच्या प्रवृत्तींचे चार वर्ग केले आहेत. हे चार वर्ग आणि त्यांचे पोटभेद यांत बहुतेक सर्व वर्गांतील लोक येतात. आणि आपआपल्या प्रवृत्यनुरूप ज्या मार्गाचा अवलंब केला असतां इष्टस्थलाप्रत जाऊन पोहोचण्यास प्रत्येकाला साहाय्य होईल, असेच मार्ग वेदांतानें रेखाटून ठेविले आहेत. ह्यांपैकीं प्रत्येक मार्गाला संस्कृतांत 'योग' अशी संज्ञा आहे.

ह्या वरील मार्गांपैकीं 'कर्मयोग' हा पहिला मार्ग आहे. हा मार्ग जे उद्योगी आहेत, ज्यांना कर्म करण्याची आवड आहे, आणि जे लोकांना मदत करण्याला सदैव तत्पर असतात, अशा लोकांकरितांच आहे. सारांश, कर्ममार्ग हा प्रत्येक व्यवसायी मनुष्याकरितां आहे. कर्मयोगांत कर्माचें रहस्य वर्णन केलें असून, आपलीं नित्य नैमित्तिक कर्में ईश्वरार्पण कशीं करावयाचीं व केवळ कर्माचरणानेंच इहजन्मीं पारमार्थिक पूर्णता कशी प्राप्त होते, हेंही सांगितलें आहे. कर्मयोग हा प्रमुखत्वानें व्यावहारिक मार्ग आहे. आणि ज्यांना आपलें जीवनचरित उद्योगांत घालविणें पसंत वाटतें, अशांना तर तो अवश्यकच आहे. कारण शक्तीच्या अल्प व्ययानें मोठमोठालीं परिश्रमाचीं कामें कशीं साध्य होतात हें कर्मयोगावरून त्यांना चांगलें कळून येईल. पाश्चात्य देशांत बहुतेक लोकांचे नित्याचे व्यवसाय इतके अनेक असतात कीं, त्यांच्यायोगें त्यांच्या मानसिक शक्तीचा निरर्थक व्यय फार होतो, व हा केवळ त्यांच्या ठिकाणीं असणाऱ्या आत्मसंयमनाच्या अभावाचा परिणाम होय. त्यांना जर कर्माचें रहस्य कळलें, तर त्यांच्या हल्लींच्या मानसिक चंचलतेमुळें, मानसिक सामर्थ्याचा जो अपव्यय होत आहे, तो त्यांना टाळतां येईल, इतकेंच नव्हे, तर त्यांची आयुर्मर्यादाहि खरोखर वाढेल. कर्मयोगानें हेंच गूढ उकलून दाखविलें आहे व पूर्ण आत्मसंयमनाचा मार्गही खुला करून ठेविला आहे.

दुसरा मार्ग म्हटला म्हणजे 'भक्तियोग' हा आहे. हा मार्ग प्रेमविशिष्ट भक्तिमान् लोकांकरितां आहे. साधारण भावबलानें श्रेष्ठ प्रतीची आत्मोन्नति कशी होते आणि अखेरीस सर्व धर्मांची इतिकर्तव्यता म्हणजे आत्मसाक्षात्कार त्याची प्रतीति कशी येते, हें भक्तियोगावरून चांगलें ध्यानांत येतें. सारांश, हा मार्ग म्हणजे भक्तीचा आणि प्रेमाचा अथवा प्रेमभक्तीचा आहे. ईश्वरप्रेमाचें स्वरूप कोणतें, मनुष्याचें व्यवहारांतील धन, दारा, सुत, गृह, प्राण ह्यांवर असणारें प्रेम ईश्वराकडे कसें लावावयाचें आणि तेणेंकरून इहपरलोकीं जन्माचा हेतु जो आत्मैक्यभावना तो कसा परिपूर्ण होतो, या सर्वांचें विशदीकरण भक्तियोगांत फार चांगलें केलें आहे.

आतां तिसरा मार्ग जो 'राजयोग' त्यांत धारणा आणि ध्यान ह्या दोन गोष्टी प्रमुख आहेत. राजयोगाचें क्षेत्र अतिविस्तृत आहे. त्यानें सर्व अध्यात्ममंडल व्यापिलें आहे. दुसऱ्यांच्या मनांतील विचार जाणणें, दिव्यदृष्टि, सूक्ष्मतर ज्ञानेंद्रियांचें उत्क्रमण, आत्म्याचें देहांतून निर्गमन, मानसिक सामर्थ्यानें रोगांचें निवारण आणि ज्याला साधारणपणें आपण अद्भुत गोष्टी असें म्हणतों अशीं सर्व कृत्यें, ज्या आध्यात्मिक सामर्थ्यांच्या योगें घडून येतात, त्या सामर्थ्यांचा विकास कोणत्या रीतीनें होतो, ह्याचें स्पष्ट विवरण राजयोगांत केलेलें आहे. नॅझारेथच्या जीजसनें आणि त्याच्या छात्रवर्गानें जीं जीं आध्यात्मिक सामर्थ्याचीं कृत्यें करून दाखविलीं, आणि आजही ज्या सामर्थ्याचा उपयोग ख्रिस्तीशास्त्रज्ञ, व मानसिक सामर्थ्यानें, श्रद्धेच्या जोरावर दैवी शक्तीच्यायोगानें आणि अशाच इतर अनेक प्रकारच्या सामर्थ्यानें रोग बरे करणारी मंडळी सामर्थ्याचीं कृत्यें करीत आहे, तीं सर्व हिंदुस्थानांतील योगीपुरूष फार प्राचीन काळापासून करून दाखवीत आले आहेत.

हीं अध्यात्मिक सामर्थ्यें आणि अद्भुत गोष्टी घेऊन राजयोगानें त्यांचें वर्गीकरण केलें आहे आणि त्यांना एक प्रकारच्या विद्येचें स्वरूप देऊन त्यांचें एक शास्त्र बनविलें आहे. राजयोगांत प्राणायामाचेंहि स्पष्टी-

करण केलें आहे. प्राणायामापासून मनावर आणि देहावर जे आश्चर्यजनक परिणाम घडतात ते पाश्चात्य राष्ट्रांतील मानसिक सामर्थ्यानें रोग बरे करणाऱ्या लोकांना अपरिचित आहेत असें नाहीं. राजयोगांत ह्या अध्यात्मिक सामर्थ्याचें शास्त्रीय दृष्टया जरी विवेचन केलें आहे, तरी त्यांत एवढी गोष्ट नमूद करून ठेविली आहे कीं, अशा प्रकारचें सामर्थ्य अंगीं असणें हें कांहीं आत्मसाक्षात्काराचें चिन्ह नव्हे. मानसिक सामर्थ्यानें रोग बरे करणारे व ख्रिस्तीशास्त्रज्ञ यांना हिंदुस्थानांतील योगिजनापासून जर एखादा चांगला बोध घ्यावयाचा असेल तर तो हाच होय. विवेकशून्य आणि मंद बुद्धीच्या लोकांच्या ठिकाणीं एखाद्या मानसिक शक्तीचा आपोआप विकास झाला असतां ते पारमार्थिक सत्याचा मार्ग अगदीं चटकन सोडून देतात; आणि त्यांना असें वाटतें कीं, आपण परमार्थतेच्या अत्युच्च स्थितीला जाऊन पोंहोंचलों. कारण एखाद्याचें डोक्याचें अथवा छातीचें दुखणें बरें करण्याचें सामर्थ्य आपल्या ठिकाणीं आलें आहे. पण राजयोग आपणाला अगदीं निरालेंच सांगत आहे. तें असें कीं, अध्यात्मिक सामर्थ्याचा उपयोग द्रव्यार्जनाकडे केला असतां आत्मिक उन्नतीच्या मार्गांत मोठे अडथळे येतात. उलटपक्षीं, राजयोगाचा प्रधान हेतु ह्मटला ह्मणजे, योगाभ्यास करणाऱ्याला ध्यान आणि धारणेच्या साहाय्यानें जेथें जीवात्म्याचें परमात्म्याशीं पूर्ण तादात्म्य होतें आणि सत्, नित्य, शांति आणि सुख ह्यांच्या ऐक्याची जेथें प्रतीति येते अशा अत्युच्च स्थितीप्रत नेऊन पोहोंचविणें हा होय.

चवथा मार्ग 'ज्ञानयोग' हा आहे. मनुष्याला सम्यग्ज्ञान आणि विवेक प्राप्त करून देणारा (हा मार्ग) आहे, व तो बुद्धिमान्, विवेकी आणि तत्ववेत्ते लोकांकरितांच आहे. एवंच वेदांत हें विश्वांतील सर्व धर्ममतांचें आणि तत्वाचें कसें मायपोट आहे ह्याची आपणाला थोडक्यांत कल्पना करितां येईल. वेदांतांत अध्यात्मशास्त्राच्या मूलतत्वांचाहि उलगडा केलेला आहे. मृत्यूनंतर आत्मा कसा आणि कोणत्या अवस्थेंत अस्तित्वांत असतो हेंहि त्यांत सांगितलें आहे. कोणत्या प्रकारचे आत्मे आपल्याशीं संभा-

षण करूं शकतात, त्यांना पुढें कोणची स्थिति प्राप्त होते, कर्मानुबंधी आत्म्याला या पृथ्वीवर पुनर्जन्म कसा प्राप्त होतो आणि तो पुनः पुनः मानवीरूप कसें धारण करितो, ह्या सर्वांचें विशदीकरण वेदांतांत केलें आहे. वेदांतांत आत्मविद्येचेंहि स्पष्टीकरण आहेच.

जगांतील सर्व मोठमोठ्या अध्यात्मशास्त्रवेत्यांचीं मतें वेदांतधर्माला मान्य आहेत; त्यांनीं लोकांना केलेला उपदेश ह्मणजे परमेश्वरानें त्यांच्या रूपानीं अवतार धारण करून केलेला उपदेशच होय असें वेदांताचें मत आहे. इतकेंच नव्हे, तर मानव जातींच्या कल्याणार्थ अजून जे जे महात्मे जन्मास यावयाचे आहेत, त्या सर्वांच्या मताला वेदांतांत जागा आहेच.

असो, नीतिशास्त्राला आधार कोणता हेंहि वेदांतानें स्पष्ट करून दाखविलें आहे. आह्मीं नीतिमान कां व्हावें? एखाद्यानें अमुक अमुक ह्मटलें आहे अथवा एखाद्या धर्मग्रंथाच्या एखाद्या भागांत अमुक अमुक लिहिलेलें आहे ह्मणून आह्मीं नीतिमान व्हावयाचें कीं काय? नाहीं. आह्मीं नीतिमान कां व्हावें, याचें जर कोणतें एखादें कारण असेल, तर तें विश्वांतील आत्मीय एकरूपता हेंच होय. जर आपण दुसऱ्याला इजा करूं तर ती आपण आपल्या स्वतःलाच केल्याप्रमाणें होईल. कारण दुसऱ्याचा आणि आपला आत्मा हे दोन निराळे नसून, एकच आहेत. एकादा मनुष्य दुष्ट असला, तर त्याचा दुष्परिणाम केवळ त्याला स्वतःलाच नव्हे, तर त्याचेबरोबर दुसऱ्यालाही भोगावा लागतो. मनुष्य आपल्या स्वतःवर जशी प्रीति करितो तशी त्यानें आपल्या शेजाऱ्यावरही कां करावी ह्याचेंहि वेदांतानें आत्मीय एकरूपतेच्या द्वारानें उत्कृष्ट विवेचन केलें आहे. कारण आत्मदृष्टीनें पाहिलें असतां आपण आणि आपला शेजारी मूळचे एकरूपच आहेत.

वेदांतप्रणीत नीतिशास्त्राचा अवलंब केला असतां धार्मिक जगतांत शांति आणि ऐक्यभाव नांदूं लागतात. जेथें जेथें वेदांताचें साम्राज्य चालू असतें, तेथें तेथें सर्व धर्मपंथांमध्यें धर्मसंबंधीं सहनशीलता आणि

सहकारिता ही दृष्टीस पडून धर्मच्छल कायमचा बंद पडतो. वेदांताचें अध्ययन करणारा मनुष्य अमुक एका पंथाचा, धर्माचा अथवा संज्ञेचा असतो असें मुळींच नाहीं. तो ख्रिस्ती नाहीं, मुसलमान नाहीं, बौद्धानुयायी नाहीं, तो जैनपंथाचाहि नाहीं अथवा हिंदूही नाहीं. तथापि तत्त्वदृष्ट्या मात्र त्याचें सर्वांशीं ऐक्यच असतें. त्याला ख्रिस्तांचे प्रार्थनामंदिरांत, मुसलमानांचे मशीदींत अथवा हिंदूंच्या देवालयांत जाण्यास कांहींच प्रत्यवाय नसतो. जगांतील सर्व विशिष्ट धर्मांच्या मुळाशीं असणारा व नामरूपरहित असा जो **सनातन** धर्म त्या धर्माचा तो अनुयायी असतो; आणि ह्या वैश्विक धर्माचें ज्ञान त्याला जसजसें अधिकाधिक होत जातें, तसतसे प्रोफेसर मॅक्समुल्लरनें ह्मटल्याप्रमाणें 'वेदांतांत बहुतेक प्रत्येक धर्माला जागा आहे, इतकेंच नव्हे, तर तें सर्वांचें मायपोट आहे'. असे उद्गार काढल्यावांचून त्यांच्यानें राहवत नाहीं, व वेदांत हें सर्व धर्मांचें मायपोट असलेंच पाहिजे. कारण त्यांतील सर्व निरूपणाचा पाया श्री कृष्णपरमात्म्यानें आपल्या भगवद्गीतेंत जे पुढीलप्रमाणें उद्गार काढिले आहेत व ज्यांत सर्वांचा समावेश होतो, त्याचेवरच रचलेला आहे.

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।
मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥

भग० अ० ४, श्लोक ११.

॥ ॐ तत्सत् ॥
